# माणूस

शनिवार । १८ डिसेंबर १९७६ । साठ पैसे

## प्रा. गोवर्धनदास पारीख

'I cannot reconcile myself to the idea that decency, loyalty and honesty should have no place in the catalogue of Bolshevik virtus'....

(बोल्शेविक सद्‌गुणांच्या यादीत सभ्यता, निष्ठा आणि सचोटी या गुणांना स्थानच असू नये ही कल्पनाच मला असह्य वाटते. मी ती स्वीकारू शकत नाही ....)

सुमारे पन्नास वर्षांपूर्वी कॉ. मानवेन्द्रनाथ रॉय यांनी स्टॅलिनला लिहिलेल्या शेवटच्या पत्रातील हे वाक्य त्यांच्या मनोवृत्तीवर उत्तम प्रकाश टाकणारे आहे.
रॉय यांच्या तत्त्वज्ञानापेक्षाही या त्यांच्या वृत्तीमुळे त्यांना थोर मानणाऱ्या निवडक विचारवंतामध्ये प्रा. गोवर्धनदास पारीख यांची सर्वप्रथम गणना करावी लागेल.
लोकहितवादी असो, कार्ल मार्क्स असो, त्यांच्या विचारांकडे, कृतींकडे निखळ मानवतावादी भूमिकेतून पाहण्याची दृष्टी पारीख यांच्या ठिकाणी अगदी मुरलेली होती.

'माणूस' ने गेल्या ऑगस्ट महिन्यात रॉय अंक प्रसिद्ध केला. त्यानिमित्त प्रा. पारीख यांच्याशी २।४ वेळा चर्चा करण्याची संधी मिळाली. प्रत्येक वेळी जाणवले, ते पारीख यांचे गाढ सौहार्द असलेले व्यक्तिमत्व. परस्पर संबंधातला जिव्हाळा. मोकळेपणा.
विचारातला प्रामाणिकपणा. ताजेपणा.
जो त्यांच्या 'माणूस' रॉय अंकातील लेखामध्ये जागजागी उमटून आला आहे.
कदाचित् ह्राच त्यांचा अखेरचा लेखही असावा, कारण अलिकडे ते फार कमी लिहीत.
तरी शेवटचे आम्ही पुण्याच्या आर्यभूषण छापखान्यात भेटलो, ते रॉय अंकासारखा आणखी एक 'मानवतावाद' या विषयावर अंक काढावा या उद्देशाने. रॉय अंकाचे जे स्वागत वाचकांनी-विशेषतः विद्यार्थी व तरुणवर्गाने केले, ते पाहून पारीख यांना फार प्रसन्नता वाटली होती.
पुन्हा मुंबईला भेटण्याचे ठरले.
पण त्या अगोदरच मंगळवार, दिनांक ७ डिसेंबरला त्यांचे अचानक निधन झाले.
आणखी एक दिवा विझला.
जो रॉय यांच्याप्रमाणेच मानवा मानवातील संबंध सौहार्दपूर्ण आणि प्रामाणिक राहावेत यासाठीच तेवत होता.
त्यांच्या स्मृतीला प्रणाम.
संपादक–

## साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक एकूणतिसावा
१८ डिसेंबर १९७६
मूल्य : साठ पैसे



संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही..



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९


# माचणूर : एक विकासकेंद्र

प्रा. एस्. डी. कुलकर्णी ( ग्रामायन )

माचणूर येथील साधनासप्ताहासाठी जावयाचे ठरले तेव्हा मनात अनेक शंका-कुशंका होत्या. धार्मिक उत्सवातील गर्दी, बेशिस्त व अस्वच्छता पाहिली होती. अशा गर्दीत परिसंवादाला ७–८ तरी श्रोते हजर राहतील की नाही याविषयी शंका होती. त्यात विषय होता, 'ग्रामीण व शहरी संस्कृती यांचा प्रीतिसंगम.'

आम्ही २ तारखेस डिसें. रात्री ९॥ वाजता उत्सवाच्या ठिकाणी पोहोचलो आणि पहिला आश्चर्याचा धक्का बसला. अतिथी–निवास, मुंबई–कुटी, कार्यालय अशा पाट्या होत्या. विस्तीर्ण मंडप होता आणि खूप लोक असले तरी गर्दी नव्हती. पाहुणे आले म्हणून धावाधाव नव्हती. सर्व व्यवस्था एखाद्या संघटनेच्या शिबिरासारखी होती. कोणकोणते कार्यक्रम कधी सुरू होतील याचे वेळापत्रक होते आणि लोकांना त्याची सूचना देण्यासाठी मोठी घंटा होती. घंटेजवळची पाटीही चमत्कारिक होती. 'कालसूचक'. चराचे संडास होते, मुताऱ्या होत्या. चहासाठी, नाष्ट्यासाठी रांगा लावल्या जात होत्या. कार्यक्रमासाठी मंडपात लोक रांगा लावून बसत होते. मात्र हे सर्व बिनबोभाट होत होते. संघटनांच्या शिबिरात देखील शिट्टी मारून शिस्त जपावी असे सांगावे लागते. येथे विविध प्रकारचे लोक होते. मुंबई, बडोदा, इंदूर वगैरे शहरांतील स्त्री-पुरुष तर माचणूर, सोलापूर, कर्नाटकातील हुपरगी येथील स्त्री-पुरुष; ग्रामीण-नागरी, सुशिक्षित–तरुण व प्रौढ असा अनेकांचा समूह, तरी पण व्यवस्थित वागणारा. लोक कार्यक्रमाचे वेळी मधून उठून न जाणारे. मग कळले, की ही श्री बाबामहाराजांनी घालून दिलेली परंपरा त्यांच्या निधनानंतर पांच वर्षांनीही चालू आहे.

सकाळी सर्व स्थान पाहिले. चंद्रभागेच्या अगदी काठावर एका जुन्या विस्तीर्ण मंदिराजवळ बाबामहाराजांनी आपला आश्रम थाटला. विदर्भातील आर्वी गावच्या या साधूला माचणूर गवसले. तेथे त्यांनी दत्तजयंतीच्या निमित्ताने साधनासप्ताह सुरू केला. जातपात न मानणाऱ्या या माणसाने भागवतधर्म आणखी पुढे नेला व माचणूर हे सभोवतालच्या भागाच्या विकासाचे केंद्र बनावे अशी आकांक्षा धरली. संत चोखामेळ्याच्या मंगळवेढ्याजवळ, जिथे महारांने पैसे भरून दामाजीपंतांना सोडवले त्या गावापासून ८ मैलांवर एक अभिनव प्रयोग सुरू झाला. पण लवकरच श्री बाबामहाराज निधन पावले. त्यांची आकांक्षा आता या आश्रमाचे विश्वस्त पुरी करू मागत आहेत. म्हणूनच या वर्षी पूजा-आरती-प्रवचने यांच्या जोडीला त्यांनी एक ज्ञानसत्र आयोजित केले होते. सत्रात विज्ञान, सामाजिक प्रश्न यासारखे विषय होते. यावेळी आपण माचणूरचे हे स्थान विकासाचे केंद्र बनवू इच्छितो, असे विश्वस्तांनी जाहीर केले.

परतताना विश्वस्तांचे हे स्वप्न कसे साकार होईल, याविषयी मनात काही विचार आले. हे प्रकटपणे मांडले तर त्यांनाच नव्हे तर अशा प्रकारचे कार्य करणाऱ्या इतरही संस्थांनादेखील यावर विचार करता येईल, म्हणूनच हे लेखनाचे साहस झाले.

माचणूर हे गाव तालुक्याच्या गावापासून आठ मैल. मंगळवेढ्याच्या एखाद्या डॉक्टरांच्या मदतीने आश्रमात आठवड्यातून एक–दोनदा आरोग्यकेंद्र चालवता येईल. साधनासप्ताहाच्या वेळी सात–आठ दिवस सोलापूर–पुणे–मुंबई येथून निष्णात डॉक्टर आणून आरोग्य–साहाय्य देता येईल. यातूनच काही वर्षांनी एखादा कायम दवाखाना डॉक्टर–नर्ससह उभा राहू शकेल.

या वर्षी गुरांना मोफत औषधोपचार करण्याची योजना काही अडचणींमुळे अंमलात येऊ शकली नाही. ती पुढील वर्षापासून अंमलात येईल. हे काम नावीन्यपूर्ण

व फार उपयुक्त आहे. त्यामुळे आश्रम शेतकऱ्यांच्या आणखी जवळ जाईल.

आश्रमाकडे आणखी पाच–सहा एकर जमीन आहे. अगदी जवळ नदी आहे. एखादा चांगला माणूस नेमून तेथे चांगली शेती करता येईल. पुढे मागे शेतकऱ्यांना शेती-सल्ला देणारे केंद्रदेखील चालवता येईल.

आश्रमाजवळ मोकळी व चांगली जागा आहे. तेथे एखादी इमारत बांधल्यास सोलापूर–पंढरपूर येथून विद्यार्थी विद्यार्थिनी येऊ शकतील. खुल्या वातावरणात रमतील. सुरुवातीला आश्रमाला यात पुढाकार घ्यावा लागेल. पण नंतर ते रुळून जाईल.

आश्रमाने विद्यार्थी व विशेषतः विद्यार्थिनींची एक–दोन दिवसांची शिबिरे घ्यावीत. मात्र त्यांना मोकळेपणी राहण्यासाठी फार तर गुरुजनांची एक–दोन व्याख्याने ठेवावीत. मुला–मुलींना निसर्गाच्या सान्निध्यात रमू द्यावे.

ज्ञानसत्र तर सुरूच झाले आहे. त्याच्या जोडीला विद्यार्थ्यांची छोटी छोटी सत्रे चालावीत.

संत चोखामेळ्याचे मंगळवेढा अगदी जवळ. श्री. बाबामहाराज जातपात सोडा म्हणणारे. त्यामुळे भोवतालच्या गावांतील दलित विद्यार्थी–विद्यार्थिनींना काही मदत करता येईल का, याचा विचार या केंद्राने करावा. हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती द्यावी.

महाराष्ट्रात अनेक धार्मिक केंद्रे आहेत. आश्रमाने त्यांना वर्षातून एकदा एकत्र करावे. आपण काय करतो, हे दाखवावे. ते काय करतात, हे समजून घ्यावे. यातून विधायक कामाला उठाव द्यायचा प्रयत्न करावा. माचणूर हे विधायक कार्याचे पंढरपूर व्हावे. एकदा काम सुरू झाले की, नव्या वाटा फुटतील, नवे विचार येतील, नवे साथी भेटतील.

अर्थात हे सर्व सोपे नाही. हे धार्मिक कार्य नाही, अशी हाकाटी होईल. हितसंबंधींचा विरोध होईल. पण कोणत्याही नव्या वाटा चोखाळणाऱ्यांना विरोध होतोच. जितके अधिक चांगले काम तेवढा विरोध अधिक. पण विरोध ही मान्यतेची पहिली पायरी मानून पुढे गेले पाहिजे. माचणूरचा या वर्षीचा उत्सव या नव्या कार्यक्रमाची नांदी ठरेल तर आणि तरच हा आश्रम हे विकासाचे केंद्र बनेल. □

**धार्मिकाने समाजोन्मुख व्हावे व समाजसेवकाने अंतर्मुख व्हावे, ही आजच्या काळाची, सर्वंकष हितासाठी, एक प्रमुख गरज आहे.**

# कराल ते हित सत्य करा

डॉ. रा. द. प्राणी, मिरज

आपण ज्ञानेश्वरी वाचतो आणि शेवटी ‘पसायदान’ म्हणतो. काही भजनी मंडळांतून या ओव्यांच्या पठणाच्या स्पर्धाही होतात. काही प्रवचनांचे अखेरीस या ओव्या सामुदायिक स्वरूपातही म्हटल्या जातात. हे पठण चांगलेच व त्याचा प्रसारही व्हावा. पण यासंबंधी एक प्रश्न मनापुढे येतो, तो हा की, या पसायदानातील वर्णनाप्रमाणे वर्तमान प्रचीती आहे का? आणि ती नसेल तर ती केव्हा येणार! परमार्थ हे अनुभवाचे शास्त्र आहे. त्यात संशय, अनुमान मुळीच चालणार नाही. म्हणूनच समर्थांचा प्रचीती पाहण्याविषयी आग्रह आहे. ते म्हणतात की—

येथे अनुमान राहिला। तरी परमार्थ केला तो वाया गेला।
प्राणी संशयी बुडाला। प्रचीतीवीण ॥

या अनुभवाच्या दृष्टीने पसायदानाकडे पाहिल्यास काय दिसते? खलांचा कुटीलपणा नाहीसा होत आहे की वाढतोय हे रोजच्या वृत्तपत्रांवरून दिसतेच. परस्पर मित्रभाव उत्कट होत आहे का वसरत चालला आहे? जो जे वांछील ते त्याला प्राप्त होत आहे का उपासमार चाललीय? ज्ञानोबांच्या अपेक्षेप्रमाणे हे पसायदान पदरी पडते का? नाही. उलट सांप्रदायिकांत वैमनस्य, भजनी मंडळामंडळांत मत्सरभाव, बोवाबाजीचे थैमान, दांभिकता व अनाचारामध्ये वाढ याच गोष्टींचे समाज-चित्र दिसत नाही का? असे का व्हावे याचा विचार होऊन हे कोडे सुटले पाहिजे. पण ते सोडवावयाचे म्हणजे ‘इकडे आड, तिकडे विहीर’ असा पेच आहे. कारण रूढीकडे पाहून बोलावे तर अनुभवाचे समाधान होत नाही, आणि अनुभवाच्या आधारे समाधान करावयास जावे तर जनरूढी बुडते.

परिपाठेचि जरी बोलीजे। तरी प्रचीत समाधान बुडाले।
प्रचीत समाधान राखिले। तरी परिपाठ उडे ॥
परिपाठ आणि प्रचीत प्रमाण। दोन्ही राखोन निरुपण

—दासबोध

म्हणून रूढी तर मोडू नये आणि अनुभवाचे समाधान तर प्राप्त व्हावे, असेच बोलले पाहिजे.

हे पसायदान अनुभवाला येत नाही याचे कारण काय? याला जबाबदार कोण? विश्वात्मक देवांनेच ते आपल्या हाती ठेवून, तो हात आखडून ठेवलाय असे म्हणावे तर ते शक्य नाही, कारण ‘अनन्याचे लाड पुरवी नारायण’ हा संतांचा अनुभव आहे. म्हणून अनन्य

अशा ज्ञानोबारायांचा–भक्तांचा प्रसाद देव रोखून ठेवणार नाही. ज्ञानोबांनी साहित्य–सौंदर्याने हे एक गोंडस भविष्य रंगवून ठेविले आहे असे म्हणावे तर तसे म्हणणेही इष्ट नाही. कारण काही लाभ पदरी पडावा म्हणून भविष्य सांगणारे ते जोतिषी नव्हते. ते सत्य-वक्ते संत आहेत. 'लाभाविण प्रीती' करणाऱ्या कळवळ्या जातीचे ते आहेत. विश्वात्मैक्य भावाचे ज्ञानदेव जनतेची फसवणूक कशी करतील ?

मग याला जबाबदार कोण समजावयाचे ? याचे उत्तर पसायदानंतर श्रीनिवृत्तिनाथांनी दिलेल्या वरात गुप्त आहे. निवृत्तिनाथ वर देतात की, 'होईल दान पसावो.' केव्हा म्हणून जर आपण त्यांना प्रश्न करू, तर 'तुम्ही दान स्वीकारण्यास पात्र व्हाल तेव्हा' असे ते हळूच उत्तर देतील. सामान्य मनुष्यानेही दान देताना पात्रापात्र विचार करावा असे शास्त्र सांगते, तर विश्वात्मक देवाकडून कुपात्री दान कसे होईल ? म्हणून जबाबदार आपणच आहोत. दान स्वीकारण्याची पात्रता अद्याप आपल्यात आलेली नाही. कारण संतांचे ग्रंथ केवळ वाचण्यासाठी नसून वागण्यासाठी आहेत हे आपण नेहमी विसरतो. म्हणून आपण अपात्र का व आपले कोठे चुकते हे पाहण्यासाठी आपण आपलाच शोध घेऊ या.

उपासनेचा अंगीकार केलेल्या उपासकांचे ढोबळ मानाने दोन वर्ग दिसतात. पहिला वर्ग सांप्रदायाला अनुसरून उपासना करणारे. किंवा कोणताच सांप्रदाय न स्वीकारिता केवळ आवड म्हणून स्वतः साधनमार्ग आखून उपासना करणारे.

दुसरा वर्ग–जनतेची सेवा करण्याचे व्रत स्वीकारून जनार्दनाची उपासना करणारे या दोन्हीही वर्गांत उपासनेचा योग्य तो बोध करून घेऊन सिद्धकोटीला गेलेले सत्पुरुष असतील, त्यांच्यासाठी हा लेख नाही. बहुसंख्य सामान्य उपासकांसाठी आहे. एवढे सुचवून आपण सामान्य उपासकांसंबंधी विचार पाहू.

## पहिला वर्ग

या वर्गांत स्नानसंध्यापूजादी कर्म, ग्रंथपठण, सप्ताह–वाचन, नामसंकीर्तन, देवदर्शन, वारी, उत्सव इत्यादी अनेक साधने आहेत. सांप्रदायिक सांप्रदायाला अनुसरून यातील काही साधने करतो व असांप्रदायिक स्वेच्छेने काही साधने करतो. एक बंधन स्वीकारतो व एकाला ते नको असते. इतकाच दोघात फरक. थोडेबहुत साधन झाले की ईश्वरसेवेची इतिकर्तव्यता झाली, आपण भक्त झालो, असे या उपासकास वाटू लागते. केवळ वाटू लागते इतकेच नव्हे तर त्याचा अहंकार उत्पन्न होतो. देव्हाऱ्यातील, क्षेत्रातील धातुपाषाणादिकांचा न बोलणारा, न हालणारा देव याला मानवतो. न खाणाऱ्या देवाला हा नैवेद्य दाखवील पण खाणाऱ्या भुकेल्या देवाच्या झोळीत ताजे वा शिळे अन्न घालणार नाही. 'ओ' न देणाऱ्या देवाला हा कृष्ण, विष्णू, हरे, गोविंद, गोपाळ म्हणून आळवील, नमन् करील. पण बोलणारा– 'ओ' देणारा कृष्णा, विष्णू पुढे आला तर हा अहंकाराने ताठेल. 'नम्र झाला भूता। तेणे कोंडिले अनंता' हे चरण रोज गाथेचा पाठ चालू असताही विसरेल. 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म' हा अभंग सुस्वर तालात गाऊन हा भजन करील, पण चालत्या बोलत्या विष्णूत याला चैतन्य दिसणार नाही.

ही वस्तुस्थिती जी मांडली, ती धातुपाषाणादी मर्तींच्या उपासनेची चेष्टा किंवा अवहेलना करण्यासाठी नाही. जड मूर्तींच्या ठिकाणी चैतन्य भावना ठेवून उपासना झाल्यास ठीकच आहे. सर्व संतांनी जे आत्मज्ञान त्वरित करून घेतले ते या सोप्या साधनानेच. इतकेच नव्हे तर साक्षात्कारानंतरही सगुण मूर्तीचा प्रेमतंतू तोडू नये असे त्यांचे सांगणे आहे. पण ही मूर्ती–उपासना मर्म समजून व्हावी. विश्वव्यापक परमात्मा संकुचित बुद्धीला आकलन होण्यासारखा नसल्यामुळे, ती बुद्धी व्यापक होण्यासाठी, संतांनी मूर्तीचा आधार घेतला. 'नातुडे मुख्य परमात्मा । म्हणोनी करावी लागे प्रतिमा ।।' म्हणून तो परमात्मा मूर्तीतच मर्यादित ठेवून चालणार नाही. 'अवघेचि ब्रह्म रिता नाही ठाव । प्रतिमा तो देव नोहे कैचा' हे जितके सत्य आहे तितकेच 'अवघेचि ब्रह्म रिता नाही ठाव । प्रतिमाचि एवढा देव कैचा ।।' हेही सत्य आहे. मूर्तीपासून उपासनेला सुरुवात होऊन ती तेथेच न थांबता हळूहळू विश्वव्यापक होत गेली पाहिजे. तरच सत्य हित होऊन विश्वात्मक देव संतुष्ट होतो. संसारात गढून गेलेल्या साधकास थोडे वैराग्य उत्पन्न होऊन भक्तीचे वळण लागावे म्हणून ही मूर्तिपूजा आहे. या हेतूने तुकोबा सांगतात–

> नाही आदि अंत ऐसा अनंत ।
> तो हा पंढरीत पांडुरंग ।।

पण तो साधक भक्तिमार्गात स्थिर होऊन वरची पायरी चढला म्हणजे ते त्याला सांगतात –

> नाही आदी अंत ऐसा तो अनंत ।
> आहे हृदयात तुका म्हणे ।।

मूर्तीत भावनेने उत्पन्न झालेले चैतन्य स्वतःच्या हृदयात नेले पाहिजे आणि स्वतःच्या हृदयातील चैतन्याचे लोण सर्व भूतांतरात्म्यांपर्यंत गेले पाहिजे. असे हे उपासनेचे टप्पे आहेत. बहुसंख्य उपासक, देवाला मूर्तीतच डांबून ठेवून तेथेच थांबतात आणि भक्तिसाधन पूर्ण झाले असे समजून सत्यहिताला मुकतात. मग देव राहतो देवळात नाहीतर देव्हाऱ्यात, आणि उपासक वावरतो बाजारात. म्हणजे देव सतत देहाबाहेर दूरच राहतो. आणि देहात देव नाही या भावनेमुळे वरील सत्यपरिस्थितीचे दर्शन होते.

यासाठी सत्यहितार्थ म्हणजे पारमार्थिक हितार्थ, ज्यायोगे ईश्वरी कृपा होते, 'जेणे हा गोपाळ कृपा करी' – या उपासकाने दुसरी पायरी चढलीच पाहिजे. म्हणजे मूर्तिरूपी चैतन्याच्या भाग्याची, त्याने आपल्या हृदयसिंहासनावर स्थापना केली पाहिजे. यामुळे मी जाईन तेथे हृदयस्थ देव माझ्या बरोबर आहे, या भावनेची वाढ होऊन आत्मजागृती होते, ती झाली म्हणजे हाच हृदयस्थ परमात्मा त्रैलोक्याचा मालक व माझ्या देहासकट सर्व देहांचा चालक याची जाणीव होऊ लागते. समर्थ म्हणतात, 'तो अंतर्देव चुकती । धावा घेऊन तीर्था जाती । प्राणी बापुडे कष्टती । देवास नेणता ।।' या अंतर्यामी देवाची सख्य–भक्ती करून त्याच्याशी एकरूप होणे हीच श्रेष्ठ उपासना होय. ही कशी करावी हे पतिव्रतेपासून शिकावे. पतिव्रता लोकव्यवहारात पतीची दासी म्हणून वावरते व एकांतात पतीशी हितगुज करून त्याच्याशी एकरूप होते.

तसेच येथे आहे. या अंतर्देवाची सेवा बाह्य मूर्तिपूजनाने होते. बाह्य मूर्तीची पूजा शरीराने व अंतर्देवाची मनाने व्हावी. मूर्तीला गंधाचा टिळा लावला, की तो अंतर्देवाच्या कपाळी उमटावा. मूर्तीस फूल वाहिले की ते अंतर्देवाच्या मस्तकी पडावे. बाहेर उदबत्ती लावली की, अंतर्देव वासाने गुंगलेला दिसावा. बाहेर नैवद्य दाखविला की, अंतर्देवाचा ढेकर ऐको यावा. पतिव्रतेप्रमाणे ही त्याची दुरून सेवा झाली. जेव्हा अंतर्देवाशी एकरूप व्हावेसे वाटेल तेव्हा डोळे मिटून निवांत बसून त्याच्याशी हितगुज करावे. समर्थ म्हणतात–

देव प्रीती राखो जाणे । देवासी करावे साजणे ।
जिवलगे अवघी पिसुणे । कामा न येती ।
सख्य देवासी करावे । हितगुज तयासीच सांगावे ।
आठवे भक्तीचे जाणावे । लक्षण ऐसे ।

त्याच्याशी एकरूप होण्यासाठी त्याच्या हास्यमुखाकडे पाहत राहावे आणि त्याच्या हास्याकडे लक्ष देऊन त्या आनंदात सामील व्हावे. देवाच्या प्रतिज्ञेवर विश्वास ठेवून हा प्रयत्न चालू ठेवावा. देव अर्जुनाला सांगतात की,

तू मनबुद्धी साजेसी । जरी माझीया स्वरुपी अर्पिसी
तरी मातेची गा पावसी । हे भाक पाझी
हेची कायिसयावरी होय । ऐसा जरी सदेही वर्ततु आहे ।
तरी अभ्यासूनी आधी पाहे । मग नव्हे तरी कोपे ।।

वरील अभ्यास चालू असला तरीही उपासना अपुरीच राहते. ती व्यापक होण्यासाठी उपासकाला तिसऱ्या पायरीवर जावेच लागते. ही तिसरी पायरी म्हणजे आपल्या अंतर्देवाचे दर्शन, प्राणिमात्राचे ठिकाणी घेणे. कारण त्यांचाही अंतर्देव तोच आहे. या तिसऱ्या पायरीवर गेल्याने उपासकाचे अनेक दृष्टीने हित होते. कसे ते पाहा.

(१) देवघरात किंवा एकान्तात अभ्यासासाठी आपण किती वेळ वास्तव्य करू शकू ? फार तर दोन–तीन तास. ग्रंथाच्या वाचनासाठी दोन तीन तास. निद्रा, खाणे–पिणे, इत्यादीत दहा तास असा हिशोब केला तरी सात–आठ तासांचा काल आपणांस प्रापंचिक दृष्टीने समाजातच घालवावा लागतो. नरदेहाचे मोल लक्षात घेऊन एक क्षणही भजनविरहित जाऊ नये, असे संत सांगतात. वरील साधनाने व्यवसायात असून समाजात वावरून अखंड भजन साधते.

(२) केवळ शरीराकडे लक्ष देऊन प्राणिमात्रात वावरल्यास 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या न्यायाने गुणावगुण लक्षात येऊन भेद उत्पन्न होतो व आपलेपणा विरतो. पण या तिसऱ्या पायरीवरील अभ्यासाने प्राणिमात्राकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलतो. 'चालती बोलती देऊळे । त्यामध्ये राहिजे राऊळे ।।' हा भाव उत्पन्न होऊन, 'देवाच्या संबंधी विश्वचि सोयरे.' । अशी विश्वाची सोयरीक होते. त्यामुळे 'आणिकांचे सुखदुःख उमटे अंतरी ।' अशी भूतदया उत्पन्न होऊन संतांचे भांडवल पदरी पडते.

(३) अभ्यासाने चित्तशुद्धी किती झाली याचा पडताळा घेता येतो. अमानित्व, अंदाभिकत्व इत्यादी अंतरंगातील ज्ञान–साधने आत्मसात किती झाली हे समाजात वावरल्याने कळणार. त्यापासून दूर राहून कसे चालेल ? या सर्व गोष्टींचा विचार करूनच ज्ञानी संतांनी भक्तीची व्याख्या केली ती अशी–ज्ञानेश्वरः–


☆ ☆ ☆

दुसऱ्या आवृत्तीच्या वाटेवर असलेली

# राजहंस प्रकाशने

- **सांगत्ये ऐका**
  हंसा वाडकर
  (तिसरी आवृत्ती)
- **टॉलस्टॉय - एक माणूस**
  सुमती देवस्थळे
- **श्रीग्रामायन**
  श्री. ग. माजगावकर
- **शतपावली**
  रवींद्र पिंगे
- **पुरंदऱ्यांची दौलत**
- **पुरंदऱ्यांची नौबत**
  ब. मो. पुरंदरे

☆ ☆

जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ।
हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ।।

समर्थ :–

उपासना सकळा ठाई । आत्माराम कोठे नाही ।
या कारणे ठाई ठाई । रामे आटोपिले ।।

म्हणजे या तिसऱ्या पायरीवर गेल्यानंतरच उपासना पूर्ण होते. म्हणूनच ज्ञानोबा म्हणतात–

अथवा आत्मप्रकाश चोखे । आपणपेची विश्व देखे ।
तो देहेचि परब्रह्म सुखे । मानू येईल ।।

आता भक्तीचे असे उच्च शिखर गाठणे, ही अवघड गोष्ट आहे. कोणीही मान्य करील. परंतु सत्यहित साधावयाचे असल्यास डरून चालावयाचे नाही. अवघड गोष्टही साध्य व्हावी म्हणून मानत मानत पलीकडे जाण्यासाठी सर्वभूतहितरत दयाळू संतांनी मार्गहि दाखवला आहे. थोडक्यात तो खाली देत आहे.

सर्वांभूती परमात्मभावना एकदम होणे कठीण आहे. म्हणून ज्यांच्यावर आपले स्वाभाविक प्रेम आहे अशा स्त्री–पुत्रादिकांचे ठिकाणी ती प्रथम करावी. लहान बालकात तर देव पाहावाच. कारण ते पूर्ण निरहंकारी, निर्मळ मनाचे व निरुपद्रवी असतें. कोणत्याही स्त्रीचे ठिकाणी दैविक भावनाच करावी. याप्रमाणे हळूहळू मानसिक क्षेत्र वाढवीत जावे. 'दया करणे जे पुत्रासी । तोचि दासा आणि दासी' असे क्षेत्र वाढत जावे. दीनदुबळ्यांबद्दल अंतःकरणात स्वाभाविक दया असते, तेथे ही भावना अंतःकरणात त्वरित उठते. शरीराने झिजावे, वाणीने रिझवावे. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास समर्थांच्या खालील दोन ओव्या अंतःकरणावर कोरून ठेवाव्यात–

देहामध्ये आत्मा असतो । देह पूजिता आत्मा तोषतो ।
देह पिडिता आत्मा क्षोभतो । प्रत्यक्ष आता ।।
देहा वेगळी पूजा पावेना । देहाविण पूजा फावेना ।।
जनी जनार्दन म्हणोनि जना । संतुष्ट करावे ।।

याप्रमाणे भाविक उपासकाने, मूर्तीतील व स्वदेहातील अधिष्ठान ओळखून, आपली दृष्टी तेथेच संकुचित न करिता तो सर्वव्यापी भूतात्म्याच्या उपासनेसाठी व्यापक केल्यानेच, सत्यहित साधून विश्वात्मक देव संतुष्ट होईल.

## दुसरा वर्ग

आता आपण दुसऱ्या वर्गातील उपासकासंबंधी विचार पाहू. या उपासकाचे म्हणणे असे असते की, 'जनतेची सेवा म्हणजेच जनार्दनाची सेवा. ही केली की, यात सर्व परमार्थ आला. यातच विश्वात्मैक्य भावाचा अनुभव होत असल्यामुळे मला देवघरात कोंडून घेण्याचे कारण नाही, किंवा देवळे धुंडाळण्याचे कारणही नाही. एकान्तात स्वस्थ काळ घालविणे म्हणजे आळशीपणाचे लक्षण आहे.'

या उपासकाचे वरील म्हणणे परमार्थाला सोडून नाही. कारण हे विचार म्हणणेच पहिल्या वर्गातील उपासकाची, तिसऱ्या पायरीवरील श्रेष्ठ भूमिका होय. म्हणून या उपासकाने निरालस्यपणे, निष्कामपणे, जनतेतील जनार्दनाचा अनुभव घेऊन, निर्मत्सर अंतःकरणाने समाजसेवा केल्यास तो वैष्णवच होय. सर्वेश्वर पूजनाचे वर्मच त्याचे हाती आले. तुकोबा म्हणतात–

'कोण्याहि जीवाचा न घडो मत्सर ।
वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।'

पण सत्यहिताच्या दृष्टीने, या उपासकाने एका जिव्हाळ्याच्या प्रश्नाचा विचार करणे आवश्यक आहे. तो प्रश्न त्याने आपल्या मनापुढेच टाकून काय उत्तर येते, याची मनोमन साक्ष पाहावी. तो प्रश्न असा की, 'जनता–जनार्दनाची सेवा' हे शब्द जे आपण उच्चारतो, ते जनार्दनाला ओळखून उच्चारतो का बोलण्याचा एक प्रघात म्हणून उच्चारतो ? 'ओळखून उच्चारतो' असे मनाकडून उत्तर आल्यास, 'आपण वैष्णव आहो' असे समजून, आपली उपासना त्याने निर्भीडपणे चालू ठेवावी. पण 'प्रघात म्हणून उच्चारतो' असे उत्तर आल्यास, आपण वैष्णव नसून आपले अधःपतन होत आहे, आपणच आपल्यास फसवीत आहो असे पक्के समजावे. परमार्थाच्या पहिल्या पायरीस स्पर्शही न करता, आपण श्रेष्ठ असा तिसऱ्या पायरीवरील उपासक आहोत, असा अहंकार धरून बोलणे, ही दारुण दांभिकता होय. दारिद्र्य असता, अंगाला अत्तर लावून हिंडण्याप्रमाणे हे आहे. ओळखीशिवाय प्रेमाची सेवा कशी होऊ शकेल ? 'साहेब नमस्कारिजे । वोळखिल्या उपरी' रथांतील राजाला ओळखून नमस्कार झाला म्हणजे राजाला झाला. नुसताच नमस्कार म्हणजे रथाला नमस्कार. त्यात समाधान कोणते ?

या वर्गातील बहुसंख्य उपासकवर्ग जनार्दनाची ओळख नसलेला सामान्यच असतो. स्वतःची फसवणूक न व्हावी, म्हणून त्याने खालील विचार पाहावा–

१. व्यासपीठावर उभे राहिले असता, आपणास जनतेचे गुणावगुण दिसतात, का जनार्दन दिसतो ? आपल्या अंतःकरणात स्वतःचा कार्यभाग साधून घेण्याची वासना उमटलेली असते, का सेवाबुद्धी असते ? हेतू धरून जनतेला जनार्दन या नावाने आपण बोलावितो की नाही ?

२. स्वतःच्या देहांत नांदणाऱ्या जनार्दनाकडे आपले कधी लक्ष गेलें आहे काय ? गेले नसल्यास हे केवढे आश्चर्य ? 'देहसंगे भोग भोगिले । देहसंगे प्राणी मिरवले । देहधर्मास चुकले । नवल मोठे ।।' स्वतःचाच अंतर्यामी स्वतःस जाणता येत नाही, तर दुसऱ्याचा अंतर्यामी कसा कळेल ?

३. संतशिरोमणी तुकोबास, ज्या जनतेतील जनार्दनाची ओळख पटवून घेण्यासाठी, प्रत्यक्ष पांडुरंगास हाक मारावी लागली, तो जनार्दन आपल्यास चुटकीसरशी कसा दिसेल ? तुकोबा म्हणतात–

जनी जनार्दन ऐकतो हे मात ।
कैसा तो वृत्तांत नकळे आम्हा ।
जन्म जरा मरण कवण भोगी भोग ।
व्याधी नाना रोग सुख दुःखे ।।

आम्हां मरण नाश तू तव अविनाश ।
कैसा हा विश्वास साच मानू ।।
तुका म्हणे तूचि निवडी हे गुढार ।
दाखवी साचार तेचि मज ।।

हे अवघड काम केवळ शब्दोच्चाराने होत नाही. 'पुस्तकी विद्या शिकणे । तरी गुरु कासया करणे ।।' केवळ पुस्तक वाचून विद्या येत असती तर शिक्षकाचे कारण काय ? पण पोटभरू विद्येस जर त्याची आवश्यकता भासते, तर सूक्ष्म परमार्थात त्याची जरूरी आहेच. म्हणून हे अंतर्देवाचे ज्ञान गुरूकडून जाणावे लागते.

४. संतांनी प्रथम स्वतःतील अंतर्देव ओळखला, आणि मग जनताजनार्दनाची सेवा केली. 'आता उरलो उपकारापुरता' हे तुकोबांचे शब्द साक्षात्कारानंतरचे आहेत. समर्थांच्या राजकारणासंबंधी, लोकसमुदायासंबंधी लोक जोरजोराने बोलतात, पण प्रथमचे देवशोधनार्थ त्यांनी घेतलेले कष्ट, त्यांनी केलेली पुरश्चरणे, सोयीस्करपणे विसरतात. समर्थ स्वतः मात्र ठासून सांगतात की, 'आधी ते भगवद्भजन । दुसरे ते राजकारण ।।' म्हणून प्रथम अंतर्देव–शोधनच पाहिजे.

५. नामस्मरणाने किंवा विठ्ठल विठ्ठल म्हणून काय होते, ही शंकासुद्धा येऊ नये, आणि अनुभव न घेता असा प्रश्न करणे, म्हणजे आद्य शंकराचार्यांपासून ते आधुनिक संतांपर्यंत सर्वांना वेड्यांत काढून, आपला शहाणपणा मिरविण्यासारखे आहे. सर्व संतांची या एका साधनाबद्दल अनुभवाची एकवाक्यता आहे. ज्ञानियांचे राजे ज्ञानेश्वर म्हणतात,' नामजप यज्ञु तो परम । बाधू न शके स्नानादि कर्म । नामे पावन धर्माधर्म । नाम परब्रह्म वेदार्थे ।।' मृदुंग टाळवीण्याच्या गजरात, कोणी न हालविता, हजारो माणसांना डोलविणारी भगवन्नामाची ही जादू आहे.

६. एकान्त कशासाठी ? पारमार्थिक एकान्त म्हणजे कंटाळून केवळ बाजूला आळशीपणाने बसणे नव्हे. आत्मानात्मविवेकाने आत्मानुभव घेण्यासाठी ती बैठक आहे. चंचल मनाचे संकल्पविकल्पात्मक हातपाय तोडून, त्याला आत्मसंस्थ करण्यासाठी, हे युद्ध आहे. मनाला जिंकून ते आत्मसंस्थ झाले, म्हणजेच आपपर भाव विरतो. समर्थ म्हणतात–

विवेक येकांती करावा । जगदीश धारणेनें धरावा ।
लोक आपला आणि परावा । म्हणोचि नये ।।
येकांती विवेक ठाई पडे । येकांती यत्न सापडे
येकांती तर्क वावडे । ब्रह्मांड गोळी ।।

असा या एकांताचा फार महत्त्वाचा उपयोग आहे.

जनताजनार्दनाची उपासनाही फार कठीण आहे. ती केवळ शब्द बोलून होत नाही. त्यासाठी अनेक उत्तम गुणांची आवश्यता लागते. पण प्रामुख्याने तीन गुण तरी अंगी बाणले पाहिजेतच. ते म्हणजे निस्पृहता, बोलणे तसे चालणे आणि जिव्हाळ्याचे प्रेम. समर्थांच्या एक एक ओळीने त्यांचे महत्त्व सहज पटेल.

१ स्वता निस्पृह असेना । त्याचे बोलणेचि मानेना ।
कठीण आहे जनार्दना । राजी राखणे ।।
२ जैसे बोलणे बोलावे । तैसेचि चालणे चालावे ।
मग महंतलीला स्वभावे । अंगी बाणे ।।
३ जीव जीवात घालावा । आत्मा आत्म्यात मिसळावा ।
राहो राहो शोध घ्यावा । परांतराचा ।।

सारांश, देवाच्या संबंधाने जर विश्वाशी सोयरीक या उपासकाला करावयाची असेल तर त्याने संतांच्या साधनमार्गाकडे दुर्लक्ष न करता भजन, पूजन, आत्मचिंतन इत्यादी साधनांकडे, धाव घेतलीच पाहिजे. तरच त्याचे सत्यहित होईल. सर्व विवेचनाचा मथितार्थ थोडक्यात असा की, उपासनेची एकांगी दृष्टी सोडून, भाविक वर्ग जर समाजोन्मुख होईल आणि समाजसेवक वर्ग अंतर्मुख होऊन जर आत्मनिवेदन करील, तर दोघांचेही सत्यहित साधून ते विश्वात्मक देवाच्या पसायदानास पात्र होतील.

किंबहुना तुमचे केले । धर्मकीर्तन हे सिद्धी गेले ।
येथ माझे जी उरले । पाईकपण ।।

असा श्रीज्ञानदेवांच्या ओवीने शेवट करून थांबतो. □

**(माचणूर केंद्रातर्फे 'सांगाती' हे अनियतकालिक पूर्वी प्रसिद्ध होत असे. हा लेख जानेवारी १९६९ या महिन्यात प्रसिद्ध झालेल्या अंकावरून पुनर्मुद्रित केलेला आहे.)**


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**
लेखक
ब. मो. पुरंदरे
मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# जपान
## अस्थिरतेतून हुकूमशाहीचा धोका

वा. दा. रानडे

जपानमधील निवडणुकांचे निकाल अनपेक्षित नाहीत. लॉकहीड प्रकरणामुळे अप्रिय झालेला सत्तारूढ लिबरल डेमोक्रॅटिक पक्ष हुकमी बहुमत गमावणार हे स्पष्टच दिसत होते. त्याचा यापेक्षाही मोठा पराभव कसा झाला नाही याचेच आश्चर्य वाटते. लॉकहीड प्रकरणामुळे राजीनामा दिलेले पंतप्रधान टनाका मोठ्या बहुमताने निवडून कसे येऊ शकतात ? टनाकांना १,६८,००० व त्यांचा नजीकचा प्रतिनिधी असलेल्या समाजवादी उमेदवारास फक्त ५३,००० मते मिळाली. एका ग्रामीण मतदारसंघातून ते उभे होते आणि ग्रामीण मतदारांवर लॉकहीडचा काहीही परिणाम झालेला नाही. त्यांना दुसरेच प्रश्न अधिक महत्त्वाचे वाटतात, असाच याचा अर्थ होतो.

जपानी मतदारांनी सत्तारूढ पक्षाचा फार मोठा पराभव केला नाही याचे एक कारण स्थैर्याच्या विचाराचा त्यांच्यावर अधिक प्रभाव पडलेला दिसतो. सत्तारूढ पक्षाला सत्तेवरून दूर करून आपण काय साधणार ? विरोधी पक्षांमध्ये एकजूट नाही. हे पक्ष एकत्र येऊन पर्यायी सरकार स्थापण्याची शक्यता नाही. मग अस्थिरता आणि अराजकाचा धोका ओढवून घेण्यापेक्षा सध्याचा सत्तारूढ पक्षच अधिकारावर राहिलेला बरा, असा हिशेब मतदारांनी आपल्या मनाशी केला आणि आपली नाराजी मर्यादित प्रमाणात दर्शविली. स्थिरतेच्या विचाराचा मतदारांवर केवढा पगडा असतो याची यावरून कल्पना येईल. स्थिर सरकार आम्हीच स्थापू शकतो, हेच आपल्याकडेही निवडणूक प्रचारात काँग्रेसचे मुख्य आवाहन होते. (मोठे बहुमत मिळूनही पुढे पक्षातल्याच फाटाफुटीने व गटबाजीने काही राज्यांत सत्तारूढ पक्षाच्या सरकारला अस्थैर्य आले व नेतृत्वात बदल करणे भाग पडले, ही गोष्ट निराळी.

हुकमी बहुमत गमावले तरी तेवढ्याने सत्तारूढ पक्षाच्या हातची सत्ता गेली नाही. आठ अपक्ष सभासद सत्तारूढ पक्षाला मिळाले असून त्यामुळे त्यांचे अल्प का होईना पण हुकमी बहुमत पुन्हा प्रस्थापित झाले आहे. आणखी काही अपक्ष सभासदही त्यांना मिळण्याचा संभव आहे. पण हे सभासद नेहमी आपल्या बाजूला राहावेत यासाठी सत्तारूढ पक्षाला त्यांची किंमत निरनिराळी आमिषे किंवा अधिकारपदाच्या स्वरूपात मोजावी लागणार, आपले धोरण व कार्यक्रमाच्या बाबतीतही त्यांच्याशी मिळते घ्यावे लागणार. भारताप्रमाणे जपानमध्येही आयाराम–गयारामांचा संधिसाधू खेळ सुरू होतो काय, हे काही दिवसांतच स्पष्ट होईल. गेली एकवीस वर्षे सत्तारूढ पक्षाची सत्तेवर असलेली पकड आता सैल झाली असून, त्याचे आसन डळमळीत झालेले आहे. त्यातच गटबाजीने पक्ष आणखी कमकुवत झाला आहे. निवडणुकीत फारच घसरगुंडी होण्याचा संभव दिसू लागला तेव्हा पंतप्रधान मिकी आणि त्यांचे प्रतिस्पर्धी फुकुडा यांनी एका व्यासपीठावर येऊन एकजुटीचा देखावा केला खरा, पण ही एकजूट टिकणे कठीण दिसते. पक्षाच्या बहुसंख्य सभासदांचा पाठिंबा फुकुडा यांना असून पंतप्रधानपदी त्यांचीच निवड जवळजवळ निश्चित आहे. कदाचित हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत निवड झालेली सुद्धा असेल.

लॉकहीडसारखी प्रकरणे पुन्हा उद्‌भवू नयेत, यासाठी पक्षातून भ्रष्टाचाराचे पूर्ण निर्मूलन करावे व त्यासाठी कडक उपाय योजावेत अशी पंतप्रधान मिकींची भूमिका आहे. पण तसे केल्यास उद्योगपतींना दुखवावे लागेल, उद्योगपतींच्या वर्गाचा फुकुडांना पाठिंबा आहे. फुकुडांची पंतप्रधानपदी निवड होणे याचाच अर्थ भ्रष्टाचाराबाबत बोटचेपे धोरण स्वीकारले जाणार. पण भ्रष्टाचाराविरुद्ध तरुण पिढीत असंतोष वाढत आहे. निवडणुकीत बहुसंख्य तरुण मतदारांनी लिबरल डेमोक्रॅट पक्षाविरुद्ध मते दिली. या असंतोषाची दखल पक्षाच्या नेत्यांना घ्यावी लागेल.

जपानमध्ये डाव्यांचे बळ प्रथमपासूनच कमी आहे. जपानी समाजवादी पक्ष आणि डेमोक्रॅटिक सोशॅलिस्ट पार्टी हे समाजवाद्यांचे दोन पक्ष तेथे आहेत. या वेळच्या निवडणुकीत समाजवाद्यांनी १२३ व डेमोक्रॅटिक पार्टीने २९ जागा मिळविल्या. दोन्ही पक्षांनी पूर्वीपेक्षा थोड्या अधिक जागा मिळविल्या असल्या तरी पर्यायी पक्ष बनण्याचे दृष्टीने त्यांचे बळ अजून फार कमी आहे. शिवाय या दोन्ही पक्षांत सहकार्य नाही. लॉकहीडसारख्या मोठ्या प्रकरणाने समाजवाद्यांची प्रतिमा डागाळलेली नसली तरी भ्रष्टाचाराचे आरोप जपानी समाजवादी पक्षातील सभासदांविरुद्धही करण्यात आले आहेत. डाव्यांमधील तिसरा पक्ष कम्युनिस्ट. या पक्षाने १९७० साली आपल्या धोरणात बदल करून संसदीय मार्गावर आपला विश्वास असल्याचे जाहीर केले. १९७२ च्या निवडणुकात पक्षाने ३९ जागा मिळविल्या, पण यावेळी कम्युनिस्टांना अवघ्या १७ जागाच मिळाल्या आहेत. धोरणात बदल करूनसुद्धा आपले सामर्थ्य वाढविण्यात कम्युनिस्ट पक्ष यशस्वी झालेला नाही असाच याचा अर्थ.

कोमेटो आणि न्यू लिबरल क्लब असे आणखी दोन पक्ष जपानमध्ये आहेत. ते नेमस्त धोरणाचे आहेत. कोमेटो पक्ष स्वच्छ कारभाराचा पुरस्कर्ता असून त्याच्यावर बौद्ध संघटनांचा प्रभाव आहे. त्याने आपले बळ यावेळी २९ वरून ५५ पर्यंत वाढविले. न्यू लिबरल क्लब हा सत्तारूढ लिबरल डेमोक्रॅटिक पक्षातून फुटलेल्यांचाच पक्ष आहे. हा गट फुटला तेव्हा त्याचे फक्त पाच सभासद होते, पण निवडणुकीत १७ जागा या पक्षाने जिंकल्या.

विरोधी पक्षामध्ये धोरणाच्या बाबत एवढे मतभेद आहेत की, समान कार्यक्रमाची व धोरणाची आखणी करून सत्तारूढ पक्षाविरुद्ध हे पक्ष एकत्र येण्याची किंवा त्यांची संयुक्त आघाडी बनण्याची शक्यता दिसत नाही.

जपानमध्ये आणखी एक वर्षाने डाएटच्या वरिष्ठ सभागृहाच्या निवडणुका होणार आहेत. सत्तारूढ लिबरल डेमोक्रॅटिक पक्षाला आपली फूट साधण्यात आणि लॉकहीडने डागाळलेली प्रतिमा सुधारण्यात यश आले नाही तर त्याचा परिणाम पुढच्या वर्षाच्या निवडणुकीत दिसल्याशिवाय राहणार नाही. दोन वर्षांपूर्वी म्हणजे १९७४ साली झालेल्या वरिष्ठ सभागृहाच्या निवडणुकीत पक्षाने आपले बहुमत गमावले होते. जपानवरील या पक्षाच्या सत्तेच्या मक्तेदारीची दीर्घकालीन पकड सैल होण्यास तेव्हापासूनच सुरुवात झाली असे म्हणता येईल. पक्षाला सध्यापेक्षा अधिक अपयश पुढच्या वर्षी आले तर राजकीय अस्थिरतेत आणखी भर पडेल. जपानच्या घटनेप्रमाणे अंदाजपत्रक आणि परराष्ट्रांशी झालेले करार याशिवाय बाकी कोणतेही बिल वरिष्ठ सभागृह राखू शकते आणि त्या सभागृहाचा निर्णय कनिष्ठ सभागृहाला दोन तृतीयांश सभासदांच्या बहुमतानेच फिरविता येतो. कनिष्ठ गृहाच्या एकूण ५११ सभासदांपैकी दोन तृतीयांश म्हणजे ३४१ सभासदांचा पाठिंबा त्यासाठी सत्तारूढ पक्षाला मिळवायला हवा. त्यांचे सध्याचे पक्षबळ फक्त २४९ असल्याने आणखी ९२ सभासदांचा पाठिंबा मिळविणे त्यांना फार जड जाणार आहे. वरिष्ठ सभागृहाने फेटाळलेले बिल कनिष्ठ सभागृहात दोन तृतीयांश बहुमताने पास होऊ शकले नाही तर सरकारला राजीनामा देऊन नव्या निवडणुका घेणे भाग पडेल.

दीर्घकाळ सत्तेवर असलेल्या लिबरल डेमोक्रॅटिक पक्षाची सत्तेची मक्तेदारी गेली, पण त्याची जागा घेऊ शकेल असा तुल्यबळ विरोधी पक्ष जपानमध्ये अजूनपर्यंत संघटित होऊ शकलेला नाही आणि नजीकच्या काळातही असा पक्ष उभा राहण्याची शक्यता नाही. त्यामुळे अस्थिरता निर्माण होऊन तेथील संसदीय लोकशाहीच्या भवितव्याबद्दलच चिंता निर्माण झाली आहे. ही अस्थिरता दूर करता आली नाही तर जपानमध्ये पुन: लष्करी हुकूमशाही येण्याचा धोका आहे. ☐

# सोलकढी

## ☐ नायगाऱ्याला शिक्षा

आपल्या आंबल्याउबल्या, त्रासल्यातरसल्या जिवाला करमणुकवण्यासाठी माणसे किती रंगीतढंगीत गमतीजमती करत असतात. कोणी पान खातो, कोणी खूनबीन करतो, कोणी जांभया देतो, कोणी लेखणी झिजवतो, कोणी गरिबी हटहटावतो, कोणी चित्रपटे पाहतो, कोणी स्त्रीजातीचा अभ्यास करतो, कोणी हे करतो, कोणी ते करतो, कोणी हे ते करतो.

ब्रिटनमधल्या एका दारूच्या गुन्हाळातल्या चार कामगारांनी एका पिपाच्या आधारावर इंग्लिश खाडी पार केली आणि ते तसेच परत आले, असे करून त्यांनी दोन हजार पौंड मिळवले आणि ते कसल्यातरी भल्या कामाला देऊन टाकले. शाब्बास रे पठ्ठे. एका अमेरिकन तरुणाने पिपात बसून नायगारा धबधब्यातून स्वत:ला झोकून दिले. पुढे त्याला हेलिकॉप्टरचे साहाय्य घेऊन बाहेर काढावे लागले. पण त्याची करमणूक इथेच संपली नाही. त्याला चक्क शंभर डॉलर्स दंडाची शिक्षा झाली. त्याच्या या साहसी कृत्याने विधायक काहीच साधले नाही, म्हणे.

विधायक काहीच साधले नाही तर काय झाले, असे तुम्हाला-आम्हाला वाटेल. साहस हे कित्येक वेळा नुसते लख्ख साहस असते. ते काहीच साधत नाही; विधायक वगैरे तर मुळीच नाही; म्हणूनच पुष्कळ काही साधते, असे एका चिनी प्रवाशाने मराठीत लिहून ठेवले आहे. ते फार्फार खरे असावे, असे तुम्हीआम्ही म्हणू. पण विधायकव्यंकप्पांना ते पटणार नाही.

म्हणून त्या अमेरिकन तरुणाला शिक्षा झाली.

ती शिक्षा खरी त्या नायगारा धबधब्यालाच केली होती, हे लक्षात आले ना तुमच्या ?

*

## ☐ आता केव्हाही या म्हणावे

उडत्या तबकडीतला एक उडतारू माझ्या निरुद्देश भटकंतीमध्ये मला कसा भेटला, त्याने मला सलाम कसा ठोकला, त्याच्याकडच्या सिगारेटस संपल्या होत्या म्हणून आपली मोलाची कॅव्हेंडर सिगारेट मी त्याला कशी दिली, याची सुरस आणि चमत्कारिक हकीकत 'सोलकढी'तून मागे एकदा मी सांगितली होती. या हकीकतीचा आणखी तपशील सांगा, अशी जिज्ञासू विनंती करणारी शेकडो पत्रे महाराष्ट्रातून त्यावेळी मला आली होती. याशिवाय एक पत्र आले होते. ते आले होते फ्रान्समधून. 'माणूस'चे आणि फ्रान्सचे संबंध विशेष स्नेहसलोख्याचे असल्यामुळे कोण्या वाचकाने हे पत्र पाठवले असेल असे मला सुरुवातीला वाटले. पण तसे नव्हते. म्हणजे पत्र लिहिणाऱ्याने 'सोलकढी' वाचली नव्हती असे नाही. वाचली होती. तरी त्याने तिच्यातल्या रम्य हकीकतीचा आणखी तपशील सांगा, अशी विनंती केली नव्हती. उलट मलाच काही तपशील पुरवला होता. त्यालासुद्धा माझ्यासारखाच एक उडतारू भेटला होता. त्यामुळे त्याच्यात आणि माझ्यात एक रहस्यमय नाते निर्माण झाले.

मध्यंतरी माझ्या वाढदिवशी घरातल्या एका रिकाम्या फुलदाणीत फुले आली. कोणी न आणता; न पाठवता. फुले अजून कोमेजली नाहीत. त्यांना मोठा मोहक सुगंध आहे. रात्री ती चिमुकल्या चांदण्यांसारखी चमचमतात. ही फुले माझ्या त्या अनामिक उडतारू दोस्ताने पाठवली असली पाहिजेत याविषयी माझी खात्री झाली आहे. या नव्या परग्रहस्थ दोस्ताला घरी बोलवावे आणि बासमती तांदुळाचा भात आणि कुळथाचे पिठले आणि कांद्याची भजी खायला घालावी असे माझ्या फार्फार मनात आले. (आपली ही पृथ्वी सोडून इतर कोणत्याही ग्रहावर बासमती तांदूळ आणि कांदे आणि कुळीथ होत नाहीत असे मोठमोठे युफोलॉजिस्ट सांगतात. अरेरे. अरेरे.) पण त्याच्याशी संपर्क कसा साधावा ते कळेना. तोपर्यंत, त्याची उडती तबकडी उतरण्यासाठी एखादा सोयिस्कर तबकडीतळ शोधावा हे बरे, असे म्हणून मी त्या कामाला नेहमीच्या तडफेने लागलो.


इतक्यात त्या फ्रान्सस्थ मित्राचे पत्र आले. त्यातल्या मजकुराप्रमाणे नैर्ऋत्य फ्रान्समधल्या एरे या गावी सुसज्ज असा तबकडीतळ बांधून तय्यार आहे. बोर्दो विमानतळावरच्या एका इलेक्ट्रॉनिक्सतज्ज्ञाने या बाबतीत पुढाकार घेतला होता.

एकूण असे की

आमच्याकडून सगळी तयारी आहे.

आता केव्हाही या, म्हणावे.

— अनंतराव



माणूस दिवाळी अंकात पुनर्जन्मासंबंधी शास्त्रीपंडितांशी झालेल्या मुलाखतींवर आधारित एक प्रदीर्घ लेख प्रदीप गोखले यांनी लिहिला होता.
या विषयाचा आणखी मागोवा...

# शास्त्रज्ञांच्या दृष्टिकोनातून पुनर्जन्म

**प्रदीप प्रभाकर गोखले । शरद कवठेकर**

पुनर्जन्म हा भारतीयांच्या श्रद्धेचा आणि जिव्हाळ्याचा विषय आहे. इतकेच नव्हे तर पुनर्जन्म आहे असे भल्याभल्या चिकित्सकांनाही मानायला लावणारे पुरावे बहुसंख्येने भारतात उपलब्ध होतात. स्टिव्हन्सन या अमेरिकन मानसशास्त्रज्ञाने एकूण दीड हजार केसेसचा अभ्यास केला आहे. त्यापैकीही बहुसंख्येने भारत व भारताशेजारील भारतीय संस्कृतीशी मिळतीजुळती संस्कृती असलेल्या देशातील आहेत. बंगलोर येथील नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरोसायन्सेस ही संस्था पुनर्जन्माच्या म्हटल्या जाणाऱ्या केसेसचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्याबाबत कार्यरत आहे.

मी व माझा मित्र शरद कवठेकर यांनी तेथील शास्त्रज्ञांकडून ते कोणत्या निष्कर्षाप्रत आले आहेत, हे समजावून घेण्यासाठी त्या संस्थेला भेट देण्याचे ठरविले.

प्रथम पत्रद्वारा इच्छा प्रदर्शित करून आम्ही असेही कळविले की, काहीतरी सनसनाटी लिहिणे हा आमचा उद्देश नसून स्वतःच्या ज्ञानात भर घालणे हा आहे. सोबत आम्ही काही प्रश्नही पाठविले आणि या व अशा प्रश्नांबाबत आम्हाला मुख्यत्वेकरून माहिती हवी आहे असे कळविले.

ते प्रश्न असे होते–

'कशा प्रकारची उदाहरणे तुम्ही पुनर्जन्म सुचविणारी अस्सल उदाहरणे म्हणून स्वीकारता ?

'तपासलेल्या उदाहरणांची संख्या किती ?'

'ख्रिश्चन व हिंदू समाजात घडणाऱ्या मरणोत्तर अस्तित्व सूचित करणाऱ्या उदाहरणांत काही वस्तुभूत किंवा तरतमवाचक (Categorical or in degree) फरक दिसतो का ?'

'एखादे उदाहरण हे पुनर्जन्माचेच आहे, दूरवस्तूसंवेदन (Clairvoyance) किंवा परचित्तसंवेदनाचे (telepathy) नाही हे ठरवायला कसोटी काय ?'

'सर्वसामान्यांकडून, धार्मिक लोकांकडून, तथाकथित 'बाबा', 'योगी' लोकांकडून, इतर क्षेत्रांतील वैज्ञानिकांकडून तुम्हाला प्रतिसाद कशा प्रकारचा मिळतो ?'

'वर्तनवादी (behaviourist) विचारसरणीचे मानसशास्त्रज्ञ हे परामानसशास्त्राकडे (Parapsychology) दुर्लक्षच करतात असे नाही तर परामानसशास्त्र हे एक मिथ्याशास्त्र आहे, असेही समजतात असे ऐकिवात येते. हे कितपत खरे ? खरे असल्यास त्याचे कारण काय ?'

'कशा प्रकारची माणसे तुमचा अभ्यासविषय असतात ? सर्वसाधारण मनोवृत्तीची ? की असामान्य (abnormal) ? तो मनुष्य अतीन्द्रिय अनुभूतीच्या अवस्थेत (Trance) असताना व त्याच्या हालचाली सर्वसाधारण हालचालींपेक्षा वेगळ्या होत असताना त्याचे म्हणणे हे तुम्ही प्रामाणिक आत्मकथन कसे मानू शकता ?'

इन्स्टिटयूटमधील मानवशास्त्रविभागाचे प्रमुख डॉ. एच्. नारायण मूर्ती हे एक शांत, प्रसन्न व रसिक व्यक्तिमत्त्वाचे गृहस्थ आहेत. इन्स्टिटयूटमधील त्यांच्या चेंबरमध्ये आम्ही प्रवेश केला तेव्हा त्यांनी आमचे स्वागत केले आणि अभिनंदनही. त्यांच्या मते अनेकदा पत्रकारांचा– जे सर्वसामान्यांशी संपर्क ठेवून असतात– त्यांचा दृष्टिकोन हा सनसनाटी बातम्या मिळविण्याचा व मिळालेली बातमी ही भडक आणि वरवरची करून सांगण्याचा असतो असा त्यांचा व्यक्तिशः अनुभव होता. त्याला आम्ही अपवाद ठरलो.

ते म्हणाले, 'याउलट काही शास्त्रज्ञ म्हणविणारे लोकही प्रसिद्धीच्या आकर्षणाला बळी पडतात. एखादी सिद्धान्तकल्पना ही समर्थनीय वाटली तरी लगेच पत्रकारपरिषदेत महान शोध लावल्याचा गवगवा करणे हे खऱ्या शास्त्रज्ञाला शोभत नाही. वैज्ञानिकांनी सर्वसामान्यांची दिशाभूल करता कामा नये. खुराणासारखा जागतिक सन्मान मिळालेला शास्त्रज्ञ– त्यानेही आपले संशोधन प्रथम शास्त्रज्ञांच्या संसदेपुढे मांडले व तेथे ते निर्विवाद ठरल्यावर मगच जगापुढे मांडले. याउलट बेंगलोरमध्येच दोन–अडीच वर्षांपूर्वी एका डॉक्टरने पत्रकारपरिषदेपुढे निवेदन दिले की, फिट्स येण्यावर एक आयुर्वेदिक रामबाण औषध त्याने शोधले आहे. पण अनेकवार प्रयोग करून निदान साठ टक्के रोग्यांवर तरी ते यशस्वी ठरले तरच त्याविषयी काही विश्वासाने बोलणे शक्य आहे. तसे त्याने केले नाही. आमचा दृष्टिकोन मात्र असा नाही. कुठल्याही भौतिक विज्ञानातील शोध जितक्या काटेकोर निकषांवर घासले जातात तितक्या काटेकोर

निकषांवर पुनर्जन्माचा सिद्धांत घासला गेला व खरा ठरला तरच आम्ही तो मानू. शास्त्रीयदृष्ट्या आवश्यक व पुरेशी काळजी आणि सावधगिरी न ठेवताच जर एखादा 'सिद्धान्त' आमच्यापुढे मांडला गेला तर आम्ही तो कचऱ्याच्या टोपलीत टाकतो.

'स्टिव्हनसन यांनी पुनर्जन्माच्या केसेसवर प्रचंड संशोधन केले आहे व ते माझे चांगले मित्रही आहेत. पण त्यांच्या व माझ्या याबाबतीतील दृष्टिकोनांत फरक आहे. शेकडो उदाहरणांचा अभ्यास केल्यावर त्यांना असे वाटते की या उदाहरणांच्या स्पष्टीकरणार्थ पुनर्जन्मसिद्धांत स्वीकारणे हेच त्यातल्या त्यात समर्थनीय दिसते. मी मात्र अजून असे म्हणावयास तयार नाही. मी 'पुनर्जन्माची समजली जाणारी उदाहरणे' अशा भाषेत बोलतो. किंवा पुनर्जन्म (reincarnation) हा शब्द अवतरणचिन्हात घालतो. माझा असा विचार आहे की आपण या दृष्टीने संशोधन करू या की, पुनर्जन्माऐवजी दुसरी एखादी सिद्धान्तकल्पना या उदाहरणांचे समर्थन करू शकेल की नाही? पुनर्जन्माचा म्हटला जाणारा सिद्धान्त वैज्ञानिक परिभाषेत मांडून आपण त्याची शास्त्रीय पुनर्रचना करू शकू की नाही?

'उदाहरणार्थ योग ही वस्तुस्थिती आहे. पण वैज्ञानिकांना केवळ तेवढेच म्हणून चालणार नाही तर आधुनिक वैज्ञानिक परिभाषेत त्याचे शब्दांकन करावे लागेल.

'विज्ञानाच्या तत्त्वज्ञानाचा (philosophy of science) विचार केला तर प्रत्यक्षणीयतेच्या तत्त्वाला (principle of verifiability) महत्त्व आहे. तथापि विज्ञानात सर्वत्र अशी प्रत्यक्षणीयता– प्रत्यक्षप्रमाणाने पडताळा घेता येण्याची क्षमता दिसतेच असे नाही. जगातल्या काही घटना का घडतात त्याचे तर्कशास्त्र मांडता येते. परंतु त्या कार्यकारणभावाचा प्रत्यक्ष पडताळा मात्र घेता येत नाही. उदाहरणार्थ, आमच्याकडील मनोविश्लेषणाची शाखा अशीच आहे. तर्कशास्त्रानुसार मनोविश्लेषणशास्त्र मान्य होऊ शकते. पण त्या शास्त्रात प्रत्यक्षणीयतेचे स्थान अत्यल्प असते. त्यामुळे एकीकडे वर्तनवाद्यांचा अग्रणी स्किनर व त्याचे अनुयायी आणि दुसरीकडे मनोघटनावाद्यांमधील (phenominologists) अग्रणी फ्रॉइड, युंग व त्यांचे अनुयायी या दोघांमधून आजचे मानसशास्त्र वाट काढीत आहे.'

मी विचारले, 'विज्ञानात सर्वत्र प्रत्यक्षणीयता नसली तरी वास्तविक म्हणून विश्वसनीयता (confirmability) तरी असलीच पाहिजे ना?'

'होय.'

तोच अजून काही लोक त्यांच्या खोलीत आले व त्यांना दुसरे काम निघाल्याने त्यांनी डॉ. सौ. विनोदा एन्. मूर्ती यांच्याशी ओळख करून दिली व याच तुमच्या प्रश्नांची उत्तरे देतील असे सांगितले. नंतरच्या प्रश्नोत्तरात माझे चुलतेही (श्री. व्ही. व्ही. गोखले) सामील झाले होते.

डॉक्टरबाईंनी निवेदन सुरू केले, 'पुनर्जन्म सूचित करणाऱ्या ज्या अस्सल केसेस धरल्या जातात, त्यांच्यातल्या बऱ्याचशा केसेस अशा असतात–एखाद्या कुटुंबातील एखाद्या मुलाची वागणूक सर्वसाधारण मुलांपेक्षा वेगळीच असते. इतरांपेक्षा त्याच्या प्रवृत्ती वेगळ्या आणि अनपेक्षित असतात. अर्थात एवढ्यावर थांबत नाही. कालांतराने ते मूल आपली ओळख वेगळी सांगू लागते. 'मला अमुक नावाने हाक मारू नका, तमुक नावाने हाक मारा,' असे काही मुले सांगतात व त्यांचे 'तमुक' नाव हे तथाकथित पूर्वजन्मीचे नाव असते. एखादा चार–पाच वर्षांचाच मुलगा किंवा मुलगी या जन्मी जी भाषा शिकण्याची सुतराम शक्यता नाही, अशा भाषेत बोलू लागते. त्याच्या केवळ बोलण्यातच बदल होतो असे नाही, तर वागणुकीचा ढंग, रीतिरिवाज हेही वेगळेच असल्याचे जाणवते. एखाद्या केसमध्ये मुलगा मध्यरात्री झोपेतून उठतो आणि विशिष्ट दिशेने रस्त्यातून चालू लागतो. हेच पुनःपुन्हा घडते व चालण्याची दिशाही तीच असते. त्या वेळी हे वागणे विक्षिप्तपणाचे वा विकृत वाटते. पण पुढे पुढे तो मुलगा सांगू लागतो की, त्याच दिशेने गेल्यावर त्याचे खरे गाव लागते आणि त्याच्या पूर्वजन्मातील गावाच्या आणि घराच्या खाणाखुणा सांगू लागतो.

'अशा केसेसमध्ये आमच्यासारख्यांचे काम त्या व्यक्तींपर्यंत पोहोचणे, स्वतः त्या व्यक्तीकडून व त्याचे नातेवाईक, शेजारी यांच्याकडून त्यांच्या वागणुकीचे जास्तीत जास्त तपशील मिळविणे. हे तपशील पुन्हा ती ती माहिती सांगणाऱ्यांच्या वैयक्तिक इच्छा–आकांक्षा, भ्रम यांनी दूषितही झालेली असू शकते. त्यामुळे ती माहिती दूषित नाही ना, याची खात्री करून घेणे हे एक आवश्यक काम असते. त्या व्यक्तीच्या–हालचाली पाहणाऱ्या जवळजवळ प्रत्येकाचीच मुलाखत घ्यायची असते व टेपरेकॉर्डर वगैरे साधनांचा वापर करावा लागतोच. माहिती मिळविल्यानंतर दुसरे महत्त्वाचे काम म्हणजे त्या व्यक्तीच्या पूर्वजन्माविषयी जे तपशील माहितीतून कळले असतील त्यांचे ज्ञान तिला अन्य मार्गाने झाले नसेल ना, याविषयी खात्री करून घेणे व अशा रीतीने वर्जनप्रक्रिया (process of elimination) वापरून त्यातल्या त्यात विश्वसनीय माहिती कोणती होईल ती बाजूला काढणे. त्यानंतरचा तिसरा महत्त्वाचा भाग म्हणजे ते तपशील खरोखरच एखाद्या मेलेल्या व्यक्तीच्या तपशीलाशी जुळतात का ते पडताळून पाहणे. कधी कधी हे तपशील अक्षरशः तंतोतंत जुळलेले आहेत. उदाहरणार्थ, एका मुलाने पूर्वजन्मीची हकीकत अशी सांगितली की, त्याने एका माणसाचा खून केल्यावरून त्याला फाशीची शिक्षा झाली होती. त्याने जे पूर्वीचे नाव, फाशीची जागा, तारीख इत्यादींचे वर्णन सांगितले, त्याबरहुकूम त्या ठिकाणच्या तुरुंगाच्या फाशी-रेकॉर्डमध्ये नोंदी आढळल्या; त्याने खुनाची जी माहिती सांगितली, त्यानुसार पोलीस-रेकॉर्डमध्ये नोंदी आढळल्या.

'तपशीलांची छाननी व तपासणी केल्यावर आमचे काम त्या केसचा विचार दुसऱ्या एखाद्या सिद्धान्तानुसार (अतींद्रिय संवेदन–extra–sensory perception वगैरे) होऊ शकेल काय, हे पाहणे हे असते. अस्सल पुनर्जन्मसूचक केसमधील व्यक्तीला जे या जन्मी तिने कधीच न पाहिलेल्या वस्तूंचे, घटनांचे ज्ञान होते, ते निश्चितपणे भूतकाळातीलच वस्तूंचे व घटनांचे ज्ञान असते. उदाहरणार्थ, एखादे बालक पूर्वजन्मीच्या घरातील फर्निचरचे जे वर्णन करते, ते वर्णन पूर्वीच्या फर्निचरलाच लागू असते. आता जर त्या घरात फर्निचर नसेल, किंवा वेगळ्या प्रकारे मांडलेले असेल तर त्याचे दूरवस्तुसंवेदन

त्या बालकाला होणार नाही. त्या घरात गेल्यावरही ते पूर्वीच्याच काळात असल्याप्रमाणे बोलेल व येथील फर्निचरची हलवाहलव का केली, असे विचारेल.'

'पण भूतकाळातील घटनेचे ज्ञान हाही एक अतींद्रिय शक्तीचाच प्रकार आहे ना?' काकांनी विचारले.

'पण तीही शक्ती या व्यक्तींमध्ये इतर बाबतीत सापडत नाही. फक्त ठराविक बाबतीतच आणि त्या त्या वस्तूंशी, घटनांशी आपला काही अतुट संबंध आहे, असेच त्या व्यक्तींचे सांगणे असते. तेव्हा अतींद्रिय शक्तीच्या माणसासारखे या माणसाचे एकूण वर्तन दिसत नाही. त्यामुळे वेगळा सिद्धान्त कल्पावा लागतो.

'पूर्वजन्मसूचक उदाहरणांचा दुसरा प्रकार जो स्वीकारला जातो, तो संमोहन हा होय. संमोहननिद्रेच्या अवस्थेत संमोहित व्यक्तीला भूतकाळातील जीवन आठविण्यास सांगितले जाते व संमोहन हे जसजसे जास्त सखोल होत जाते (deeper trance), तसतसे ती व्यक्ती या जन्मापूर्वीच्या भूतकाळातील घटना सांगू लागते. अशा एका केसवर 'ब्रायडी मर्फी' (लेखक-बर्नस्टाईन) पुस्तकच निघाले आहे. या केसमधील मर्फी ही मुलगी सखोल संमोहनावस्थेत आयरिश भाषा बोलू लागते की, जिचे संस्कार तिच्यावर या जन्मात झालेले नसतात. संमोहनाच्या प्रयोगांच्या उपयुक्ततेवर आक्षेप घेऊन असेही युक्तिवाद केले जातात की, एक तर त्या संमोहित व्यक्तीवर दुसरे एखादे व्यक्तिमत्त्व लादले जात असेल, किंवा ज्याला वांशिक स्मृती म्हणतात (genetic memory, पूर्वजांच्या स्मृती वंशजामध्ये संक्रान्त होऊन संमोहनावस्थेत तिचे जागरण होणे), तिचे जागरण होत असेल किंवा एरवी खंडित झालेली, लुप्त स्मृती अचानक जागृत होत असेल (cryptomnesia). पण पूर्वजन्मसूचक अस्सल उदाहरणांचा अभ्यास केल्यावर हे तीनही संभवत नसल्याचे दिसून येते. एक तर संमोहित व्यक्तीला दुसरे व्यक्तित्व स्वीकारण्याचे कुठलेही आदेश दिलेले नसताना ती व्यक्ती तसे निवेदन करत असते. ती जर वांशिक स्मृती असेल तर पूर्वजांच्याच जीवनात घडलेल्या घटनांची स्मृती असेल. पण प्रत्यक्षात मात्र ज्याच्याशी नाव-गाव-कुळपरंपरा यांचा संबंध नाही, अशा एखाद्या व्यक्तीच्या जीवनातल्या घटना ही संमोहित व्यक्ती स्वतःच्या (पूर्व-)जीवनातील घटना म्हणून सांगत असते. तेव्हा ही वांशिक स्मृतीही नाही. हे स्मृतीच्या आकस्मिक जागरणाच्या सर्वसाधारण उदाहरणांसारखेही उदाहरण नाही, कारण यात ज्यांचे स्मरण घडते त्या घटना त्या व्यक्तीच्या चालू जन्मात घडलेल्या नाहीत.

'अर्थात या प्रकारचे प्रयोग लहान मुलांबाबतच यशस्वी ठरू शकतात. कारण पूर्वीच्या जन्मानंतर त्यांचा मधला काळ कमी लोटलेला असतो. आणि या संमोहनाच्या प्रयोगाला इतरही मर्यादा पडतात. कारण एक तर त्याचे सामान्यीकरण (generalization) करता येत नाही. सर्वांचेच संमोहन करता येते असे नाही. त्यासाठी विशिष्ट संवेदनक्षमताच असावी लागते व ज्यांचे संमोहन होऊ शकते ते सखोल संमोहनावस्थेत पूर्वजन्मसूचक संदेश देऊ शकतातच असेही नाही. पुन्हा ज्यांना सखोल संमोहनावस्थेत अशा प्रकारे पूर्वजन्माचे स्मरण होते, त्यांचे ते स्मरण तेवढ्यापुरतेच राहते. संमोहनावस्थेतून बाहेर आल्यावर त्यांचे स्मरण टिकत नाही.

'पुनर्जन्मसूचक उदाहरणे जाणून घेण्याचे आणखी एक साधन वापरले जाते. ते म्हणजे (अतीत-) संवेदनक्षम व्यक्ती (sensitives) आणि ज्यांचा मृतात्मे हे संवाद साधण्यासाठी माध्यम म्हणून उपयोग करतात अशा व्यक्ती (mediums) यांच्याकडून पूर्वजन्माविषयी माहिती मिळविणे. पण यातून मिळणारी माहिती बहुधा खूप पूर्वीची असते व अस्पष्टही असते. त्यामुळे ती माहिती वस्तुस्थितीशी पडताळून पाहणे अवघड होते, कधीकधी अशक्यही.

'काही योगी पुरुष स्वतःच्या 'पूर्वजन्मीची' म्हणून काही हकीकत पुरवितात. परंतु तीत इतर मार्गांनी मिळालेली माहिती घुसडलेली असण्याचीही शक्यता असते. एकंदरीत पाच वर्षेपर्यंतची मुले हीच पूर्वजन्मविषयक हकीकती कळण्याची त्यातल्या त्यात विश्वसनीय माध्यमे असतात. त्यानंतर मूल जी माहिती पुरवते, ती काटछाट, नवीन भर यामुळे बिघडलेली (distarted) असू शकते.

'डॉ. स्टिव्हन्सन यांनी जवळजवळ दीड हजार अस्सल केसेस अभ्यासल्या आहेत. त्यांतल्या एकतृतीयांश त्यांनी व्यक्तिशः भेट देऊन अभ्यासल्या आहेत व त्यांपैकी किमान चाळीस-पन्नास केसेस तरी परिपूर्णपणे अभ्यासलेल्या व विश्वसनीय ठरलेल्या आहेत. या जगभरच्या केसेस आहेत. आमच्या इन्स्टिट्यूटकडून साठ केसेस तपासल्या गेल्या आहेत. इन्स्टिट्यूटतर्फे हे काम सुरू झाल्याला दोन-तीन वर्षेच लोटली. नुकतेच एका पंजाबी विद्यार्थिनीने याच विषयावर संशोधन करण्यासाठी वाहून घेण्याचे ठरविले आहे व तिनेही काम सुरू केले आहे. तिचे काम अर्थातच बिकट आहे. अशा एखाद्या केसची माहिती लागताच तेथे (बहुधा खेड्यातच) जावे लागते. तेथील गावकऱ्यांना सामोरे जाऊन आपले काम करावे लागते. पण हे सारे ती जिद्दीने करीत आहे. ज्यावेळी पूर्वजन्म आठविणाऱ्या व्यक्तीकडून साक्षात माहिती काढून घ्यायची असते, त्यावेळी गावकरीच त्यांच्या मनाप्रमाणे प्रश्नांना उत्तरे देऊन संशोधकांचे काम बिकट करतात. यावर आम्ही एक युक्ती योजली. एकाच वेळी सात आठजण आम्ही प्रश्नकर्ते म्हणून बरोबर घेऊन जातो. प्रत्येकजण त्याच्याजवळच्या एकेका गावकऱ्याची मुलाखत स्वतंत्रपणे घेऊ लागतो व त्याचवेळी एकजण त्या पूर्वजन्म आठविणाऱ्या व्यक्तीची मुलाखत घेतो. त्यामुळे त्या व्यक्तीभोवतालची गर्दी पांगते.

'ही माहिती घेतल्यानंतर ती माहिती अभ्यासासाठी वापरण्याची, व नाव बदलून प्रसिद्ध करण्याची परवानगी घ्यावी लागते.'

'अशी परवानगी घेणे आवश्यक असते?' शरदने विचारले.

'होय. एरवी ते बेकायदा होईल. शिवाय या माहितीची रेकॉर्ड्स ठेवताना व माहिती प्रसिद्ध करताना व्यक्तींची नावे, गावांची नावेही बदलली जातात, बदलावी लागतात. त्यामुळे त्या व्यक्तींना इतरांकडून होणारा त्रास टळू शकतो. या केसेसचा गाजावाजा झाला, तर त्यात गुंतलेल्या मुलांचा काही संधिसाधूंकडून गैरवापरही होऊ शकतो.'

'या केसेस ज्या समाजात सापडतात त्या समाजाच्या संस्कृतीत पुनर्जन्मावरील श्रद्धा ही प्रचलित असते असे आढळते का?' माझा प्रश्न

'होय. सर्वसाधारणपणे तसे दिसते. एक मुलगा पूर्वजन्मी हिंदू असल्याचे सांगत होता व या जन्मी तो ख्रिश्चन कुटुंबात जन्मला होता. त्याचे या जन्मीचे ख्रिश्चन कुटुंबसुद्धा ज्या परिसरात होते, त्यात पुनर्जन्माची श्रद्धा मानणारे सांस्कृतिक वातावरण प्रभावी होते.'

‘काय हो, पूर्वजन्मी ख्रिश्चन आणि या जन्मी हिंदू अशी एखादी केस तुमच्या आढळात आली का?’ मी विचारले.

‘नाही. कदाचित एखादी असेल, पाहावे लागेल. पण जन्म बदलताना धर्म, वंश, जात इतकेच नव्हे तर लिंग बदलल्याचीही उदाहरणे आहेत.’

‘मनुष्याचा पूर्वजन्म एखाद्या अन्य प्राण्याचाही असू शकेल. तशा प्रकारची एखादी केस तुमच्या आढळात आली आहे का?’ काकांचा प्रश्न. ‘चार पाच केसेस तशाही मिळाल्या. एका केसमध्ये एका माणसाने पूर्वजन्म एका पक्ष्याचा असल्याचे सांगितले. पण अशा केसेसमध्ये एकतर माहिती अस्पष्ट व अपुरी असल्याने व वस्तुस्थितीशी ती माहिती पडताळून पाहणे अशक्य होतु असल्याने या केसेस आम्ही पुरावा म्हणून विचारात घेऊ शकत नाही. पूर्वीचा मनुष्यजन्मच असेल तरच पडताळा पाहता येतो.

‘अशा प्रकारची स्टिव्हनसन यांनी अभ्यासलेली एक विलक्षण केस सांगण्यासारखी आहे. या केसमधील मुलगा मरून पुन्हा त्याच देहात पण वेगळ्या माणसाचे व्यक्तिमत्त्व घेऊन जन्माला आला (Revival from death). स्टिव्हनसन यांनी त्यांच्या ‘Twenty Cases Suggestive of Reincarnation’ या ग्रंथात या केसचे वर्णन दिले आहे व त्यात त्यांनी या केसला Exchange - incarnation (आत्मविनिमय) असे संबोधले आहे.

‘जस्वीर हा मुलगा उत्तरप्रदेशातील एका जाठ कुटुंबात जन्मला. तो साडेतीन वर्षांचा असतानाच त्याला देवी रोग जडला व त्यातच तो मरण पावला. त्याचे वडील आपल्या भावाला व इतरांना जस्वीरच्या दफनासाठी बोलावण्यास म्हणून गेले. ती मध्यरात्रीची वेळ असल्याने त्यांनी दफन सकाळवर ढकलले. काही तासांनंतर जस्वीरच्या मृतदेहात हालचाल सुरू झाली. हळूहळू ती हालचाल स्पष्ट झाली व जस्वीर पुरता जिवंत झाला. काही दिवस त्याला बोलता येत नव्हते. परंतु जेव्हा तो बोलू लागला, तेव्हा त्याची सगळीच वागणूक बदललेली होती. तो स्वतःला वेदेही गावचा त्यागी नावाचा ब्राह्मण म्हणवून घेऊ लागला व तिकडे जाण्याची इच्छा प्रदर्शित करू लागला जाठ कुटुंबातील नेहमीचा मांसाहार घेण्यास त्याने नकार दिला.त्यामुळे शेजारच्या ब्राह्मण कुटुंबांतून त्याच्यासाठी शाकाहारी अन्न आणले जाऊ लागले. दीड वर्षपर्यंत हा क्रम चालू होता. जेव्हा त्याच्या जाठ कुटुंबातील माणसे एखाद्या दिवशी घरचेच अन्न जस्बीरला फसवून खाऊ घालीत तेव्हा ते तत्काळ त्याच्या लक्षात येई. तो वेदेहीमधील स्वतःच्या जीवनातील हकीकतीही सांगू लागला, जस्वीरच्या वडिलांनी ही माहिती दाबण्याचा प्रयत्न केला. पण बातमी पसरलीच. एक दिवस योगायोगाने वेदेही गावातील एका ब्राह्मणाची पत्नी काही कामानिमित्त या गावात आली. ती जस्त्रीरच्या दृष्टीस पडताच जस्बीरने तिला ‘आत्या’ म्हणून ओळखले. त्या बाईने हा प्रसंग वेदेही गावात जाऊन सांगितला व जस्बीरने सांगितलेल्या वेदेही गावातील स्वतःच्या जीवनासंबंधीच्या आठवणीही तेथील ‘त्यागी’ कुटुंबात जाऊन सांगितल्या. त्या जवळजवळ जुळल्या. नंतर वेदेहीच्या लोकांनी त्याची भेट घेतली व त्याला वेदेहीला नेले. जस्बीरने गावाच्या व त्यागी कुटुंबाच्या वाड्याच्या खाणाखुणा बरोबर दाखविल्या. वेदेही गावात तो खूप दिवस रमला. अजूनही त्याला वेदेहीतच राहावेसे वाटते. जाठ कुटुंबात त्याला गुदमरल्यासारखे होते.

‘ही एक इतर केसेसपेक्षा वेगळी केस आहे. कारण जस्बीर साडे-तीन वर्षे होईपर्यंत जस्बीर म्हणूनच वावरला. त्यात त्याला काहीच विचित्र वाटले नाही. साडेतीन वर्षे झाल्यावर तो मेला व पुन्हा जन्मला (जिवंत झाला) तेव्हा शरीरात फरक न पडता त्याच्या तथाकथित ‘आत्म्यात’ फरक पडला. त्यामुळे स्टिव्हनसन यांनी याला आत्मविनिमय (Exchange-incarnation) असे नाव दिले आहे.

‘या व अशा केसेस हा पुनर्जन्माची सिद्धांतकल्पना सिद्ध करणारा प्रबळ पुरावा ठरेल, असे स्टिव्हनसन यांना वाटते. तसेच त्यांना असेही वाटते की, हा सिद्धान्त मानल्यास एकूण मानवी वर्तनाच्या अभ्यासालाही एक नवीन दिशा मिळेल. परंतु अशा केसेसमध्ये हा सिद्धान्त मानणे आम्हाला अडचणीचे वाटते. पुनर्जन्माचा सिद्धान्त जसाच्या तसा मानणे म्हणजे मनुष्य मेल्यावर त्याचा जीवात्मा (soul) बाहेर पडून पूर्वीच्या संस्कारांसकट कालांतराने दुसऱ्या शरीरात प्रवेश करतो असे मानणे, पण तसे आम्ही अद्याप मानायला तयार नाही. माणसाला जीवात्मा म्हणून असतो का, असला तर त्याचे कार्य (function) कशा प्रकारचे असते, तो शरीरातून बाहेर पडतो की पडत नाही, याविषयी आम्ही निश्चित असा कुठलाच सिद्धांत सध्या मांडू शकत नाही. माणूस मेल्यापासून दुसऱ्या माणसात ‘तोच मी होतो’ अशी जाणीव उत्पन्न होण्यापर्यंतच्या काळात नेमके काय घडलेले असते की ज्यामुळे अशी जाणीव होते, ते शास्त्रज्ञांना अजून कळलेले नाही. याबाबत सिद्धान्त कल्पना अनेक मांडल्या गेल्या आहेत. काहीजण आत्मा हा एखाद्या ऊर्जेच्या (psychical energy) स्वरूपात असावा असे म्हणतात, तर काहीजण चुंबकीय क्षेत्राची (magnetic field) परिभाषा वापरतात, तर काहीजण विद्युत्चुंबकीय क्षेत्राची (electromagnetic field) परिभाषा वापरतात. काही म्हणतात की विश्वकिरणांच्या (cosmic rays) प्रभावामुळे पूर्वजन्मसंवेदनासारख्या घटना घडतात. आत्म्याऐवजी मेंदूतील लहरींच्या बंधाचे (brain-wave-pattern) हे कार्य मानणे असाही एक विचारप्रवाह आहे. परंतु यांपैकी कुठलीही एक सिद्धान्त कल्पना आम्ही ग्राह्य धरलेली नाही. भारतात याबाबत संशोधन करणारे जे थोडे लोक आहेत त्यांत अनेकजण कुठली तरी सिद्धान्त कल्पना गृहीत धरण्याच्या प्रवृत्तीचे आहेत. त्याविरुद्ध शंका उपस्थित करण्याच्या प्रवृत्तीचे फारसे कोणी नाही. नव्या तरुणांमध्ये मात्र प्रश्न विचारण्याची प्रवृत्ती याही क्षेत्रात आढळून येत आहे, ही समाधानाची गोष्ट आहे,

‘एक गोष्ट खरी आहे की, मानसशास्त्रातील इतर शाखांच्या संशोधकांनासुद्धा परामानसशास्त्रातील संशोधनाचे फारसे महत्त्व वाटत नाही. पण याचे कारण परामानसशास्त्रातील संशोधनाने संशोधन म्हणून अद्याप पाय रोवलेलेच नाहीत.’

‘राजस्थानात परामानसशास्त्रविषयक एक संस्था आहे ना? तिथेही याविषयी काम करणारे संशोधक आहेत, असे मी ऐकले आहे.’ काकांनी विचारले.

‘तुम्ही प्रोफेसर बॅनर्जींविषयी म्हणत आहात ना? त्यांना त्यांचे संशोधन सक्तीने बंद करावे लागले. कारण त्यांची पद्धत अशास्त्रीय होती. आणि हे उघडकीला आल्याने आन्तरराष्ट्रीय मानसशास्त्रीय

संस्थेने त्यांची मान्यता काढून घेतली. त्या ठिकाणी तर रूममध्ये बसल्याबसल्याच केसेस तयार केल्या गेल्या होत्या. राजस्थानमधल्या संस्थेचीच ही परिस्थिती नाही तर या क्षेत्रातील स्वतंत्र कर्तृत्वाबद्दल ज्या प्रोफेसर ऱ्हाईनचे नाव प्रसिद्ध आहे त्याच्या हयातीनंतर त्याच्या इन्स्टिटयूटमध्ये असलेच प्रकार झाले. पुनर्जन्माच्या केसेस नोंदविताना, मुलाखती घेताना विशिष्ट उत्तरे मिळतील अशाच रोखाने प्रश्न विचारणे (leading questions) व सिद्धांताला अनुकूल असा सर्व तपशील रचून तयार करणे असले प्रकार झाले व त्यामुळे घटनांचे रिपोर्टस् वस्तुनिष्ठ झाले नाहीत.

'तुम्ही विचारले आहे की सर्वसामान्य माणसे, 'बाबा', 'योगी' शास्त्रज्ञ, यांचा प्रतिसाद कसा असतो. आम्ही मुद्दामहून पत्रे वगैरे लिहून प्रतिक्रिया मागविलेल्या नाहीत. परंतु आमचे या क्षेत्रातील निर्णायक असे कार्य फारसे झालेलेच नसल्याने फारशी प्रतिक्रिया न उमटणे साहजिक आहे. इतर क्षेत्रांतील शास्त्रज्ञांपुढे मांडावे असे कामही झालेले नसल्याने त्यांच्या प्रतिक्रियेचाही प्रश्न आलेला नाही.

'पुढे तुम्ही असे विचारले आहे की पूर्वजन्म आठवणाऱ्या व्यक्तीची मनःस्थिती असामान्य वा विकृत (abnormal) असेल तर त्याचे म्हणणे प्रामाणिक कसे मानावे. इथे हे लक्षात घेतले पाहिजे की, 'विकृत मनोवृत्ती' किंवा 'असामान्य वर्तन' या कल्पना सापेक्ष व संदिग्ध आहेत. सिझोफ्रेनिक पेशंट ज्या अर्थाने विकृत किंवा असामान्य मनोवृत्तीचा असतो, त्या अर्थाने पुनर्जन्म कथन करणारा नसतो. त्याच्या एरवीच्या सर्व हालचाली सामान्यच असतात. आणि तुम्ही म्हणता तशा विकृत हालचाली ही अप्रामाणिकपणाची कसोटी मानायची झाली तर संशोधन अशक्यच होऊन जाईल. आता साधी तोंडाने नखे कुरतडण्याची सवय पाहा. अनेकांना असते. पण तीही असामान्य किंवा विकृत (abnormal) हालचाल आहे. नख कुरतडण्याकडे प्रवृत्ती ही माणूस अस्वस्थ असल्याचे चिन्ह असते. पण एवढ्यावरून त्या माणसाला सर्वस्वी विकृत व अप्रमाण ठरविता येत नाही. तसेच इथे आहे. पूर्वजन्मीची हकीकत सांगतानाही बहुसंख्य व्यक्ती अतीतावस्थेत (trance) गेलेल्या नसतात असेच दिसून आले आहे.

'केसेसविषयी जमविलेल्या माहितीचा साठा फार मोठा झाल्याने त्यांचे वर्गीकरण, विश्लेषण इत्यादी करणे कठीण झाले आहे. याबाबतीत कॉम्प्यूटरची मदत घेण्याचा आमचा विचार चालू आहे.'

—'तुमच्या संशोधनात अशाही केसेस आल्या आहेत का, की ज्या पुनर्जन्माचा अभाव (non-reincarnation) सुचवितील, म्हणजे एखाद्या मृतात्म्याचा समजा, असा संदेश की जो मरणोत्तर अस्तित्वाविषयी पुनर्जन्माऐवजी त्याला पर्यायी असे वेगळेच निवेदन देईल.' माझा प्रश्न.

'नाही. पुनर्जन्मसूचक म्हटल्या जाणाऱ्या अशाच केसेस आम्ही तपासतो. तुम्ही म्हणता तशी केस आमच्या आढळात आलेली नाही.'

आमच्या प्रश्नांची उत्तरे बव्हंशी मिळालेली होती. पण पुनर्जन्मसमस्येचे उत्तर त्यांनाही मिळालेले नव्हते हे त्यातले एक उत्तर होते. 'पुनर्जन्म प्रत्येकाला असतो' किंवा 'पुनर्जन्म कुणालाच नसतो तर अमुकतमुक दुसरे काहीतरी असते' असे निश्चित, ठाशीव आणि सर्वसाधारण उत्तर संशोधनातून पुढे तरी मिळेल का? कदाचित नाही. डॉ. विनोदा मूर्ती यांनी सांगितल्याप्रमाणे पूर्वजन्मीच्या घटना कळण्याच्या दृष्टीने संमोहनाच्या पद्धतीचे सामान्यीकरण (generalization) होऊ शकत नाही. आणि इतर पद्धती तर सामान्य नाहीतच. तेव्हा ज्याप्रमाणे एखाद्या भौतिक विज्ञानातील प्रयोगाचे फलित तशाच परिस्थितीत तशाच प्रकारे केल्या जाणाऱ्या पुनरावृत्तीत सारखेच येते— अशी सामान्यीकरणाची शक्यता असते, तशी शक्यता येथे मांडता येत नाही. काही व्यक्तींच्या जीवनातील अनुभव त्या जन्मापूर्वीही नेऊन भिडविता येतात, पण काहींच्या येत नाहीत. आता अशा प्रकारे ज्यांच्या जीवनाचे अनुभव जन्मापूर्वी—पूर्वजन्मात नेऊन भिडविता येत नाहीत, त्यांचे तसे ते का येत नाहीत? केवळ संमोहनशास्त्रातील पुरेशी तांत्रिक प्रगती अजून झाली नाही म्हणून? की त्या व्यक्तींना (तथाकथित) पूर्वजन्म असूनही त्यांच्या स्मृती काही कारणांनी उद्‌बोधित होऊच शकत नाहीत म्हणून? की त्यांना पूर्वजन्मच नव्हता म्हणून? यांपैकी कुठले कारण खरं हे केवळ उदाहरणांचा अभ्यास करून ठरविता येणार नाही. कुठल्याही पुनर्जन्मसूचक सिद्धांताची ही एक महत्त्वाची मर्यादा आहे. अर्थात अशा उदाहरणांनी पुनर्जन्माची किंवा पुनर्जन्मसमान्तर दुसरी एखादी सिद्धांतकल्पना साफ खोटी पडत नाही. फक्त त्याची सत्ता सर्व माणसांना लागू होण्याबाबत अडथळा येतो. उदाहरणार्थ, डार्विनने नैसर्गिक निवडीच्या कल्पनेवर आधारलेला उत्क्रांतिवाद मांडला व मेंडलने नवीन वंश उत्पन्न होण्याबाबत आकस्मिक उत्पत्तीचा वेगळाच सिद्धांत मांडला. दोन्हींपैकी कुठलाच सिद्धांत सर्वव्यापी व परिपूर्ण नव्हता व तरीही मर्यादितरीत्या दोन्ही खरे होते. दोन्हींचा समन्वय साधण्याचेही प्रयत्न झाले. त्याप्रमाणे याही क्षेत्रात मनुष्यांच्या जन्माची सर्वसाधारण जननशास्त्रीय रीत ही बहुसंख्य बाबतीत खरी व पुनर्जन्म किंवा पुनर्जन्मसमान्तर रीत ही अपवादात्मकरीत्या खरी असा हा मधला मार्ग येथे शक्य आहे.

बेंगलोरच्या शास्त्रज्ञांसमोरचा प्रश्न आहे तो तथाकथित पुनर्जन्मसिद्धांत वेगळ्या वैज्ञानिक काटेकोर परिभाषेत मांडण्याचा. आम्ही डॉ. एच्. नारायण मूर्तींचा निरोप घेतला त्यावेळी त्यांनी याबाबत आशावाद प्रकट केला. 'माझी विद्यार्थिनी प्रबंध तयार करेल, त्यावेळी पुनर्जन्मसिद्धांताला पर्यायी असा वैज्ञानिक सिद्धांत समोर येईल.' ते म्हणाले. त्यांचे संशोधन त्या सिद्धांताच्या मर्यादाही स्पष्टीकृत करेल, असा विश्वास बाळगायला जागा आहे. □


पॅपिलॉन

पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०



# अशी चौकशी, अशी फाशी !

र. धों. घाणेकर

## : पाच :

### अमेरिकन उपराष्ट्रपती–लाच खाण्यास प्रारंभ

राजकारणामध्ये अपजयापेक्षा जय पचविणे फारच दुष्कर असते. विजयानंतर राष्ट्राचे सर्व जीवनच बदलून जाते, पारतंत्र्यानंतर ते स्थिर व तटस्थ राहते.

आयसेनहॉवर निवडून आला व त्याने High way Act पास करून घेऊन त्या कामासाठी सिनेटमध्ये ३३०० कोटी डॉलर्सच्या खर्चाची मंजुरी मिळविली. पुढील ६ वर्षांमध्ये अमेरिकेभर मोठमोठ्या रुंद व लांबच लांब अशा कॉंक्रीट-रस्त्यांचे जाळे पसरले. नवीन नवीन ठिकाणी ठीकठाक व प्रमाणबद्ध खेडी वसविली गेली. नवीन वसाहती बांधल्या गेल्या. ह्या सर्वांचा खर्च बाहेरच्या बाहेर करण्याच्या उद्देशाने टायर्स व पेट्रोल ह्यांवरच फक्त अधिक कर बसविला गेला.

मोटारवाहतुकीचे प्रमाण एकदम वाढले व रेल्वेवाहतूक एकदम घटली. ह्या कायद्यामुळे अमेरिकन जनतेच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला. दूरवरच्या खेडेगावांतून राहणारे निग्रो शहरांत येऊन राहू लागले, लहान मुलांना ज्या शाळांतून 'गोरी' मुले शिकतात त्याच शाळांतून आपली मुले पाठविण्यासाठी झटू लागले व सरकारलाही नकळत तसे कायदे करणे भाग पडले. खेडेगावांतील निग्रोंच्या जमिनीला भाव आले व जमिनी विकून त्या पैशाचा उपयोग मुलांच्या शिक्षणाकडे व नवीन धंदे उघडण्यासाठी होऊ लागला. ह्यावेळी बाल्टिमोरच्या भागात स्पिरो टी. अॅग्न्यू [ SPIRO T. AGNEW ] ही व्यक्ती वकिलीचा पेशा करीत होती. जमिनीचे हे निग्रोंचे सौदे करण्यात व पटविण्यात ही व्यक्ती फारच दर्दी होती. त्याने त्या धंद्यावर चिक्कार पैसे मिळविले व पैशांच्या जोरावर तो निरनिराळ्या निवडणुका लढवून पुढे पुढे सरकत होता. निक्सन ज्यावेळी राष्ट्राध्यक्ष झाला त्यावेळी ह्याच स्पिरो टी, अॅग्न्यूला उपराष्ट्रपतिपद बहाल करण्यात आले. पैशाचे हिशोब धड नाहीत, सरकारात कर कमी भरले, बेकायदेशीर मार्गांनी पैसा जमा केला, ह्या आरोपांखाली त्यावर खटले चालले असतानाच त्याने उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा १९७३ मध्ये दिला व तो कसातरी राजकारणातून बाहेर पडला.

१९५० मध्ये अमेरिकेतील कोणत्याही मोठ्या शहरात निग्रो बहुसंख्याकाने नव्हते. न्यूयॉर्कमध्ये १० टक्के, लॉस एन्जेलसमध्ये ९ टक्के, शिकॅगोमध्ये १४ टक्के असे त्यांचे असलेले प्रमाण १९७० मध्ये न्यूयॉर्क शहरी २१ टक्के, शिकॅगो ३३ टक्के, लॉस एन्जेल्स ३८ टक्के, सेंट लुई ४१ टक्के, बाल्टिमोर ४६ टक्के, डेट्राइट ४४ टक्के असे झाले. १९८० च्या शिरगणतीत ही टक्केवारी वाढून अमेरिकेतील प्रत्येक मोठ्या शहरी निग्रो हे जवळजवळ बहुसंख्याकांनी दिसतील, ह्याविषयी मुळीच दुमत नाही.

निग्रोंची कारखान्यांतूनही संख्या वाढू लागली व त्यामुळे शहरे ही त्यांच्याच वस्तीने गजबजलेली दिसावयास लागली.

राजकारणात पडून कॉंग्रेस व सिनेट ह्या ठिकाणी निग्रो आपलेच उमेदवार धाडू लागले. १९७२ मध्ये १५ कॉंग्रेसमेन व १ सिनेटर निग्रो होता.

शिक्षण घेण्याच्या बाबतीत निग्रो नेटाने पुढे सरकले. १९५०

सालच्या क्रांतिकालात जी निग्रो मुले ७-८ वर्षांची ती १९७४ मध्ये शिक्षण घेऊन चांगल्या हुद्द्याच्या व जबाबदारीच्या जागांवर दाखल झाली. निरनिराळे धंदे उघडू लागली व राजकारणात भाग घेऊ लागली. अमेरिकेत हे एक नवीन परिवर्तन १९७०च्या सुमारास झालेले आपल्याला पाहावयास मिळते. अमेरिकेतील ५१ संस्थानांपैकी ज्या संस्थानात जी व्यक्ती जन्माला आली ती व्यक्ती संबंध अमेरिकेचा कारभार वॉशिंग्टनहून चालावा, प्रत्येक संस्थानात तो वेगळा असू नये, अशा विचाराचा बनत चालला. अशी भूमिका घ्यावयाला कारण म्हणजे सिनेट आणि कॉंग्रेसमध्ये निग्रो उमेदवार निवडून देणे सुलभ होईल, हे होय. संस्थानांतील कारभार समजला, ध्यानात आला तरी वॉशिंग्टनहून राज्यशकट कसा चालतो, हे समजल्याखेरीज आमसभेमध्ये नुसताच सिनेटर–कॉंग्रेसमन म्हणून बसणे ह्यात काहीच अर्थ नाही, हे तो समाज आता ध्यानी घेऊ लागला होता.

हळूहळू पाय रोवीत निग्रो जमातींनी १९७६ ला नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीमध्ये, आपला उमेदवार सिनेटर एडवर्ड ब्रुक (मॅसॅच्युसेटस) ह्याला निदान उपराष्ट्रपती म्हणून रिपब्लिकन पक्षाने उभे करावे, अशी मागणी पुढे आली. जर अमेरिका जात, पात, गोत, कूळ, पक्ष हे विचारात घेत नाही व लायक अमेरिकनांनाच फार वर चढविते, हे तत्त्व राज्यकर्त्यांचे व जनतेचे असेल, तर निग्रो जमातीतील उपराष्ट्रपती म्हणून निवड करून घेण्यास आता काहीच हरकत नाही, असे त्यांचे म्हणणे व ते एका अर्थाने योग्यच आहे. पण मग तो निग्रो असावा, हा आग्रह का ? तो लायक असावा, ही एकच कसोटी नको का ?

१९५० नंतरची अमेरिकेची भरभराट, बेफाम चलनवाढ, निग्रोंचे चाललेले डावपेच, युद्धावरून परत येत असलेले सैनिक, कारखान्यांतून होत असलेली कामगारांची वाढ–या सर्व बाबतीत कायदे व वटहुकूम फेडरल सरकारने वॉशिंग्टनहून खलित्यांच्या रूपाने बाहेर काढले, त्यामुळे संस्थानांतून चाललेल्या राजकारणापेक्षा जनता वॉशिंग्टनकडेच लक्ष केंद्रित करू लागली.

लेखक व्हाईट म्हणतो :

'आयसेनहॉवरची राष्ट्रपतिपदावर निवडणूक झाल्यापासून राज्यनीतीला एक निराळेच वळण लागल्याचे दिसते. किरकोळ दिसणाऱ्या, परंतु अत्यंत महत्त्वाच्या बाबतीत अशा, फेडरल सरकार ढवळाढवळ करू लागल्या कारणाने वॉशिंग्टन येथील अधिकारी वर्ग हा स्वतःचीच तत्त्वे व पद्धत अंमलात आणू लागला.'

काळाची ही पावले निक्सनने उपराष्ट्रपती झाल्याबरोबर पुरेपूर ओळखली व त्या दृष्टीने त्याने आपला मार्ग आखला. ह्या सर्व गोष्टीला पहिल्या प्रथम सुरुवात झाली ती कॅलिफोर्निया संस्थानातून. वॉशिंग्टनचे व्हाईट–हाऊस अशुद्ध, लाचखाऊ कसे बनवावयाचे हे कॅलिफोर्नियातील राजकारणी–धुरंधर पहिल्यांदा शिकले. त्यांना चांगलेच यश आले. ती लागण दुसऱ्या संस्थानांना लागली आणि ह्याच्या पुढची पिढी तर बरबटलेले राजकारण खेळण्यात दर्दी झाली.

कॅलिफोर्निया हा तर रिपब्लिकन्सचा बालेकिल्ला. १८९८ ते थेट १९३८ पर्यंत ह्या संस्थानचे सर्व गव्हर्नर्स व मोठाल्या शहरांचे महापौर रिपब्लिकन होते. १९३९ मध्ये जॉन्सन हा डेमोक्रॅटिक पक्षाचा गव्हर्नर झाला व त्याने रिपब्लिकन्सचे चांगलेच उट्टे काढावयास सुरुवात केली. ती दडपशाही १९४६ पर्यंत चालूच होती. त्या वर्षी मात्र एकदम फेर पडला व संस्थानचे राजकारण रिपब्लिकन्सच्या हातात गेले.

कॅलिफोर्नियात ह्यावेळी एक नवीन तऱ्हेचे राजकारण जन्माला आले. राजकीय पक्ष कोणता का असेना, क्लेम व्हिटॅकर व त्याची बायको लिऑन बॅक्स्टर ह्या जोडप्याने राजकारणाला धंदेवाइकाचे स्वरूप दिले. नवीन तंत्र प्रचारात आणले. हे कर्तबगार जोडपे राजकारणातल्या झुंजी लढविण्यामध्ये एकदम वाकबगार व शंभर टक्के यशस्वी. १९३३ पासून १९५९ पर्यंत ह्या जोडप्याने निरनिराळ्या ठिकाणी ६० निवडणूक प्रचार केले व त्यांपैकी ५५ ठिकाणी आपण पाठिंबा दिलेला उमेदवार हमखास निवडून आणला. ह्या जोडप्याच्या प्रचार-तंत्राचा उपयोग अर्ल वॉरेन, वुइल्यम नोलंड, थॉमस कुचेल, गुडविन नाइट व रिचर्ड निक्सन ह्या व्यक्तींनी करून घेतला. ह्या जोडप्याची प्रचाराची बिदागी कमीत कमी एक लाख वीस हजार डॉलर्स असे. ह्या निवडणुकांमधून ह्या जोडप्याने राजकारणात नालायक ठरलेल्या व्यक्ती आपल्या कौशल्याने पुढे खेचल्या व त्या गव्हर्नर्स, सिनेटर्स व कॉंग्रेसमन अशा ठिकाणी बसवल्या !

ह्या जोडप्याच्या कृतीला P. R. म्हणजे Public Relations असेच नाव पडले गेले होते. प्रत्येक रिपब्लिकन जी जी निवडणूक कॅलिफोर्नियातून लढला ती ह्या P. R. च्या मार्फत.

निक्सनने ह्या P. R. ची व मुरे छोटिनेरची १९५० च्या निवडणुकांपर्यंत मदत घेतली. व पुढे दहा वर्षांनंतर राष्ट्रपतीची निवडणूक लढविली तेव्हा घेतली. उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक अशी नसतेच, तेव्हा तो प्रश्नच मध्यंतरीच्या काळात उद्‌भवला नाही. उपराष्ट्रपतिपदाची पहिली चार वर्षे संपली व निक्सन ४ नोव्हेंबर १९५६ ला पुनः त्याच पदावर आयसेनहॉवरच्या कृपेने जाऊन बसला; आणि त्याच महिन्याच्या अखेरीस आपल्या भावाच्या मार्फत हॉवर्ड ह्यूजेस ह्या गर्भश्रीमंत नवकोट नारायणाकडून निक्सनने २ लाख ५ हजार डॉलर्स कर्जाऊ रकमेची मागणी केली.

रिचर्ड निक्सनचा भाऊ डोनॉल्ड निक्सन हा एक बोलघेवडा, वागण्यात फटकळ, घमेंडखोर, शरीराने धिप्पाड व लांबलचक गप्पाटप्पा मारणारा खुशालचेंडू होता; आणि निक्सन अगदी त्याच्या विरुद्ध स्वभावाचा. बोलणं अत्यंत कमी, जे बोलावयाचं ते देखील अगदी तोलून-मापून-शांतपणाने-अंतःकरणातील खळबळ आणि डावपेच कोणाला काही काही म्हणून कळणार नाही, पत्ता लागणार नाही.

हॉवर्ड ह्यूजेसची 'ह्यूजेस टूल कंपनी' नावाची जी हत्यारे बनविण्याची कंपनी होती, तिची संचालिका होती नोव्हा डिट्रीच. ती निक्सनला ओळखत होती. तिने मुद्दाम वॉशिंग्टनला जाऊन निक्सनची गाठ घेतली व त्याला असे कर्ज न घेण्याविषयी सांगितले. उपराष्ट्रपतींनी असे कर्ज घेणे हे त्यांच्या इभ्रतीला शोभत नाही व ह्या गोष्टी सार्वजनिक आयुष्याला धोका आणणाऱ्या असतात असे पण तिने बजावले. शिवाय ह्या कर्जाविषयी अगोदरच बाहेर बातमी फुटलेली आहे, ही वार्ता देखील तिने निक्सनच्या नजरेला आणली. 'आता आमच्या कुटुंबाला पैशाची जरूरी आहे. डोनॉल्ड ती घेतलेली

रक्कम परत करील' असे सांगून नोव्हा डिट्रिचला त्याने वाटेला लावली. खरे पाहिले असता डोनॉल्ड हा व्यवहारशून्य व उधळ्या होता, हे निक्सनला माहीत होते. अगोदरचाच तो कर्जबाजारी, अन् त्यात ह्या कर्जाची आणखी भर मात्र पडली.

एकदा कर्ज काढून खर्च करण्याची वृत्ती बळावली म्हणजे व्यक्तीला काय किंवा राष्ट्राला काय, त्यात शरम, लाजलज्जा वाटेनाशी होते. तो एक मोठेपणा आहे, समाजातील प्रतिष्ठेचे ते चिन्ह आहे, असेच तो समजतो. आतादेखील अमेरिकेत तीच परिस्थिती आहे. राष्ट्रातील प्रत्येक व्यक्ती कर्जबाजारी आहे वरवरची श्रीमंती दिसते पण आतून तो कोणत्या ना कोणत्या तरी बँकेचे वा संस्थेचे देणे लागतोच. एवढेच नाही, तर त्याने कोणाकडून घरावर, मोटारीवर वा अन्य वस्तूंवर कर्ज काढले नसेल तर त्याची बाजारपत अगदी खालच्या दर्जाची—हा समज दृढ आहे!

बरोबर तसेच झाले. दोन लाख पाच हजार डॉलर्स कर्जाऊ देऊन हॉवर्ड ह्यूजेसची संपत्ती काही संपणारी नव्हती; पण ते कर्ज निक्सनच्या कीर्तीला काळिमा आणणारे ठरले. १९५६ सालात घेतलेल्या ह्या कर्जाची बातमी असून देखील वर्तमानपत्रकारांचे बातमीदार पुढे ३ वर्षे गप्प राहिले व वेळ आली तेव्हा ते प्रकरण त्यांनी बाहेर काढले. निक्सन मात्र असे पैसे काढावयाला चटावला व पुढील काळात निरनिराळ्या कंपन्यांकडून त्याने बिनदिक्कतपणे पैसे काढले-वापरले-उडवले.

हे कर्ज म्हणून घेतलेले पैसे फिटले नाहीतच. ह्यूजेस टूल कंपनीने आपल्या वकिलाकडे चेक धाडला, तेथून तो निक्सनच्या आईकडे गेला आणि शेवटी फिरत फिरत अमेरिकेचा उपराष्ट्रपती रिचर्ड मिल्हूस निक्सन ह्याच्याकडे पोहोचता झाला.

ह्याला तारण म्हणून एक गॅस-पंप-स्टेशन व व्हिटियर-कॅलिफोनिया येथील लहानशी जमीन-अशी २५००० डॉलर्स किमतीची भावाच्या नावावर असलेली मालमत्ता हॉवर्ड ह्यूजेसकडे निक्सनने लावून दिली व ह्यूजेसने आपल्या कंपनीतील एका कारकुनाच्या नावावर ती चढवून ठेवून दिली.

हॉवर्ड ह्यूजेस हा फार हुषार, चाणाक्ष धंदेवाईक होता. ह्या वेळेस तो T. W. A. ह्या विमान वाहतूक कंपनीचा अध्यक्ष होता. त्याने निक्सनचा वशिला लावून त्या कंपनीला सवलती घेतल्या व पुढील वर्षातच ५० लाख डॉलर्स अधिक कमावले.

ह्या प्रकरणाची माहिती चांगल्या चांगल्या व्यक्तींच्या जवळ होती, पण ती आताच बाहेर फोडणे जरूरीचे नव्हते म्हणून सर्वच गुलदस्तात राहिले. पण १९६० मध्ये जॉन केनेडीच्या विरुद्ध निक्सन राष्ट्रपतिपदासाठी उभा राहिला—अन् पडला; नंतर १९६२ मध्ये कॅलिफोर्नियाच्या गव्हर्नरपदासाठी उभा राहिला आणि आदळला; ह्याला दुसरी तिसरी कोणतीही कारणे नसून, ही व अशा तऱ्हेची दुसरीकडून घेतलेली कर्जे... म्हणजेच 'अप्रत्यक्ष लाच' ही होती!

## राष्ट्रपती होण्याची ईर्षा

४ ऑक्टोबर १९५७ ला रशियाने अंतराळात पहिला स्पुटनिक सोडला व थोडक्याच काळात अमेरिकेच्या बरोबर आपण अंतराळ-संशोधन करू, अशी ग्वाही दिली.

२५ नोव्हेंबर १९५७ ला आयसेनहॉवरला तिसऱ्यांदा हृदयविकाराचा झटका आला. दुसऱ्यांदा निवडून येऊन केवळ प्रकृतिअस्वास्थ्यामुळे आपणास राजकारणात लक्ष घालता येत नाही, ह्याचे त्याला फार दुःख होत असे. त्याच्या आजारपणाचा पुरेपूर फायदा निक्सनला मिळाला. जगभर ७–८ वेळा दौरे करून, निरनिराळ्या राष्ट्रांना भेटी देऊन अमेरिकेच्या परराष्ट्रीय राजकारणावर आपली मुद्रा उठवण्याची संधी त्याला मिळाली. अरब-इस्रायल झगडे चालूच होते, व्हिएटनाममधील युद्ध वाढत चालले होते. चीन व रशिया ही दोन राष्ट्रे मात्र अमेरिकेला शेवटपर्यंत वश करून घेता आली नाहीत. तेढ वाढतच राहिली आणि ह्याला प्रमुख कारण म्हणजे अमेरिके-प्रमाणे ही दोन्हीही राष्ट्रे संशोधनाद्वारे अत्यंत गुप्तपणे युद्धसामग्री-साहित्य मोठ्या प्रमाणांवर बनवीत होती—इतर देशाला पुरवीत होती.

दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीचे जसे दोन तुकडे करून एकावर अमेरिकेची सत्ता व दुसऱ्यावर रशियाची सत्ता ही परिस्थिती आता-पर्यंत राहिली, तसेच कोरिया, व्हिएट कांगो, व्हिएटनाम ह्या देशांतून तेच राजकारण ह्या दोन्हीही राष्ट्रांचे राहिले. इस्रायल व अरब राष्ट्रे ह्यांमधीलही तेढ कायम ठेवण्याचे चातुर्य ह्या दोन्ही राष्ट्रांचे. इस्रायलला अमेरिकेची मदत तर अरब राष्ट्रांना रशियाची मदत. कळत असून देखील ही लहान राष्ट्रे काही करू शकत नव्हती. पण १९७४ मध्ये मात्र अरब राष्ट्रांनी तेलांच्या किमती भरमसाठ वाढवून अमेरिकेला शह दिला. तेव्हा हे 'काळे सोने' (Black Gold) ठरले. हत्यारे जमविण्यास, लष्करी ताकद वाढविण्यास सुरुवात केली व जगामधून ज्या ज्या भागांतून आपल्याला युद्धसाहित्य जे राष्ट्र पुरवील त्याच्याशी ते करार करू लागले.

१९५८ मध्ये निक्सनने युरोप खंडातील काही देश, मेक्सिको व अन्य ठिकाणी जाऊन प्रसिद्ध राजकारणी पुरुषांच्या गाठीभेटी घेतल्या. बऱ्याच ठिकाणी त्याच्यावर शेणमारा झाला, निदर्शने झाली. TRICKY DICK—SON OF A BITCH GO BACK NIXON असे शब्द ऐकावे लागले. कॅरकॅस येथे तर निदर्शकांकडून त्याच्या मोटारीवर फार मोठ्या प्रमाणावर दगडफेक झाली. Six Crisis ह्या पुस्तकामधे लिहिताना निक्सन म्हणतो, 'कॅरकॅस हा माझ्या आयुष्यातील एक धोकाच ठरला.'

ह्या सर्वांचे खापर, नेहमीप्रमाणेच, निक्सनने जाहीरपणे कम्युनिस्टांच्या माथी मारले. जे सत्तेवर असतात त्यांना इतर पक्षांना बदनाम करणे सोपे असते. अंतर्मुख दृष्टीने निक्सनने कधी विचारच केला नाही.

१९५९ मध्ये रशियाची वारी करण्यासाठी निक्सनने प्रस्थान ठेवले व २३ जुलै १९५९ ला तो रशियात जाऊन पोहोचला. त्याच्या रशियाला भेटीचे कारण म्हणजे मॉस्कोला सौकामनिकी पार्कमध्ये अमेरिकेच्या नॅशनल प्रदर्शनाचे उद्घाटन व त्या निमित्ताने क्रुश्चेव्हची भेट.

निक्सन व क्रुश्चेव्ह ह्यांच्यात अनेक विषयांवर बोलणी व चर्चा झाली. एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्यातही कालापव्यय झाला. दोघांनाही पूर्ण माहीत होते की, ह्या भेटीतून काहीच निष्पत्ती व्हावयाची नाही. तरी देखील निरनिराळी अण्वस्त्रे, सब-मरिन्सची, बांधणी, नाटो-संस्था, नुकतीच ५१ देशांतील कम्युनिस्टांची मॉस्कोला भरलेली परिषद, झेकोस्लोव्हाकिया, पूर्व-जर्मनी, व्हेनेझुएला ह्या

देशांतील बंडाळी, जिनिव्हाला नुकतीच पार पडलेली ४ राष्ट्रांची परिषद, व्हिएटनाम, वगैरे विषयांवर दोघांनी कोरडी चर्चा केली. कारण दोघांनाही नुसतीच चर्चा करावयाची होती. लहान राष्ट्रांतील तेढ कायम ठेवून आपल्या पंखाखाली त्या त्या देशांतील राजकारण चालू ठेवावयाचे होते.

निक्सनची रशिया–भेट निष्फळ ठरणार हे सर्वांनी अगोदरच भाकित वर्तविले होते. पूर्वी मॉस्कोला असलेला अमेरिकेचा वकील म्हणतो :

'रशियाचा सर्वाधिकारी क्रुश्चेव ह्याला जगात शांतता नांदावयास पाहिजे आहे, हे म्हणणेच मुळात असत्य आहे. १९५५ ची जिनिव्हाची शांतता-परिषद नाहीतर त्याने धुडकावून लावली नसती.

'क्रुश्चेव्हला सर्व दुनिया आपल्या पायाखाली पाहिजे आहे. कोठेही न लढता काही वेळेला शांतपणाने तर काही वेळेला नुसत्याच पोकळ दमदाटया देत, त्याचे हे धोरण चालू आहे– त्यात काहीही खंड नाही.

'मूलतःच साम्यवादी विचारपद्धती व लोकशाही विचारपद्धती ह्या अगदी भिन्न विचारपद्धती आहेत.

'आपण ध्येयवादी आहोत तर रशिया अधिभौतिकवादी आहे !'

निक्सनच्या अगोदर काही महिनेच फ्रान्स देशाचा अध्यक्ष अॅडेनॉवर रशियात जाऊन आला होता. त्यानेही निक्सनला तेच सांगितले.

'There is no question but that Krushchev wants to rule the world. But he does not want war. He does not want to rule a world of ruined cities and dead bodies.'

[सगळ्या जगावर क्रुश्चेव्हला राज्य करावयास पाहिजे आहे, ह्याविषयी माझ्या मनात मुळीच संदेह नाही. त्याला लढाया मात्र नको आहेत. नाश पावलेल्या शहरांवर व मुडद्यांवर राज्य करण्याची इच्छा त्याला नाही.]

अमेरिकेचा सेक्रेटरी ऑफ स्टेट, जॉन फॉस्टर डलेसनी निक्सनला तसेच परंतु थोडे निराळ्या शब्दात सुनावले.

"शांतता" ह्या शब्दाची क्रुश्चेव्हची व्याख्याच मुळी वेगळी आहे. हंगेरीसारख्या देशातील रशियाच्या हालचालीवरून हे सिद्धच झाले आहे की, साम्यवादी विचारसरणीचे सरकार कोणत्याही देशात राज्य-कारभार करीत असले की, त्यांना मदत करणे व त्याच देशातील लोकशाही-प्रणालीच्या व्यक्तींनी उठावणी केली की, त्याचा पुरा बीमोड करणे, हाच क्रुश्चेव्हचा 'सहकारी-शांतता-जीवन' ह्याचा हा अर्थ आहे.

स्वतःची रशियन-वारी करून आल्यावर निक्सन म्हणतो :

'My encounter with Krushchev was of a major personal crisis of my life. But, far more important, it was a fascinating case-study of the continuing crisis of our time–a crisis deliberately created and maintained by 'World Communism.'

'In the person of Nikhita Krushchev–a Communist man at his dangerous least–I have seen Communism in action–not just in theory."

[क्रुश्चेव्हच्या रूपाने साम्यवादाचे प्रत्यक्ष दर्शनच जणू काय मला घडले. माझ्या आयुष्यातील क्रुश्चेव्ह-भेट हा एक महत्त्वाचा टप्पा होता, असे मानावयास मुळीच हरकत नाही.]

## फिडेल कॅस्ट्रो ह्याची अमेरिकन भेट

१५ एप्रिल १९५९ पासून ११ दिवस फिडेल कॅस्ट्रो हा अमेरिकेत येऊन निक्सन व इतर राजकीय पुढाऱ्यांच्या भेटीगाठी घेत होता. क्यूबामध्ये बॅटिस्टाची हुकूमशाही धुडकावून कॅस्ट्रो हा सर्वाधिकारी झाला होता व तो रशियाप्रणीत साम्यवादाकडे वळू नये म्हणून अमेरिकेची सारखी धडपड चालू होती. परंतु कॅस्ट्रोचे आतापर्यंतचे चालचलन साम्यवादी विचारसरणीचेच होते. लॅटिन अमेरिकेमध्ये आतापर्यंत साम्यवादी घुसले नव्हते व त्या दृष्टीने क्यूबाची राजवट लोकशाही-पद्धतीवर झाली तर फार बरे; असे अमेरिकेस वाटत असल्यामुळे कॅस्ट्रोला बोलाविण्यात आले होते. विचारविनिमय झाला. तो अमेरिकेत आला त्याच्या दुसऱ्याच दिवशी न्यूयॉर्क टाइम्सने बातमी दिली : "Castro declares regime is free of red influence.

[कॅस्ट्रो म्हणतो की, त्याच्या राजवटीवर कम्युनिस्टाची छाप नाही.]

आयसेनहॉवर ह्या ११ दिवसांच्या दौऱ्यात कॅस्ट्रोला एकदाही भेटला नाही. पण निक्सन त्याच्याबरोबर सारखा होताच. टी. व्ही. व रेडिओवर त्याची मुलाखत घेतली गेली. त्याच्या भेटीनंतर मत व्यक्त करताना निक्सन म्हणतो :

"He seems to be sincere. He is either incredibly anive about Communism or under Communist discipline."

पुढील राजकारणावरून कॅस्ट्रो हा रशियाच्या पूर्ण आहारी गेलेला दिसला; ह्यावरून निक्सनचे त्याच्या बाबतील सर्व अंदाज फसले, असे म्हणावयास प्रत्यवाय नाही.

१५ जुलै १९५९ ला अमेरिकेतील पोलाद कारखान्यांतून संपाची लाट आली. ११६ दिवस संप चाललेला होता. पूर्वी १९४६, १९५२ व १९५६ ह्या वर्षी, बरोबर राष्ट्रपतीच्या निवडणुकीच्या अगोदर असे संप झालेले होते, परंतु ते फार टिकले नाहीत. डिसेंबर १९५९ मध्ये आयसेनहॉवर निरनिराळ्या ११ देशांना भेटी देण्यासाठी बाहेर पडला व जाताना त्याने निक्सनला व सेक्रेटरी ऑफ लेबर– मिचेल ह्यांना संपाविषयी वाटाघाटी करण्यास सांगितले होते. साध्या कामगाराला ताशी ३१ सेंट पगार होता व युनियनची मागणी ५२ सेंट करावी अशी होती. अखेरी बऱ्याचशा वाटाघाटीनंतर तो पगार तासाला ४१ सेंट असा ठरविण्यात आला व युनियनने संप मागे घेऊन कामगार पुनः कामावर दाखल झाले. १९७६ मध्ये तेथील साध्या (बिनकुशल) कामगाराचा ताशी पगार २॥ डॉलर आहे, ह्यावरून गेल्या १६ वर्षांत अमेरिकेतील महागाईचे प्रमाण किती वाढले आहे, ह्याची कल्पना येईल.

संप मिटविण्यात यश आल्याने निक्सनची प्रतिमा थोडीशी उजळली. निक्सनला राष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी उभे राहावयाचे होते आणि तेवढ्यासाठीच कामगारवर्ग खूष ठेवलेला बरा, या दृष्टीने त्याची ही नवी वाटचाल होती. [क्रमशः]

## पुस्तके

एका असामान्य घटनेवरील
दोन पुस्तके

# १. ऑपरेशन थंडर
# २. ऑपरेशन एन्टेबी

शिरीष सहस्रबुद्धे

रविवार २७ जून १९७६ या दिवशी अरब दहशतवाद्यांनी केलेले एअर फ्रान्सच्या विमानाचे अपहरण आणि त्यानंतर रविवार ४ जुलै ७६ रोजी इस्राइलने लष्करी कारवाई करून ओलीस प्रवाशांची केलेली सुटका या दोन्ही घटना मराठी वाचकांना माहीत आहेतच. तथापि या दोन टोकांच्यामध्ये जे राजकीय आणि लष्करी नाटय घडते, त्याची कल्पना सामान्यतः सर्वांना असतेच असं नाही. किंबहुना आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या अशा अनेक महत्त्वाच्या घडामोडींची अंतरंगे मराठी वाचकांना अज्ञातच राहण्याची शक्यता असते. इंग्रजीच्या वाचकांना अशी उणीव सहसा भासत नाही. प्रस्तुत विमान-अपहरण-घटनेसभोवतीचा नाटयमय वृत्तांत मराठी वाचकांना कळावा; या हेतूने त्या विषयावरील दोन मराठी पुस्तके प्रसिद्ध करण्यात आलेली आहेत. नोव्हेंबर ७६ अखेरीस प्रसिद्ध झालेली ही दोन ताजी पुस्तके श्री. वि. स. वाळिंबे (ऑपरेशन थंडर) व श्री. रवींद्र गुर्जर (ऑपरेशन एन्टेबी—इस्रायलची गरुड-झेप) यांनी लिहिलेली आहेत. उभयतांचे हे प्रयत्न त्यामागील सद्हेतू लक्षात घेता, समाधानकारक नसले तरी स्वागतार्ह आहेत.

पुस्तके समाधानकारक नाहीत, असे मला वाटते, याला ती स्वतंत्र नाहीत, एवढेच कारण नाही. ती पुरेशी नाहीत, आणि चांगल्या रहस्यकथा, क्राइम स्टोरीज् किंवा थ्रिलर्स यांच्यापेक्षा त्यांची व्याप्ती आणि खोली फार नाही, हे माझे मुख्य आक्षेप आहेत. याचे प्रमुख कारण मला दिसते ते हे की, वरील दोघेही लेखक एखाद्याच cource वर, पुस्तकावर पूर्णपणे अवलंबून राहिले असावेत. इतके की, दोघांच्या भिन्न भिन्न भाषाशैलींचा प्रभावही दोन पुस्तकांत वेगवेगळा जाणवत नाही. स्वतंत्र शैलीपेक्षा दोघांच्या अनुवादक्षमतेच्या मर्यादाच प्रकर्षानं जाणवतात, इतके जबरदस्त साम्य दोन्ही पुस्तकांच्या form आणि content मध्येही आहे. पुस्तके वरवर चाळली तरीही दोन पुस्तकांतली प्रकरणे शीर्षकापासूनच साम्य दाखवतात. गुर्जरांच्या पुस्तकातील 'विमान अपहरण' हे पहिले प्रकरण आणि वाळिंब्यांच्या पुस्तकातील 'बदललेली दिशा' हे पहिले प्रकरण (पृष्ठे १ ते २०) यांच्यातील सारखेपणा किंवा गुर्जरांच्या पुस्तकातील प्रकरणे पाच—सहा (धाडसी निर्णय) व वाळिंब्यांच्या पुस्तकातील प्रकरण पाच (एकमुखी निर्णय) यातील साम्य, तसेच प्रत्यक्ष लष्करी कारवाईच्या दोघांनी केलेल्या वर्णनातील सारखेपणा या सगळ्यांवरून लेखकद्वयांना आधारासाठी पुरेसे साधन-साहित्य मिळाले नसून, एकाच पुस्तकावर उभयतांनी लक्ष केंद्रित केल्याचे जाणवते. श्री. गुर्जर यांनी येहुदा ओफरच्या 'ऑपरेशन थंडर' या मूळ पुस्तकाचे ऋण मान्य केले आहे, तर श्री. वाळिंबे यांनी कोणताच ऋणनिर्देश केलेला नाही. तथापि दोघांच्या लेखनातील साधर्म्य लक्षात घेता, दोघांनीही या एकाच पुस्तकाचे मनःपूर्वक अनुकरण केल्याचा तर्क काढता येतो. इतक्या महत्त्वाच्या घटनेवर अधिक सामग्री उपलब्ध होऊ शकली नसेल तर ते आश्चर्यच म्हणावे लागेल. या घटनेसंबंधी मूलभूत संशोधन करण्याची संधी आपल्याला नाही हे लक्षात घेता, निदान अधिक आधार-साधने मिळवण्याचा प्रयत्न व्हावयास हरकत नव्हती. लेखक—प्रकाशकांनी याचा खुलासा केल्यास बरे होईल.

पुरेशा आधारग्रंथ — संदर्भसाहित्याच्या अभावामुळे एक ठळक दोष दोन्ही पुस्तकांत जाणवतो. दोन्ही पुस्तकांची शीर्षके इस्रायली लष्करी कारवाईशीच संबंधित आहेत. तथापि प्रत्यक्ष पुस्तकात मात्र या चित्तथरारक घटनेचे वर्णन बरेच त्रोटक व जुजबी, कामचलाऊ स्वरूपाचे झाले आहे. वाळिंब्यांच्या ९६ पृष्ठांच्या पुस्तकातली आठ—नऊ पृष्ठेच ही कथा सांगतात, तर गुर्जरांच्या १०४ पृष्ठांच्या पुस्तकात जेमतेम बारा—तेरा पृष्ठेच या नाटयमय हालचालीसाठी राखलेली आहेत. ही पृष्ठेही बहुशः ढोबळ वर्णनातच खर्ची पडतात. त्यात अचूकता, बारकावे आणि मुख्य म्हणजे जिवंतपणा यांचा अभाव जाणवतो. दोन्ही पुस्तकांचा बाकीचा भाग या मूळ घटनेच्या अवतीभोवतीच्या परिस्थितीनं व्यापला आहे. त्यालाही हरकत नाही, पण त्यातील आंतरराष्ट्रीय राजकारणाचा तपशील प्रामुख्याने उथळ, वरवरचा आणि अति सोपा केल्यासारखा वाटतो. कदाचित या दोनही उणीवा मूळ आधारभूत पुस्तकाच्या मर्यादांमुळे उद्भवल्या असाव्यात. आणि म्हणूनच इतर संदर्भ साहित्याचा आधार—निदान या भागापुरता घेणे योग्य झाले असते.

तुलना करायचीच झाली तर मला स्वतःला श्री. वाळिंबे यांचे पुस्तक शैलीच्या दृष्टीने अधिक परिपूर्ण, सुबक, योजनाबद्ध आखणीचे व परिणामाच्या दृष्टीने बंदिस्त वाटले. सफाईदार मराठी ही त्यांच्या पत्रकारितेतील अनुभवाची देणगी असावी. श्री. गुर्जरांचे 'पॅपिलॉन' हे पहिले पुस्तक लोकप्रिय ठरले होते, तथापि त्यातील सफाई 'एन्टेबी'च्या लेखनात क्वचितच आढळते. एक तर तुटकपणा बराच आहे, त्यामुळे एकवट, एकसंध परिणामाला बाध येतो. शिवाय एकंदरीतच अनुवादात्मक लेखनाचे काम त्यांनी तेवढ्या गंभीरपणे घेतले नसावे, अशी शंका येते. बहुधा या दृष्टिकोनामुळेच अनेक ठिकाणी अनुवादाची सावली लेखनावर स्पष्टपणे जाणवते, तर क्वचित सदोष अनुवादाचे उदाहरणच आढळते. 'स्वागतसुंदरी' हा 'एअर-होस्टेस'साठी वाळिंब्यांनी दिलेला प्रतिशब्द असाच. दोघाही लेखकांनी फ्रेंच विमानाला अधूनमधूनच 'एअर-बस' का म्हटले आहे, ते कळत नाही. हर्क्युलस विमानांनी धावपट्टी सोडून आपले विस्तीर्ण पंख 'पसरले' (वाळिंबे) किंवा 'उभारले' (गुर्जर) हा काय प्रकार आहे? 'आपले प्रभावी हास्य फेकत ते म्हणाले' (गुर्जर) किंवा 'या विश्वासाचे उतारूंच्या मनात नर्तन चालू होते' (वाळिंबे) या अशाच काही अ—मराठी रचना. काही नजरचुका तपशिलासंबंधीही झाल्या आहेत. इस्रायली विरोधी पक्षनेते बेगिन यांनी लष्करी

मोहिमेचे वृत्त मेजर जनरल पिरॉन यांना प्रथम सांगितले, असे श्री. गुर्जर लिहितात, तर बेगिन यांनी पिरॉन यांना त्याविषयीची ताजी बातमी विचारली, असे श्री. वाळिंबे म्हणतात. हा फरक कसा पडला? अशा चुका व पुस्तकाची छपाई आणि इतर तांत्रिक बाजू यांतून दोन्ही पुस्तके बऱ्याच गडबडीने, खरे तर घिसाडघाईने, प्रकाशित केल्याचे जाणवते. दोनही पुस्तकांची दुरंगी मुखपृष्ठे मात्र अतिशय आकर्षक आहेत. श्री. वाळिंबे यांच्या पुस्तकात अपहरण व कारवाईच्या हवाई मार्गांचा एकत्र असा एकच नकाशा आहे. श्री. गुर्जर यांचे पुस्तक याबाबतीत आघाडीवर आहे. त्यातील नकाशांची संख्या तीन आहे आणि त्यातला एन्टेबी विमानतळाचा नकाशा वाचकांना अतिशय उपयुक्त-मार्गदर्शक ठरतो. श्री. गुर्जरांच्याचे पुस्तकात, इस्रायली पंतप्रधान राबिन, संरक्षणमंत्री पेरेझ, मोहिमेचे प्रमुख ब्रिगे. शामरॉन व मोहिमेत वीरमृत्यू आलेला लष्करी नेता ले. कर्नल जोनाथन नेतान्याहू यांची छायाचित्रेही आहेत. तथापि ती सगळी एकत्र देणे फारसे आवश्यक होते असे नाही. नेतान्याहू यालाच अर्पण केलेल्या आपल्या पुस्तकाला श्री. गुर्जर यांनी लिहिलेली विवेचक प्रस्तावना हे त्यांच्या पुस्तकाचे एक वैशिष्ट्य ठरावे.

काही पुस्तके त्यांच्या अंगभूत गुणसंपदेमुळे वाचनीय ठरतात, तर काहींना त्यांच्या विषयामुळे, कथावस्तूमुळेच महत्त्व येते. वरील दोन्ही पुस्तके दुसऱ्या वर्गातील समजावयास हरकत नाही. ◻

१. ऑपरेशन थंडर
वि. स. वाळिंबे
अजब पुस्तकालय, कोल्हापूर
पृष्ठे ९६
किमत : सहा रुपये

※

२. ऑपरेशन एन्टेबी—
इस्रायलची गरुडझेप
रवींद्र गुर्जर
उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४
किमत : सात रुपये

---

## SUPERNATURE

By Lyall Watson
[ Coronet Books,
Pages 347–50 Pence. ]

---

ज्या गोष्टीला शास्त्रशुद्ध स्पष्टीकरण मिळत नाही त्या त्या गोष्टीमध्ये आता लोकांचा अवन्यसाधारण रस जागृत झाला आहे. म्हणजे इंग्रजीमध्ये म्हणतात की 'दि व्हील हेज चेन्ज्ड फुल सर्कल' तसे काहीसे झाले आहे. एक काळ असा होता की, तेव्हा फक्त शास्त्रीय बाबतीतच लोकांना अधिक रस होता. आणि त्याच्या आधी अंधश्रद्धा व वहिम यांचे थैमान सुरू होते. म्हणजे आता परत अंधश्रद्धा व वहिम यांचे दिवस आले आहेत असे मी म्हणत नाही. परंतु लोकांचा कल या पुस्तकाच्या नावाप्रमाणे supernatureकडे निश्चितच झुकला आहे. आणि हे चक्र असे फिरत राहते त्यावेळेला भोंदू लोक आत शिरतात व एरव्ही कधीच ठळक नसलेली सत्य आणि असत्यमधील रेषा आणखीनच पुसट होत जाते.

माझ्या वाचनालयात हे पुस्तक शेकडो लोकांनी वाचले, हे त्या पुस्तकाच्या लोकप्रियतेची ग्वाहीच झाली. सातत्याने पुस्तक वाचकाकडे असल्यामुळे त्याचा परिचयही आधी देऊ शकलो नाही.

एक वाचकाने परवा पुस्तक परत आणले व ते चाळत बसलो. मला ज्या विषयात रस होता तेच पान नेमके उघडले. सर्पाकृती मासे (eels) सार्गासो समुद्रात अंडी टाकण्यासाठी (spawning) हजारो मैल प्रवास करून कसे येतात हे चार्लस बर्लीझच्या Bermuda triagle ह्या पुस्तकाचा परिचय करून देताना मी सांगितले आहेच. ह्या सर्पाकृती माशाविषयी मनोरंजक अशी माहिती आहे. तेथेच माझी नजर खिळून राहिली व नंतर एका बैठकीत पुस्तक वाचून काढले.

हे सर्पाकृती मासे सार्गासो समुद्रात स्थलांतर करून अंडी टाकायला येतात. त्यांच्या अंडी टाकायच्या सवयीविषयी बऱ्याच लोकांनी संशोधन करून त्यावर सिद्धान्त मांडले आहेत. ह्या पुस्तकात तर चक्क असे लिहिले आहे की, या सर्पाकृती माशाच्या अंडी टाकण्याच्या व इतर सवयींमुळे आपल्याला जणू आता भूतकाळाची पडछायाच दिसत आहे! एखाद्या तारकापुंजाचा स्फोट आपणाला आता दिसतो, पण प्रत्यक्षात तो हजारो किंवा लक्षावधी वर्षांपूर्वी झालेला असतो. कारण आपणापासून तो तेवढी प्रकाशवर्षे दूर असतो. ह्याप्रमाणे, ह्या माशाच्या सवयींमुळे पूर्वी खंड कसे जवळ होते (व पुढे ते कसे drift होत गेले) व अॅटलांटिस कसा समुद्राखाली गेला वगैरे गोष्टींवर तर्क बांधता येतात, असे वेटसन म्हणतात. सार्गासो समुद्रात अंड्यातून बाहेर आल्यावर ही पिल्ले पोहत पोहत ३ वर्षांनी युरोपजवळ येतात. त्या वेळेला त्यांची लांबी ३ इंचांची असते. एकदा ते किनाऱ्याजवळच्या पाण्यात शिरले की, त्यांचा एकदम कायापालट होतो व ती पिल्ले पांढरीशुभ्र होऊन पाइपसारखी गोलाकार बनतात. ह्यापुढे ती समुद्राचे खारे पाणी टाळतात व नदीत शिरतात. कोणत्याही तऱ्हेने ते पुढे पुढे भूप्रदेशात जात राहातात. धरणे आली तरी त्यावरून पण जातात! आल्पसमध्ये तर दहा हजार फूट खळखळणाऱ्या पाण्यावरून ते चढतात. (अर्थात ते कदाचित पाणी पडणाऱ्या मागे जी धरणे किंवा खडकाळ प्रदेश असेल त्याला चिकटून चढत असतील.) एवढा खटाटोप केल्यानंतर आतील तलावात किंवा इतर पाण्यात नर चौदा वर्षांचे होईपर्यंत व माद्या वीस वर्षांच्या होईपर्यंत स्वस्थपणे वास्तव्य करतात. ह्यापुढे परत एकदा ते सर्पाकृती मासे समुद्राच्या खाऱ्या पाण्यात जाण्याचा जोराचा प्रयत्न करतात. त्यावेळी पुनश्च त्यांचा कायापालट होतो व एकदम जाडजूड व चंदेरी रंगाचे बनतात. शिवाय त्यांच्या कातडीवर चिकट असा पदार्थ येतो. कधी कधी रात्री ओलसर जमिनीवरून सुद्धा ते प्रवास करतात. पण त्यांचा एकच धोषा चाललेला असतो! तो म्हणजे, 'आम्हाला आता समुद्रात शिरायचे आहे!' आणि एकदा ते समुद्रात शिरले की, नाहीसेच होतात.

सर्पाकृती माशांवर संशोधन करणारा 'श्मिड' ह्या गृहस्थाला वाटले की, परत ते 'सार्गासो' समुद्राकडे जात असतील. पण 'डेनिस टकर' हा तर म्हणतो की, हे मासे खाऱ्या पाण्यात शिरले की, त्यांची गुदद्वारेच

बंद होतात व ह्या कारणामुळे ते कोणतेच अन्न घेऊ शकत नाहीत. फक्त त्यांच्यात असलेल्या चरबीवरच ते जगतात. आता 'सार्गासो' समुद्रापर्यंत तीन हजार मैल लांबीचा पल्ला गाठायला ही चरबी पुरत नाही व हे सर्पाकृती मासे स्थलांतर करताना मरतात. काही लोक असे म्हणतात की, एकेकाळी युरोप व सार्गासो समुद्र ह्यामधील अंतर बरेच कमी होते, परंतु खंड एकमेकांपासून सरकत असल्यामुळे (continental drift) ते अंतर आता लांबले गेले आहे. शतकानुशतके सर्पाकृती माशांना ते अंतर पोहून तोडायची सवय पडली आहे, म्हणून अजूनही ते तसे करतात.

आणखी एक सुपरनेचरचा प्रकार बघा. सॅमॉन किर्लीयन ह्या गृहस्थाने रशियामध्ये एक नवीन फोटोग्राफीचे तंत्र शोधून काढले आहे. ह्या फोटोग्राफीमुळे तुटलेल्या झाडाच्या पानाचे "भूत" कसे दिसते ते बघा. एका नुकत्याच तोडलेल्या पानाचे तीन तुकडे केले जातात. नंतर फक्त तिसऱ्या तुकड्याचा फोटो 'किर्लीयन' पद्धतीने घेतला जातो. त्या फोटोच्या 'रिझल्ट' मध्ये तिसऱ्या तुकड्याचा फोटो तर स्पष्ट दिसतोच, परंतु उर्वरित संपूर्ण पानाची आउटलाईनसुद्धा दिसते! एखाद्या रात्री चंद्र थोड्याच भागात प्रकाशित झालेला दिसतो व चंद्राचा उर्वरित भाग अस्पष्ट व अंधुक दिसतो, त्याचप्रमाणे तिसऱ्या तुकड्याचा फोटो दिसतो.

ह्या किर्लीयन पद्धतीमध्ये लेन्स किंवा कॅमेरा वापरला जात नाही, असे Secret Life of the Plants ह्या पुस्तकात लिहिले आहे. सॅमॉन डेव्हिडॉविच् किर्लीयन व त्याच्या पत्नीला एकदा प्रयोग करताना असे आढळून आले की, प्रत्येक जिवंत वस्तूमधून प्रकाशमय वलयासारखे (biological plasma body) काहीतरी निघत असते व ते आपल्याला साध्या डोळ्याने कधीच दिसत नाही.

ह्या विश्वात प्रत्येक image चे anti-image व प्रत्येक matter चे anti-matter असते, असा एक समज आहे. काही काही तत्त्वज्ञ व शास्त्रज्ञ असे म्हणतात की, आपण जी वास्तवता पाहतो ती दुसऱ्या कुठल्यातरी वास्तवतेचे प्रतिबिंब आहे. म्हणजे ढोबळपणे म्हणायचे तर विश्वात प्रत्येक गोष्ट 'डबल' असते!

युरी गेलरप्रमाणे टेड सीरियोस नावाचा गृहस्थ काही 'चमत्कार' करून दाखवितो. तो कॅमेऱ्याच्या लेन्समध्ये इतक्या अनन्यसाधारण एकाग्रतेने बघतो की, त्याच्या डोक्यात ज्या गोष्टीचा विचार असेल त्याचा फोटो निघतो. उदा. सीरियोस लेन्ससमोर उभा आहे व त्याच्यामागे झाडे व धबधबा अशी निसर्गसौंदर्याची पार्श्वभूमी आहे. पण सीरियोस फक्त ताजमहालाचा विचार करतो व फोटो येतो तो फक्त ताजमहालाचा!

टेड सीरियोसचा जन्म १९१८ मध्ये मिसुरीमध्ये कॅन्सास शहरात झाला. तो शिकागो येथे एका हॉटेलात पोर्टर म्हणून कामाला होता व तो एक मद्यपीही होता. त्याच्यावर बरीच नियंत्रणे ठेवून 'thought-photographs' घेण्यात आले. एकदा तर त्याला अशा कडक सूटमध्ये घातले की, डोक्याशिवाय सर्व हालचालीच बंद! तरी पण त्याचे thought-photographs चे प्रिन्टस निघाले. हे फोटो तपशीलवार तर होतेच, पण सर्वांत चमत्कारिक गोष्ट म्हणजे ज्या गोष्टी त्या ठिकाणावर नव्हत्या त्या सुद्धा त्या फोटोत आल्या होत्या व ज्या सावल्या अस्तित्वात नव्हत्या त्या सावल्याही आल्या होत्या! त्या फोटोचे एकंदरीत स्वरूप आकाशातील बलूनमधल्या कॅमेऱ्यावरून काढल्यासारखे होते!

ही 'विचाराची छायाचित्रे' घेताना टेड सीरियोस अनन्यसाधारण एकाग्रता संपादन करीत असे, हे मी सांगितलेच आहे. त्याशिवाय तो ओठ घट्ट आवळत असे व त्याचे स्नायू एकदम ताठ बनत असत. चेहऱ्याच्या शिरा व धमन्या फुगून निघत असत. जेव्हा जेव्हा त्याच्यावर 'टेस्टस्' घेण्यात येत असत तेव्हा तो फार पीतही असे.

'सायकोकीनेसिस' म्हणजे केवळ विचाराने वस्तू हलविणे वगैरे. सायकोकीनेसिस व मोठ्यामधील मुलासारखी वागणूक ह्यामध्ये संबंध प्रस्थापित झाला, असे वॅटसन म्हणतात. जेव्हा टेड सीरियोसचे मनोविश्लेषण केले गेले तेव्हा तो बऱ्याच प्रमाणात अपरिपक्व आहे असे आढळून आले.

Dr. R. D. Laing असे म्हणतात की, मानवाने एक ना अनेक कारणांमुळे स्वतःला व पर्यायाने समाजाला अति बंधने व नियंत्रणे घालून एका कृत्रिम व फसव्या संस्कृतीला जन्म दिला आहे. ह्यातून अर्थात कला व साहित्य वगळावे लागेल. कृत्रिम संस्कृती म्हणजे सारखा घालावा लागणारा मुखवटा. मनात एक असताना सारखी दुसरी गोष्ट करावी लागते. त्यामुळे सुद्धा व्यक्तिमत्त्व दुभंगल्यासारखे होते. निसर्गाला कृत्रिमता अजीबात आवडत नाही. ह्या सर्व कारणांमुळे मानवात psychic powers कमी कमी होत गेली तर नसतील ना? पण मग असाही प्रश्न उद्भवतो की, 'स्टोन एज' मध्ये सायकिक पॉवर्स जास्त होते का? याचे उत्तर खचितच नाही म्हणावे लागेल. कदाचित माणूस आणि


**ग्रंथ : एक अमोल ठेवा**

- ☐ विचार मांडण्यासाठी ग्रंथाइतके उत्कृष्ट माध्यम दुसरे कोणतेच नाही. पुस्तकांची किंमत छापील किमतीपलीकडे असते, म्हणून वाचनालयांचे पुस्तक परत करण्यास चुकू नका. पुस्तके निष्काळजीपणे वापरणारा व पुस्तके परत न करणारा वर्गणीदार पैसे बुडविणाऱ्या वर्गणीदारांपेक्षा अधिक दोषी ठरतो.
- ☐ पुस्तके हाताळण्यापूर्वी हात स्वच्छ असल्याची खात्री करून घ्या.
- ☐ पाने उलटताना ती काळजीपूर्वक उलटा.
- ☐ पुस्तकात कोणतीही वस्तू ठेवू नका.
- ☐ खुणेसाठी पुस्तकाची पाने दुमडू नका.
- ☐ पुस्तक वाचून झाल्यावर ते उन्हात अगर धुळीच्या जागी ठेवू नका.
- ☐ लहान मुलांपासून पुस्तके दूर ठेवा.
- ☐ उघडे पुस्तक पालथे ठेवू नका.
- ☐ कोणताही पदार्थ खाताना अगर पिताना पुस्तक वाचू नका.

**फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०**

माणसाचा मेंदू जसजसा उत्क्रांत होत गेला तसतसा त्याला सायकिक पॉवर अधिक लाभत गेली. तथापि, ह्या उत्क्रांतीबरोबरच कुठे तरी काहीतरी चुकले किंवा नियतीच्याच इच्छेने मानवाने स्वतःला एका कृत्रिम व बंदिस्त संस्कृतीत पुरून ठेवले व त्याची सायकिक पॉवर्स वाढावी तितकी वाढली नाही.

थोड्याच दिवसांपूर्वी 'माणूस'च्या २०-११-७६ च्या अंकात डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर यांनी लिहिलेला 'कहाणी पिरॅमिडची...' हा लेख वाचला. फारच वाचनीय वाटला. ह्या पुस्तकातही पुठ्ठ्याचे पिरॅमिडस कसे बनवावेत, त्याचे थोडे फार वर्णन आहे. वॅटसनने असे लिहिले आहे की, पुठ्ठ्याच्या पिरॅमिडच्या ⅓ उंचीवर बॉव्हिसने एक मेलेली मांजर ठेवली व dehydration होऊन त्या मांजराची ममी झाली, असा बॉव्हिसने निष्कर्ष काढला.

हस्तरेषा व मेडिकल डायग्नोसीस ह्यांमधील संबंधही ह्या पुस्तकात दिला आहे. ह्याशिवाय ग्राफोलॉजी (हस्ताक्षरावरून व्यक्तीचे मूल्यमापन करणे व भविष्य सांगणे), फिजियॉनॉमी (चेहरेपट्टीवरून भविष्य), फॅनोलॉजी (कवटीच्यावर फुगून आलेल्या भागावरून भविष्य) व इतर बऱ्याच मनोरंजक विषयांवर माहिती आहे.

—जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी

---

## शब्दुली

---

'शब्दुली' प्रकाश कामतीकरांचा पहिला कथासंग्रह. शब्दुली या नावावरूनच काही तरी निराळे वाचायला मिळेल ही अपेक्षा. प्रकाश कामतीकर यांनी या अपेक्षेला फारसा तडा दिला नाही. बऱ्याच अंशी अपेक्षा पूर्ण केल्या आहेत. वास्तवातील कटू सत्याला देखील स्वप्नाच्या बिलोरी रंगातून शब्दांकित करण्याइतपतचे संयम पाळणारे त्यांचे शब्द, जे भावविश्व निर्माण करायला पाहिजे ते करतात.

नवकथांमध्ये फक्त शब्दच बोलतात. पण अर्थ फार गूढ प्रकारचे आहेत, किंबहुना बऱ्याच कथांमध्ये शब्दाचा फुलोरा फुलविला असल्यामुळे या कथासंग्रहाला शब्दुली नाव दिले का असा प्रश्न मनात येतो.

पुन्हा एकदा, मांजरीचे डोळे, भीती, परीक्षेच्या तासातला अस्वस्थ मी, एका थिजलेल्या रात्री, संथ सरकणारं, शेवटचं, या कथा आशयपूर्ण व गूढ अर्थाच्या आहेत. या कथांमध्ये प्रामुख्याने स्त्री-पुरुषाच्या नाजूक संबंधाबद्दल लिहिलं गेलं आहे. हे स्त्री-पुरुषाचे नाजूक संबंध त्यांनी अतिशय हळूवारपणे मांडले आहेत. ह्या कथांपैकी मांजरीचे डोळे या कथेचा आवर्जून उल्लेख करायला पाहिजे. मांजरीचे दोन हिरवे डोळे हे त्यांनी माणसाच्या यशापयशाचे प्रतीक मानले आहे. त्याला सतत मांजरीचे दोन हिरवे डोळे दिसत असतात. आपलं स्वतःचं यश-अपयश डोळ्यासमोर दिसत असतं आणि त्यामध्ये तो गुदमरून जात असतो. तो इतका गुदमरतो की, त्याला त्याच्या पांघरुणातच मांजरीचे हिरवे डोळे सांडलेले दिसतात.

रातराणीचे डोळे, वेटिंग, कॉल गर्ल, चेंज युवर पार्टनर या कथांमध्ये उच्चभ्रू लोकांमध्ये काय चालतं याचं डोळसपणे चित्रण केलं आहे. या कथांमधून नाव न लिहिता तो आणि ती अशी नाव ठेवली आहेत. चेंज युवर पार्टनर ही कथा लेखकांनी उत्कृष्टपणे फुलविली आहे. वाचतानासुद्धा तीव्र कुतूहल निर्माण होते. कथेच्या नावावरूनच लक्षात येतं की, आपला जो partner आहे तो थोड्या वेळापुरता-पार्टीपुरता चेंज करायचा. दोघं नवरा-बायको असतात. पहिले काही दिवस गेल्यानंतर दोघांनाही एकमेकांचे गुण-दोष दिसायला लागतात. सोसायटीमधल्या लोकांना दोघांचं खूप पटतं असं जरी दाखवत असले तरी दोघंही आपापल्या मार्गाने जात असतात. अशा उद्विग्न मनःस्थितीत दोघंही एका पार्टीला जातात. खाणंपिणं झाल्यावर प्रत्येकाच्या डोळ्यात वासनेची वादळं उठलेली असतात. लाईट विझवले जातात आणि अंधारातच एक घोगरा आवाज घुमतो : लेडीज अॅन्ड जन्टलमेन! have your partner? एन्जॉय! एन्जॉय!! असा बराच वेळ जातो. बेभान सुटलेली वादळं बरीच शांत होतात. अंधारात आपला partner कोण आहे हे माहीत नसतं. लाईट लागले जातात. प्रत्येकजण आपला partner पाहतो. तो आणि ती पण पाहतात. आणि काय आश्चर्य, दोघं नवरा-बायकोच partner झालेले असतात. लेखकांनी कथेचा उच्चबिंदू बरोबर गाठला आहे.

काही कथांमध्ये कामतीकरांनी स्त्रीच्या मनातील मातृत्वाबद्दलच्या सुप्त भावनांचा आविष्कार साकार केला आहे. कथेतील स्त्रिया रूढमार्गाचा त्याग करण्याचा प्रयत्न करून सुद्धा करू शकत नाही. फक्त तात्पुरतं बंड. मनाविरुद्ध पण परिस्थिती बघताच निवळणारं. परत तोच रूढिप्रिय मार्ग अनुसरतात. मातृत्व मिळवताना आपलं एकमेकात मिसळायचं. निसर्गाच्या नियमाप्रमाणं. पण कारणं शोधायची नरांनी मातृत्व न देण्याची. माणसाच्या मनातील द्विधा अवस्था किंवा त्यांनी निरागस स्त्रीवर केलेल्या अन्यायाची जाणीव सारखी होत असते. एक मानसिक दडपण एखाद्या व्यक्तीवर आल्यावर तो सर्व विसरून कसा जातो याचे चित्रण 'अघटित'मध्ये केलं आहे. क्लिष्ट भाषेत न करता साध्या शब्दात केला आहे. यामध्ये भावनेचा खेळ तरलपणे रंगवला आहे.

अखेरच्या काही कथा वास्तववादी आहेत. प्रत्येकाच्या आयुष्यामधे अशा प्रकारच्या कथा घडतात. 'अधांतर' याचं एक उत्कृष्ट वास्तववादी चित्रण केलेली कथा!

एक विधवा आई आपल्या मुलाला शिकवून परदेशी पाठवते. इकडे मुलासाठी एक सुरेख मुलगी पाहून ठेवते. मुलगा परदेशाहून येतो आणि ही मला आवडलेली मुलगी तुला कशी वाटते, असं जेव्हा मुलाला विचारते तेव्हा मुलगा घाबरतो. तो जेव्हा आईला सांगतो की, परदेशात मी दुसरीच मुलगी बघून ठेवली आहे. हे ऐकून आईला धक्का बसतो. त्यामुळे सर्वांची मनेच अधांतर राहतात.

अशा या शब्दुलीमधील कथा. शब्दुली पूर्ण वाचून झाल्यावर काहीतरी नवीन वाचल्याचं नक्कीच समाधान मिळतं.

मराठी कथा काही काळ म्हणजे साधारणपणे ६५ च्या सुमारास काहीशी थिजल्यासारखी झाली होती. बऱ्याच प्रमाणात ढोबळ झालेली कथा सूक्ष्माकडे आणि जीवनमूल्याकडे वळविली ती प्रामुख्याने जी. ए. कुलकर्णी, शरच्चंद्र चिरमुले, चिं. त्र्यं. खानोलकर, ए. वि. जोशी, आनंद यादव इत्यादींनी. आणि

त्यामुळेच मराठी कथा आशयघन, तत्त्वचिंतनात्मक झाली. त्यानंतरची कथा आशय आणि अभिव्यक्ती ह्या दोन्हींमध्ये निराळेपण दर्शवू लागली. आनंद विनायक जातेगावकर, अनिल डांगे, श्याम मनोहर, रत्नाकर पटवर्धन, प्रकाश कामतीकर ही त्यांपैकी काही नावे.

खरे म्हणजे मराठीतील ललित लेखन, कथा, कविता, एकांक इ. वाङमयप्रकार झपाट्यानं बदलत आहेत. सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे वाङमयप्रकारांच्या सीमारेषा फार धूसर झाल्या आहेत. अशा काही संक्रमण अवस्थेतीलच प्रकाश कामतीकरांचा 'शब्दुली' हा २७ कथांचा संग्रह निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण आहे.

–दिपाली निरगुडकर

शब्दुली
प्रकाश कामतीकर
साहित्यसाधना प्रकाशन, औरंगाबाद.
पृष्ठे–१३५, मूल्य–रु. १२/–

## झळाया

ग्रामीण जीवनाच्या बातम्या देणारा हा कथासंग्रह. प्रत्येक कथा किंवा कादंबरी ही अनुभवाची बातमी असते. कधी ती एका विशिष्ट काळाची बातमी असते तर केव्हा ती काही विशिष्ट लोकांची बातमी असते आणि कधी कधी ती एकाच व्यक्तीच्या जगातली सुद्धा बातमी असते.

'झळाया'मधील कथांत बातम्या आहेत त्या एकाच व्यक्तीच्या जगातल्या आहेत, विशिष्ट लोकांच्याही आहेत. ही सारी माणसं कुठं ना कुठं तरी परिस्थितीचे चटके सहन केलेली आहेत. त्यांतल्या काहींना तर चटके सहन करणं, सतत या झळांमध्ये राहणं, हेच जीवन होऊन गेलेलं आहे. या झळांचा अनुभव सांगणारा, त्या अनुभवांचं चित्रण करणारा हा कथासंग्रह.

या कथांमधली माणसं साधी, भोळी, भाबडी आहेत. पोटासाठी वणवण करणाऱ्या, भीक मागणाऱ्या, भांडी विकणाऱ्या, घरावरचा पत्रा गहाण ठेवणाऱ्या, खळ्याजवळच्या मातीतले जोंधळे वेचून त्यावर गुजराण करणाऱ्या माणसांचं चित्रण करणाऱ्या या कथा. हातावर पोट असणाऱ्या माणसांच्या या कथा! ज्यांना वाळलेली बोरं उकळून खावी लागतात त्यांच्या या कथा! ज्यांना काम मिळत नाही, तरण्या मुलीला कामावर पाठव म्हणून सतत ऐकावं लागतं त्यांच्या या कथा. झोपडीत राहणाऱ्या, मोलमजुरी करणाऱ्या लोकांचं हे वास्तव. शेतमजुरांच्या जीवनात दररोज घडणाऱ्या प्रसंगांचं हे वास्तव. जिथे मुलीला पहिल्या बाळंतपणाला बोलावता येत नाही म्हणून आईचं तडफडणारं मन आहे, एखाद्या म्हाताऱ्या स्त्रीला दिसत नसलं तरी पोटासाठी मशीन चालवावी लागते, अशांच्या या कथा. ज्यांना सतत मागासलं ठेवलं गेलं, ज्यांना रूढीच्या नावाखाली, धर्माच्या नावाखाली पांगळं केलं गेलं, त्या लोकांचं हे वास्तव.

झळाया हा एकंदर सतरा कथांचा संग्रह. सरस वर्णन करणाऱ्या, त्या त्या वातावरणाशी वाचकाला समरस करणाऱ्या या कथा. धांडगे यांची भाषा अतिशय सोपी आहे, त्यामुळे दारिद्र्याचं स्पष्ट चित्रणही झालंय–मराठवाड्याकडची विशिष्ट बोली भाषा कथेतल्या पात्रांच्या तोंडी असल्यानं एकंदर कथा अतिशय सजीव झाल्यात. ह्या संग्रहातल्या गुलाब, सावली, झळाया, ओझं, सरण, मातेरं या कथा वाचक विसरू शकणार नाहीत अशाच. ग्रामीण भागातल्या कष्टकरी समाजाच्या जीवनातली दररोजची बातमी, जीवनाची नित्याची बातमी या कथांनी बाहेर काढलीय.

मराठवाडा साहित्य परिषदेनं मराठवाड्यातील लेखकांचं साहित्य सुलभतेनं लोकांसमोर यावं, म्हणून पुरस्कृत प्रकाशनाची योजना हाती घेतली आहे. त्या योजनेतील हे एक प्रकाशन. 'झळाया' पुस्तक म्हणून लोकांसमोर आलेलं आहेच, पण या पुस्तकाद्वारा ग्रामीण जीवनाचं खरंखुरं चित्रण आणि हलाखीची परिस्थिती लोकांसमोर आणण्याचं मोठं काम झालेलं आहे.

ग्रामीण वास्तवाच्या नावाखाली इरसाल, भानगडबाज ग्रामीण नमुने पेश करणाऱ्या कथा–कादंबऱ्यांपेक्षा या छोट्या कथा थोड्याच रंगात सुंदर लँडस्केप रंगवून बरंच मोठं समाधान देऊन जातात.

– लता भिसे

झळाया
गणेश धांडगे
प्रकाशक : मराठवाडा सा. परिषद, औरंगाबाद
किंमत : बारा रुपये


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य
या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

॥ मॅक्झिम गॉर्की ॥

। सुमती देवस्थळे ।

मूल्य दहा रुपये
राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ । पुणे ४११ ०३०

कथा

# अजून थांब ... थोडा वेळ

डॉ. शामकांत कुलकर्णी

पॅसेजमधले काचेचे दार ढकलून नर्सच्या मागोमाग कमलाताई आत शिरल्या. त्यांच्या मागेच अस्वस्थ चित्ताने वामनराव येत होते. नर्स रूम नं. तीनपाशी थबकली. तिने दार ढकलले आणि आत दिसणाऱ्या पांढऱ्या स्वच्छ चादरी अंथरलेल्या बेडकडे बोट दाखवले.

'रूम नं. तीन. तुमची रूम.'

खोलीच्या भिंतीला फिकट निळा प्लॅस्टिक पेंट दिलेला दिसत होता. नवाच. छतावर फॅन. पांढरं शुभ्र फर्निचर, कॉट, उशाशी छोटंसं स्टीलचं कपाट, भिंतीत आरसा असलेले कपाट, पलीकडे आणखी एक लहान बेड सोबत असलेल्या नातेवाइकांकरिता.

वामनराव आत निघाले. पण कमलाताईंनी त्यांना दारातच थांबवले. पॅसेजमध्ये पलीकडे सोफासेट होता.

'जरा बसा दोन मिनिटे इथे. मी आलेच.'

त्यांनी नर्सला खुणावले व त्या नर्सबरोबर शेजारच्या खोलीत शिरल्या. नर्सने प्रश्नार्थक मुद्रा केली.

'त्या खोलीत आधी कोण होतं?'

'एक असेच पेशंट. वृद्ध गृहस्थ.'

'ते कधी घरी गेले?'

'सकाळीच. खोली रिकामी झाली. पण का विचारताहात?' नर्सने विचारले.

'कसले ऑपरेशन होते? बरे होऊन घरीच गेले ना ते?'

'नाही. ते वारले. ८५ वर्षांचे होते.' नर्सने सांगितले.

'मग ती नको खोली.' झटकन कमलाताई उद्गारल्या 'आधीच तीन आकडा अशुभ आहे.'

'पण दुसरे बेड रिकामेच नाही. हॉस्पिटल भरलेलं आहे.'

'अं हं! ती नको खोली. डॉक्टर कुठाहेत. मला फोन द्या.'

डॉ. वैशंपायन वरच्या मजल्यावर राहतात. नर्सने लगेच फोन जोडून दिला. कमलाताईंनी गाऱ्हाणं सांगितले.

'दुसरी रूम देतो. काळजी करू नका.' फोनवरच डॉ. वैशंपायनांनी सांगितले.

पाच-दहा मिनिटांत शेजारची चार नंबर रिकामी झाली. तिथला रुग्ण तीनमध्ये हलवला गेला. चादरी बदलल्या गेल्या. रूम स्वच्छ करण्यात आली अन् वामनराव रूम चारमध्ये ॲडमिट झाले. समाधानाने कमलाताई चार नंबरच्या खोलीत आरामखुर्चीत सि ावल्या.

'त्या खोलीला काय झाले होते?' कॉटवर बसत वामनरावांनी विचारले.

'मला आवडली नाही म्हणून दुसरी मागितली. त्याकरिता वेळ लागला.' कमलाताई उद्गारल्या. नुकत्याच रुग्ण गेलेल्या अशुभ वातावरणात कशाला जायचं? त्यात वामनरावांचे तर अधिक अवघड दुखणं होते. कदाचित ऑपरेशन करावे लागणार होते. त्या तयारीनेच ते हॉस्पिटलमध्ये आले होते. पण हे कमलाताई वामनरावांना म्हणाल्या नाहीत. ते त्यांनी मनात ठेवले.

वामनराव नगरातले एक धनाढ्य उद्योगपती आहेत. त्यांच्या कारखान्यांची मालिका साऱ्या महाराष्ट्रात पसरलेली आहे. बोटावर मोजता येतील अशा यशस्वी मराठी कारखानदारांत त्यांचं नाव पहिल्या अग्रक्रमांकाने घेतले जाते. पंचवीस वर्षांपूर्वी त्यांनी सुरू केलेल्या छोट्या वर्कशॉपचं आता किसान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन नावाच्या प्रचंड कारखान्यात रूपांतर झालंय आणि त्याने गावाबाहेरची कित्येक एकर जागा व्यापलीय. उजाड माळरानाच्या जागी तिथे आता कित्येकशो भिवंत इमारती, चिमण्यांची धुराडी, आणि कामगारांच्या टुमदार वसाहती उभ्या आहेत. वामनरावांकडे पाहिलेत तर ही किमया करणारे जादूगार ते हेच, हे कुणाला सांगून पटणार नाही, इतका गृहस्थ दिसायला साधासुद्धा. साधाच गोल, वाटोळा, सावळ्या वर्णाचा चेहरा, सफरचंदासारखे फुगलेले गाल, छोट्या, तोकड्या मिशा, स्थूल अंगकाठी. सगळे काही चारजणांसारखे. वेगळे आहेत ते फक्त डोळे. विलक्षण, पाणीदार, तजेलदार. त्यांच्या भेदक नजरेने ते रोखून पाहायला लागले की समोरचा गडबडतो. ते जणू त्याच्या अंतरंगात आरपार पाहात असतात. त्याचं मन वाचत असतात. त्यांच्या यशाचे गमक कदाचित इथंच असावं.

वामनराव कित्येक दिवस पोटदुखीने आजारी होते. मधूनमधून किंचित दुखते, डाव्या बाजूला, पोटात, आत कुठेतरी. तसे त्यांचे निदान झालेले आहे. त्यांच्या डाव्या मूत्रपिंडात खडा आहे. मोठा stag horn प्रकारचा. त्याने सबंध मूत्रपिंडाचे कटीर (Pelvis) व्यापलेले आहे. ऑपरेशन करून तो खडा काढायला हवा. आणि म्हणून ते आज डॉ. वैशंपायन यांच्या छोटेखानी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झालेत. तशी ही त्यांची हॉस्पिटलमध्ये यायची दुसरी खेप आहे. चार वर्षांपूर्वी त्यांचे असेच ऑपरेशन झाले. मूतखडा तेव्हाही काढण्यात आला. त्यावेळी तो उजव्या बाजूला होता. ऑपरेशननंतर डॉक्टरांनी पथ्य सांगितले होते. आणि वामनरावांनी ते आटोकाट पाळले होते. भरपूर पाणी प्यायचे. भरपूर बिअर घ्यायची. द्राक्षे, टोमॅटो, स्पिनॅच वर्ज्य. भरपूर दूध, कॅल्शियम, ॲटॅसिडस् शक्यतो टाळायची. कॅल्शियम आणि ऑक्झलेट कमीत कमी प्रमाणात पोटात जाईल अशी काळजी घ्यायची. आणि वामनरावांनी शक्यतो प्रयत्न केले होते. पण चार वर्षांनी पुन्हा मूतखडा झाला होता. अजून दोन

महिन्यांनी वामनरावांना 'एशियन स्टील इंडस्ट्रीज 'च्या टोकियोत भरणाऱ्या कॉंग्रेसला भारतीय प्रतिनिधी म्हणून जायचे होते. त्यापूर्वी ऑपरेशन उरकून घ्यावे असे त्यांनी ठरवले होते.

वामनराव हॉस्पिटलात ॲडमिट झाल्याबरोबर तासाभरात मला निरोप मिळाला. भली मोठी जंत्री होती. रक्ताच्या आणि मूत्राच्या विविध परीक्षा करायच्या होत्या. मला एखादी परीक्षा आवश्यक वाटली तर तीही करायची विनंती होती. शरीरात पॅराथायरॉइड नावाच्या ग्रंथी मानेच्या खालच्या भागात असतात. त्यांच्या कार्याबद्दल या विविध परीक्षा होत्या. वामनरावांच्या खोलीकडे जाता जाता मी नर्सला विचारले,

'डॉक्टरांचे निदान काय आहे ?'

'त्यांच्या मानेत गाठ वाटते आहे.' उत्तर मिळाले.

'असं का.' मी मनात पुटपुटलो. 'Hyperparathyroidism' पॅराथॉयरॉइडमध्ये गाठ म्हणून त्याच्यामुळे मूतखडे, असाच डॉक्टरांचा विचार असावा.

माझे काम आटोपल्यावर मी वामनरावांची मान तपासली. मला तर काही गाठ हाताला लागली नाही. अर्थात मी काही याबाबतीत कुशल नव्हतो. अगदी मऊ गाठ असली तर माझ्या हातांना तिचे अस्तित्व न कळणे सहज शक्य होते.

मी खाली आल्यावर वैशंपायनाच्या रूममध्ये घुसलो. तो रिकामाच होता.

'वामनरावांना काय झालंय ? तुम्हाला मानेत गाठ लागली का ?'

'मला पहिल्यांदा तसं वाटलं खरं. अस्पष्टशी गाठ हाताला लागल्याचा भास झाला. पण आता तसं वाटत नाहीय्. त्यांना पुन्हा पुन्हा मूतखडे होताहेत. त्याचं कारण शोधायचा मी प्रयत्न करतोय. कदाचित पॅराथॉयरॉइडच्या आधिक्यामुळे त्यांना खडे होत असावेत. त्या दिशेने जे काही करता येईल ते करा.' डॉ. वैशंपायन म्हणाले.

दुसरा सबंध दिवस मी वामनरावांच्या विविध परीक्षा करण्यात गुंतलो होतो. दिवसअखेरीला हाती आलेली माहिती जवळजवळ निर्णायक अशी होती. वामनरावांच्या रक्तातले कॅलशियम खूप वाढले होते. अल्कलाइन फॉस्फेटेज वाढले होते. मूत्रातून उत्सर्जित होण्याचे कॅलशियम व फॉस्फेटसचे प्रमाण नेहमीपेक्षा खूप होते. फॉस्फरस उत्सर्जनाचा इंडेक्स वाढलेला होता. या सगळ्या परीक्षांवरून वामनरावांना Hyperparathyroidism (पॅराथॉयरॉइडच्या कार्याधिक्क्यामुळे होणारी विकृती)चा त्रास होत होता, हे नक्की होते. त्यांचे हाताचे व कवटीचे क्ष-किरण फोटो घेण्यात आले. त्यातही या निदानास पूरक असे बदल आढळून आले.

'हे सगळं त्यांच्या गळ्यात असलेल्या पॅराथॉयरॉइडमधील गाठीमुळेच आहे.' त्या दिवशी डॉ. वैशंपायन मला फोनवरून सांगत होता. त्याला आता निदानाबद्दल खात्री वाटत होती. 'आता व्यवस्थित गाठ हाताला लागतेय असं मला वाटते. आपण ऑपरेशन करू. Let us see. गाठ काढली की, त्यांना पुन्हा मूतखडा व्हायचा नाही.'

वामनरावांचं पॅराथॉयरॉइडचं ऑपरेशन पंधरा दिवस सगळ्या पुण्यात गाजत होते. आधिक्य आहे की नाही ? Adenoma (साधी गाठ) आहे का नाही ? ऑपरेशन करायचं की नाही ? तीन प्रश्न होते. वामनराव V. I. P. होते. त्यामुळे गावातल्या निरनिराळ्या लहानमोठ्या तज्ज्ञांची मतं घेतली गेली. वैद्यकशास्त्रात दोन तज्ज्ञांचे एकमत क्वचित होते. पुन्हा दुसऱ्याचे निदान मान्य करायला काही वेळा अहंभाव आतल्या आत विरोध करीत असतो. भरीस भर या शास्त्रात वरवर एकसारख्या दिसणाऱ्या असंख्य विकृती आहेत. एक म्हणाले, 'This is Pseudohyper parothyroidism' तर दुसरे उद्गारले, 'It is Pseudo, pseudo hyperparathyoidism,' (छदम् छदम् न्यूनत्व विकृती). त्यातल्या तांत्रिक फेरफारात जायचे कारण नाही. पण पंधरा दिवसांनी वामनरावांचे या गाठीचे ऑपरेशन करून गाठ काढायचे अखेर नक्की ठरले. त्याला अनुसरून संबंधित इतर रक्तपरीक्षा, कार्डियोग्राम इ. झाल्या. हृदयविशारदांनी तपासले आणि सगळ्यांनी हिरवा बावटा फडकविला. नजर जाईल तेथपर्यंत लाइन क्लिअर होती. ऑपरेशन-मार्ग निर्विघ्न दिसत होता. वामनरावांचे हृदय, मूत्रपिंड, फुप्फुस, यकृत सर्व काही जिथल्या तिथे होते. प्रत्येकाची कामे व्हायला हवी तशी होत होती. त्यांची दमछाक होत असल्याची कोणतीही चिन्हे दिसत नव्हती.

तो सोमवारचा दिवस होता. दुपारी दोन वाजल्यापासून ऑपरेशन सुरू होते. डॉ. वैशंपायनला त्याची बायको मदत करीत होती. डॉ. वैशंपायन तरुण सर्जन होता. या आधीच त्याचा नावलौकिक एक प्रथितयश सर्जन म्हणून सगळीकडे झाला होताच. पण या ऑपरेशनने त्याच्या कर्तृत्वावर आणखी एक यशाचा कळस चढणार होता. त्याच्या खाजगी नर्सिंगहोममध्ये स्वत:च्या जबाबदारीवर त्याने आजपर्यंत कित्येक लहानमोठी ऑपरेशनस् यशस्वीरीत्या केलेली होती. फुफ्फुसातला कॅन्सर, जन्मजात सिस्ट (Cyst), थॉयरॉइडमधल्या गाठी, जठरातले कॅन्सर, अशा अनेक मोठाल्या विकृती, ज्यांना एकखांबी छोटया खाजगी नर्सिंगहोममध्ये कोणी सहसा हात लावणार नाही, त्यांना डॉ. वैशंपायन न डगमगता सामोरा गेला होता. यशापयशाची पर्वा न करता त्याने आपले हत्यार त्या आजाराविरुद्ध परजले होते. या युद्धात तो कधी जिंकला होता तर कधी तो हरलाही होता. त्याला 'निधड्या छातीचा' हे मला म्हटलंच पाहिजे. डॉ. वैशंपायन साडेपाच फूट उंचीचा, किंचित आडव्या अंगाचा, भरलेला, गोरापान, करारी उग्र चेहरा, पाणीदार भेदक डोळे, ऑपरेशन करताना परीटघडीचा पांढरा स्वच्छ गाऊन आणि चेहऱ्यावर पांढरा मास्क चढवला की त्याची फक्त भेदक नजर दिसत राहते. आणिक दिसतो तो त्याचा प्लॅस्टिक ग्लोव्हज् चढवलेला हात आणि हातातला नाईफ. त्याची नजर त्वचेवर अन् नाईफवर खिळलेली असते. पुढच्याच क्षणी सुरी सरसर फिरणार असते आजाराचा वेध घेत. ही नजर, पुढच्याच क्षणी हालणारा तो नाईफ हे सारं तुम्हाला भूल पाडणारे, हिप्नोटाइझ करणारे, मोहिनी टाकणारे असते.

दुपारी दोन वाजता सुरू झालेले ऑपरेशन संपायला सहा वाजले. ऑपरेशन संपतासंपता मला त्याच्याकडच्या नर्सचा फोन आला.

'अर्जंट कॅलशियम करायचंय. रक्त घ्यायला येता का ? ऑपरेशन अजून चालूच आहे.'

मी धावतच तिथे गेलो. जरूरीपुरते रक्त घेतले. एव्हाना ऑपरेशन संपले होते. डॉ.

वैशंपायन हात धुत होता.

'Cangratulation. ऑपरेशन ठीक झाले ना?' मी विचारले.

'आयुष्यात पहिल्यांदाच मी पॅराथॉयरॉइड अडेनोमाचं निदान केलं आणि पहिल्यांदाच हे ऑपरेशन केलं. ती मोठी गाठ होती.' त्याचे डोळे यशाने चमकत होते. आवाज अभिमानाने भारलेला होता. गाठ ठेवलेले एनॅमलचे भांडे त्याने मला दाखवले. आणि पुढे होऊन तो तांबडाभडक, लाल उंबरासारखा दिसणारा गोळा त्याने माझ्या डोळ्यासमोर धरला.

'ऑपरेशन छान पार पडले. काही अडचण आली नाही. पेशंटची अवस्था चांगली आहे. तो शुद्धीवर येतोय, अ‍ॅनस्थेटिस्ट अजून तिथे आहेतच.' डॉ. वैशंपायन सांगत होता.

'ही केस तुम्ही सगळ्यांना दाखवायला हवी. व्यावसायिक जर्नलमध्ये याचा अहवाल प्रसिद्ध करायला हवा. तुम्ही सेलेब्रेट करायला हवे. मोठी पार्टी हवी.'

'सगळं करू. पण जरा थांब. त्याला अजून खूप अवकाश आहे. It is too early to rejoice.'

बोलत बोलत आम्ही त्याच्या हॉलमध्ये गेलो. गरम गरम कॉफीचे पेले पुढे आले.

हॉलमध्ये दर्शनी भिंतीवर, बहुधा डॉ. वैशंपायननेच काढलेला, एनलॉर्ज केलेला, एका लहान अवखळ मुलाचा फोटो उभा होता. ५'×४' एवढी प्रचंड एनलार्जमेंट होती. फोटोतला तो मुलगा प्रसन्न हसत होता. त्याच्या टपोऱ्या, काळ्याशार डोळ्यांतून काही अपूर्व जिंकल्याचा आविर्भाव ओसंडत होता. आणि त्याचवेळी कुतूहलाने ते अजून काही तरी समोरचे पाहात होते. न्याहाळत होते. पुढच्या टप्प्याचा अंदाज घेत होते. वेध घेत होते.

ऑपरेशननंतर रक्तातल्या पॅराथॉर्मोन (पॅराथॉयरॉइड ग्लॅंडचा आंतररस) ची पातळी एकाएकी अल्पकाळ वाढण्याची शक्यता असते. त्याचा परिणाम म्हणून काही काळ रक्तातले कॅलशियम खूप वाढायची व नंतर एकदम खाली यायची शक्यता असते. या दोन्ही अवस्था अवघड असतात. काळजीपूर्वक लक्ष ठेवायची गरज असते. या प्रक्रियांना अनुसरून रक्तातील इतर धातूंची K. Na प्रसंगी पातळी एकदम खालीवर व्हायची शक्यता असते.

कॅलशियमची रक्तपरीक्षा त्या दोन दिवसांत मी दर पाच-सहा तासांनी करीत होतो. ऑपरेशननंतर काही काळ वामनरावांची परिस्थिती कठीण होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांची प्रकृती काही अंशी सुधारल्यासारखी वाटली. रक्तातले क्षार, रक्तदाब, कॅलशियम, श्वसन सगळं काही स्थिरस्थावर असल्यासारखे वाटले.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मी हॉस्पिटलमध्ये फोन केला होता. नर्सनेच तो घेतला.

'वामनरावांची प्रकृती कशी आहे?'

'त्यांना हॉर्ट अ‍ॅटॅक आलाय.' उत्तर मिळालं. मी चमकलोच. अर्थात काही रुग्णांना, ४०–५० वर्षे वयाच्या नंतरच्या रुग्णांना, हॉर्ट अ‍ॅटॅक जसा कधीही येऊ शकतो, तसा ऑपरेशननंतरही येऊ शकतो. अन् सर्जनचे सगळे यश हिरावून जातो. त्यात अशक्य काही नाही. क्वचित कोठें न कळता, आत खोलवर रक्तस्राव होतो. त्यानं रक्तदाब खाली येतो. त्याचं पर्यवसान तात्पुरता हृदयाचा ऑक्सिजन पुरवठा कमी होण्यात अन् हॉर्ट अ‍ॅटॅकसदृश स्थिती निर्माण होण्यात होते. कधी कधी रक्तातल्या क्षारांची एवढी उलथापालथ होते की त्याने हृदयाचा थरकाप होतो. वामनरावांना यातले नक्की काय झाले कुणालाच ठाऊक नाही.

त्या रात्री त्यांच्या खोलीबाहेर very serious चा तांबडा फलक लावला गेला.

वामनरावांचा श्वास थांबत थांबत मंद गतीने सुरू होता. सुरुवातीला काही काळ ते शुद्धीवरच होते. आजूबाजूला काय चाललंय त्यांना कळत होते. पण ते कळायचं केव्हा थांबले कुणालाच कळलं नाही. डॉ. वैशंपायन, कार्डियॉलॉजिस्ट दोघेही सारख्या येरझाऱ्या मारत होते.

केव्हा तरी अ‍ॅनस्थेटिस्ट आले. त्यांनी नाकातून नळी घातली आणि कृत्रिम यांत्रिक श्वसनक्रिया सुरू केली. कोपऱ्यातल्या विद्युत-उपकरणाच्या पिस्टनबरोबर वामनरावांची छाती संथ गतीने खालीवर व्हायला लागली. खोलीत आठ फूट उंचीचे प्रचंड उपकरण आणले गेले. वेगवेगळे आठ चॅनेल असलेले, त्याच्या तारा वामनरावांच्या शरीराला दहा-बारा ठिकाणी जोडण्यात आल्या. उपकरणात अगदी वरच्या कोपऱ्यात असलेल्या हिरव्या पडद्यावर हृदयाची हालचाल दर स्पंदनागणिक दिसायला लागली. चमकदार विद्युत-बिंदू खालीवर वेगाने फिरायला लागला. Q. R. S. T. दिसायला लागले. अव्याहत विद्युतबिंदूचा प्रवास सुरू झाला. शेजारच्या फटीतून हा आलेख (ECG) नोंदवलेली कागदाची भेंडाळी बाहेर पडायला लागली. खालच्या पट्टीवर रक्तदाबाची नोंद होत होती. त्याखाली नाडीचे स्पंदन दिसत होते. त्याखाली फुप्फुसाची हालचाल दिसत होती. त्याखालच्या हिरव्या पडद्यावर चार-पाच वेड्यावाकड्या नागमोडी रेषा दिसत होत्या. त्या सारख्या पुढेच चालल्या होत्या. ही होती मेंदूची चेतनाशक्ती.

'हे बटन दाबले म्हणजे या उपकरणातली कृत्रिम स्पंदननिर्मिती (Artifical pace Make) चालू होईल. रुग्णाचे हार्ट बरोबर सुरू नाही. तुला दिसतच आहे. जवनिका आणि कर्णिका यांच्या स्पंदनात मेळ नाही. हे बटन दाबले की अत्यंत सौम्य विजेचा झटका हृदयाला दिला जाईल. आणि या दोन्हींचे आकुंचन एकामागोमाग घडून येईल. असे सौम्य झटके दर मिनिटाला साठ या प्रमाणात दिले जातील. आणि निरोगी अवस्थेतले हृदयाचे कार्य आपल्याला मिळू शकेल.' कार्डियॉलॉजिस्टने सांगितले आणि यंत्राचे बटन दाबले.

कृत्रिम पेसमेकरने दिलेल्या चेतनेची नोंद समोरच्या पडद्यावर दाखविणारी नवी रेषा उमटायला लागली. त्या चेतनेच्या पाठोपाठ हृदयाची सुसंबद्ध क्रिया दिसायला लागली. हे कृत्रिम चेतनेचे कार्य एकसारखे सातत्याने सुरू झाले.

पण वामनराव बेशुद्धच होते. त्यांच्या एका हातातल्या शिरेत रक्ताचा एक एक थेंब संथ गतीने घुसत होता. दुसऱ्या हातात रक्तदाब वाढविणाऱ्या औषधाचा सूक्ष्म भाग सलाईनबरोबर शिरत होता. डॉ. वैशंपायनचा गोरापान चेहरा घामाने डबरला होता. चेहरा भावनाहीन होता. डोळे मॉनिटरवर-त्या उपकरणावर लागले होते. नजर एकवटून तो त्या हिरव्या पडद्यावरचा विद्युतआलेख पाहात होता. रक्तदाब दर्शविणारा आलेख थोडासा उंचीवर चढताच समाधानाची हलकीशी लाट त्याच्या चेहऱ्यावरून तरळून जात होती. बिंदू खाली सरकला की तो अस्वस्थ होत होता. त्याने

यापूर्वी कधी अपयश पाहिले नव्हते असे नव्हते. पण या घटकेला त्याची विलक्षण उलघाल होत होती. मॉनिटरवर खालीवर नाचणाऱ्या चकचकीत बिंदूंच्या आंदोलनाबरोबर त्याचे मन खालीवर नाचत होते, हेलावत होते

'हा रक्तदाब असाच टिकून राहायला हवा. अजून सात-आठ तासांचा अवधी मिळाला की त्यांचे शरीर पूर्ववत सगळ्या गोष्टी सांभाळायला लागेल. या वादळातून ते पलीकडे जायला हवेत. त्यातून ते पार पडले की सर्व सुरक्षित होईल.' तो मनात विचार करीत होता.

'मी मुंबईला ट्रंककॉल केला होता.' तो कार्डियॉलॉजिस्टकडे वळून म्हणाला. 'डॉ. ××× इथे यायला निघालेत. ते विमानाने येताहेत. ते काय म्हणतात बघू या.'

'Take it easy. He will settled soon.'

कार्डियॉलॉजिस्ट उद्गारले, 'चल, वर जाऊ या.'

दोघे खोलीच्या बाहेर आले. पॅसेजमध्ये कोचावर कमलाबाई बसलेल्या होत्या. डॉक्टरद्वय बाहेर आले तसं त्या उठून उभ्या राहिल्या.

'डॉक्टर...' त्यांनी हाक मारली. त्यांची आर्त नजरच काय करायचे ते सांगत होती.

दोघेही थबकले. खरं तर त्याक्षणी त्या दोघांना कमलाताईंना टाळून जायचे होते.

'आम्ही शक्य तो सर्व करतो आहोत. पण वामनराव जरा अवघड परिस्थितीत आहेत. त्यांना हार्ट अ‍ॅटॅक आलाय. मुंबईहून डॉक्टर ××× कन्सल्टेशनला येताहेत विमानाने.'

डॉ. वैशंपायन कसाबसा उद्गारला आणि कमलाताईंकडे न पाहता, क्षणभरही न थबकता दोघे पुढे सटकले आणि वर आले.

'खरं सांगायचं तर माझा कधी देवावर विश्वास नव्हता.' डॉ. वैशंपायन सांगत होता, 'पण आज वाटतंय, असा कोणी वर असता आणि आज वामनरावांच्या मदतीला धावून येता, तर फार बरं झाले असते. तो असो, नसो, निदान तशी माझी श्रद्धा असायला हवी होती. पण मी कधी ईश्वर या कल्पनेवर विश्वासच ठेवलेला नाही.'

त्याचा कार्डियॉलाजिस्ट स्नेही त्याच्याकडे चकित होऊन पाहत होता. असलं काही वैशंपायनच्या तोंडून ऐकणे म्हणजे त्याच्या दृष्टीने जग उलथून पडणे होते.

कोपऱ्यातल्या टेलिफोनची किनरी घंटा मंजूळ आवाजात साद घालते. तो फोन उचलतो.

'मुंबईहून येणारे स्पेशालिस्ट विमानाने पुण्यात येऊन पोहोचलेत. ते एअरपोर्टवर आलेत. काही मिनिटांत ते इथं येऊन पोहोचतील.' ऑपरेटर त्याला सांगत होती. तो फोन खाली ठेवून देतो.

पुन्हा टेलिफोनची मंजूळ स्वरातली साद. तो फोन उचलतो, 'हॅलो.'

वामनरावांच्या खोलीतली सिस्टर फोनवर आहे. 'तर, पेशंटचे B. P. ठीक नाही. मॉनिटरवर पेसमेकिंगला चांगला प्रतिसाद नाहीय. हार्टचे आकुंचन जोरदार होत नाहीय. प्रत्येक शॉकमागे फक्त किंचित मामुली अ‍ॅक्टिव्हिटी दिसतेय.'

'आणखी काय करायचे. आम्ही खाली येतोय. IV सीरिज तयार ठेवा.' फोन बंद होतो.

डॉक्टरद्वय जिना उतरायला लागतात. ते रूममध्ये येईपर्यंत स्पेशॅलिस्टही येऊन दाखल होतात. तिघांचे खलबत, सल्लामसलत होते.

उपकरणाच्या हिरव्या पड्यावर कृत्रिम शॉकच्या खुणा दिसतात. त्याच्यामागोमाग किंचित किरकोळ वर रेषा उचलली गेलेली. एकामागून एक येणाऱ्या तरंगासारखी.

कोपऱ्यातल्या EEG (मेंदूची चेतना दर्शविणारा)तल्या वेडयावाकड्या धावणाऱ्या चळवळीत रेषा सरळ रेषेत धावायला लागतात.

तिघेही एकमेकांकडे पाहत माना हलवतात. गंभीर मुद्रेने खोलीबाहेर पडतात.

मुंबईहून आलेले स्पेशॅलिस्ट स्वतःशीच पुटपुटतात. 'It is too late. too late.'

नेमके हेच शब्द बाहेर उभ्या असलेल्या कमलाताई ऐकतात. व्याकुळ होतात. डॉक्टरांना थांबवून विचारतात,

'असं का म्हणताहेत डॉक्टर. आपण त्यांना दुसरीकडे नेऊ. मेडिकल कॉलेजमध्ये नाहीतर मुंबईला. तिथे कृत्रिम हॉर्टची सोय आहे ना? Heart lung मशीन बसवा. दुसरे हॉर्ट बसवू या. मुंबईत नसेल तर त्यांना लंडनला नेऊ या. न्यूयॉर्कला नेऊ या. आमचं कंपनीचं विमान तयार आहे. मुंबईला, Air India ला कॉन्टॅक्ट केलेलं आहे. तशीच वेळ आली तर पाच–सहा तासांत आपण लंडनमध्ये पोहोचू.'

न थांबता कमलाताई ताडताड बोलत होत्या. त्यांची आतापर्यंत थकलेली मुद्रा उजळून निघाली होती. डोळे विलक्षण तेजाने तळपत होते.

प्रथम डॉक्टर वैशंपायन, त्याचे सहकारी आणि आता कमलाबाई, प्रत्येकजण तेच पुन्हा म्हणत होता मृत्यूला—

'थांब, अजून...थोडा वेळ, आणखी काही काळ, अजून एक संधी.'

लोहगावच्या विमानतळावर किसान इंटरनॅशनल कॉर्पोरेशनचं खाजगी विमान पंख पसरून वाट पाहत रनवेवर उभे होते जय्यत तयारीनिशी. वामनरावांना घेऊन उड्डाण करायच्या तयारीत ते होते. सांताक्रूझला Air India ने एक छोटेखानी जेट गेले कितीतरी दिवस सज्ज केले होते. जरूर पडली तर चटकन लंडनची ट्रीप करायच्या तयारीत ते होते. देशातले, विदेशातले टेलेक्सचे अवाढव्य जाळे तातडीचे संदेश वाहून न्यायला अस्वस्थ झाले होते. अधीर होऊन कडकडाटींचा पूर पोटात साठवून तो ओकायची ते वाट पाहत होते.

आणि डॉ. वैशंपायनच्या हॉस्पिटलमध्ये त्या एअरकंडिशण्ड खोलीतल्या थंडगार हवेत आता कुजल्याचा सूक्ष्म गंध दरवळायला लागला होता. जाणवायला लागला होता. □

(घटना व व्यक्ती काल्पनिक)

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

# बिकट वाट वहिवाट

## वहिवाटीवेगळी करमणूक देणारे दर्जेदार लोकनाटक

एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकनाटक या शब्दाविषयी गैरसमज निर्माण होऊ नये. 'लोकनाटक' आणि रूढ मराठी 'लोकनाटच' यात गल्लत होऊ नये म्हणून मी हा बेंगरूळ वाटणारा वेगळा शब्द वापरतो आहे. लोकनाटक हे People's theatre किंवा folk-theatre चे शब्दशः भाषांतर नसले तरी त्यातून अभिप्रेत असलेला अर्थ तोच आहे. आता 'बिकट वाट वहिवाट' हे नाटक लोकनाटक का? तर त्याला लोककलांचं काही अंग वगैरे आहे, अशातला भाग नाही; मुख्य म्हणजे हे नाटक लोकजीवनाशी अगदी आतड्यानं जोडलं गेलंय, किंबहुना कलाकृती ही वादातीतपणे कलानिष्ठ असतानाच आणि अभंग-अविभाज्यतेनं जीवनाचं प्रतिबिंब दाखवू शकते, याचं ते एक उत्तम उदाहरण आहे. व्यंकटेश माडगूळकरांच्या नाटचकृतींचं हे एक प्रधान वैशिष्टच आहे असं दिसतं. 'तू वेडा कुंभार', 'पति गेले ग काठेवाडी' अशी त्यांची तुलनेनं जुनी व यशस्वी नाटकं काय किंवा जरा अलीकडचं पण अपयशी ठरलेलं 'नामा सातपुते' आणि इंडियन नॅशनल थिएटरनं (आय्. एन्. टी.) आता सादर केलेलं 'बिकट वाट वहिवाट' काय, अस्सल ग्रामीण वातावरणाबरोबरच ग्रामीणांच्या अस्सल आयुष्याचं प्रामाणिक आणि किंचित तटस्थ वाटणारं चित्रण (अर्थात त्यातली तटस्थता ही सहानुभूती आणि कौतुक यांचा साज असलेली आणि म्हणून हवीशीच वाटणारी), हे सूत्र त्या सर्व नाटकात दिसतं. अर्थात यातल्या 'बिकट वाट' मध्ये पडलेला फरक म्हणजे माडगूळकर इथे वैयक्तिक किंवा कौटुंबिक सुखदुःखांच्या परिघाबाहेर पूर्वीपेक्षा बरेच अधिक गेले आहेत आणि त्यांच्या शैलीचा कल सामुदायिक सुखदुःखं, समूहजीवन चितारण्याकडे अधिक दिसतो. 'तू वेडा कुंभार' मध्ये विकसनशील खेड्यांच्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर माडगूळकर जुन्या गावगाड्याचा अभिमानी प्रतिनिधी असलेला इजाप्पा कुंभार प्रभावीपणे उभा करतात, तेव्हा जुनाट गावगाड्याचा पुरस्कार करण्यापेक्षा मोटारीचा रस्ता रोखताना चिरडल्या गेलेल्या इजाप्पाची वैयक्तिक 'केस' ते मांडीत असावेत असं वाटतं. 'बिकट वाट'-मध्येही बदलत्या लोकरीतीच्या पार्श्वभूमीवर पुराण्या चालीरूढींचा अभिमान बाळगणारा नाना गवळी माडगूळकरांनी उभा केलेला असला तरी त्याची खाजगी वकिली किंवा तरफदारी करण्याचा त्यांचा हेतू असावा असं कुठेच वाटत नाही. कारण एक तर मागे म्हटल्याप्रमाणे माडगूळकर इथे समूहाच्या सुखदुःखांशी जास्त संबंधित आहेत; त्यामुळे नानाच्या काहीशी परंपरानिष्ठ मनाच्या क्रियाप्रतिक्रियांना साहजिकच थोडं कमी महत्त्व मिळालं आहे. मूळ जुनी वहिवाट आणि तिला कालचक्रानुसार मिळणारी नवी वळणं यांच्या चित्रणात माडगूळकर अधिक रंगलेले दिसतात, आणि वहिवाट व बदल या दोन्हींपैकी कोणत्याही एका बाजूला त्यांचा स्वतःचा कल अधिक आहे असं क्वचितच वाटतं. दुसरं असं की, इजाप्पा कुंभाराच्या single-track व्यक्तित्वापेक्षा नानाच्या व्यक्तिरेखेत काही अधिक मनोवेधक गहिरे रंग माडगूळकरांनी भरले आहेत. इजाप्पा कुंभार ही व्यक्तिरेखा तांत्रिक तपशिलात शिरायचं तर flat किंवा static character म्हटली पाहिजे. विशेषतः नाटचप्रयोगात बऱ्याचदा गाळला जाणारा 'तू वेडा कुंभार' नाटकाचा चौथा अंक लक्षात घेतला, तर मरणाची वाट पाहत असतानाही इजाप्पा यत्किंचित बदललेला नाही असं दिसतं. शरीर मोडकळीला आलं तरी त्याच्या मनाचा भक्कम विरोध यंत्रयुगाला अजूनही आहेच. नानाची व्यक्तिरेखा यावेगळी आहे, ती dynamic आहे, गतिमान आणि परिवर्तनक्षम आहे. परिवर्तनशील नसली तरी परिवर्तनक्षम आहे. इजाप्पा कुंभाराइतकीच नाना गवळ्याला गावगाड्याची ओढ आणि चाड आहे. वहिवाट मोडत असल्याचं दुःखही दोघांना सारखंच आहे. पण म्हातारा इजाप्पा हा बदल सहन करू शकत नाही आणि वादळाला अडवू जाणाऱ्या झाडासारखा कोलमडून उद्ध्वस्त होतो, तर गमत्या, आनंदी आणि मिस्किल स्वभावाचा नाना हा बदल समजून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न (प्रामाणिक त्राग्यासकट) आपल्या कुवतीनुसार आणि आपल्या मर्यादेपर्यंत करतो. आणि त्याचा हा प्रयत्न, महापुरातही टिकणाऱ्या लव्हाळ्यांच्या जातीचा हा प्रयत्न, माडगूळकर त्यात interest घेऊनच पण कोणताही अभिनिवेश न बाळगता, चांगल्या कलाकाराला शोभेल इतक्या तटस्थपणानं मांडतात. 'वेडा कुंभार'-मध्ये ठिकठिकाणी आणि विशेषतः चौथ्या अंकात त्यांनी केलेली इजाप्पाची विलक्षण pationate आणि emotionally appealing अशी तरफदारी लक्षात घेतली की, 'बिकट वाट' चं वेगळेपण प्रकर्षानं जाणवतं.

'बिकट वाट' हे असं लोकजीवनावरचं लोकनाटक असल्यानं त्याला बंदिस्त कथानक आणि त्याचा पद्धतशीर विकास वगैरे यथातथाच आहे. 'एक बायको आणि पाच मुली यांचा संसार रेटणारा नाना गवळी आणि निजामी राजवटीखालचं त्यांचं फुलगाव यांचं वहिवाटीतलं आयुष्य,' एवढंच नाटचसूत्र. विसाव्या शतकातल्या बदलत्या विचारप्रवाहांची झळ नानाला आणि फुलगावला थोडीफार लागते, ती त्याच्या पहिल्या दोन्ही मुली चक्क प्रेमविवाह करायचं योजतात, तेव्हाच. वहिवाटीला सोडून, वहिवाट मोडून हे विचित्र काहीतरी घडतंय, या जाणिवेनं नाना दोन्ही वेळा सुरुवातीला बिथरतो आणि तळचात-मळचातचा विचारी खेळ पुरा होईल तसतसा निवतही जातो. नव्या काळाची नवी वहिवाट मान्य करण्यापर्यंत खाली येतो, तेवढ्यात त्याची तिसरी पोरगी पुतळी एका मुसलमान गाववाल्यावर जीव जडवते. नानामधला वहिवाटदार कर्ता बापई इतकी मूलभूत तडजोड मात्र स्वीकारू शकत नाही, आणि एकीकडे मायेनं आतडं तुटत असतानाही पोरीचं तोंडसुद्धा पाह्यचं नाकारतो. हा सगळा भावनिक आणि सामाजिकही असणारा संघर्ष, त्याची धार बोथट होऊ न देताही माडगूळकरांनी ज्या हळुवार, रंजक आणि हलक्या-फुलक्या शैलीनं रेखाटली आहे; त्यामुळं समस्या तशी वैचारिक आणि सखोल वाटली तरी नाटकाला कलात्मक उंची गाठताना तिचा बिलकुल अडथळा होत नाही.

मुलींच्या प्रेमविवाहाला बायकोची परवानगी मिळवण्यासाठी नाना जे भयंकर स्वप्न पडल्याची थाप मारतो, तो साराच प्रसंग ही माडगूळकरांच्या शैलीची आणि सई परांजपे यांच्या दिग्दर्शननैपुण्याची खास झलक म्हटली पाहिजे.

नाटकाचा शेवट त्याला विलक्षण अनपेक्षित पातळीवर आणि उंचीवर नेणारा आहे. नाटकाला कौटुंबिक (सामाजिक–सांस्कृतिक–धार्मिकसुद्धा !) संघर्ष कडेलोटाच्या टोकावर असतानाच, फुलगाव रझाकारांसाठी मोकळं करून तिथली पिढ्यान्‌पिढ्यांची वस्ती हलवायचा निजामी हुकूम येतो. इथेही निजामी फौजदाराच्या समोर नाना बेसुमार भडकतो आणि गाव सोडायला नकार देतो; पण डोकं ताळ्यावर आल्यानंतर हुकमाची तामिली करायचा व्यवहारी शहाणपणा तो स्वीकारतो आणि जिवा–वित्तासाठी जरूर ती तडजोड करायची तयारी (आणि हिंमतही) असलेली ती फुलगावची माणसं पुन्हा एकदा–आणि कदाचित शेवटच्याच वेळी–वहिवाट मोडून दशदिशांना पांगतात, इथं नाटक संपतं. लेखक–दिग्दर्शक–कलाकारांनी हा प्रसंग पुरेसा (आणि योग्य तेवढाच) हृदयस्पर्शी केलेला आहेच, पण मुख्य म्हणजे हे सगळंच खूप काहीतरी नवीन आहे, रंगभूमीच्या आजवरच्या चाकोरीबाहेरचं आहे आणि तरीही विलक्षण खरं आहे, मातीपासूनचं आहे, प्रामाणिक आहे. 'बिकट वाट' हे वहिवाटीबाहेरचं दर्जेदार मनोरंजन आहे, असं यामुळेच म्हणावंसं वाटतं.

'बिकट वाट'चं यश आणि एक आकर्षण त्याला गवसलेला अचूक 'फॉर्म' हेही आहे. त्याला नृत्यनाटच किंवा संगीतक असा काही शिक्का तर मारता येऊ नये, पण तरीही नृत्य–संगीताची त्यात नुसती रेलचेल आहे, एवढंच नव्हे तर ते नृत्य–संगीत बहुसंख्य ठिकाणी कृत्रिम, लादल्यागत, किंवा चिकटविल्यागत वाटत नाही, ते नाटकाच्या लोकलयीचा एक अंगभूत भागच होऊन येतं. नाटकाच्या अगदी सुरुवातीचं गाणं, नाटक संपतानाचा गतिनिदर्शक ताल, मागे उल्लेखिलेलं नानाचं स्वप्न, नानाच्या मुलींची गाणी ही याची काही ठळक उदाहरणं. 'काठोकाठ भरू द्या प्याला' या कवितेचा समावेश मात्र अस्थानी वाटला. गीतांच्या मोहक चाली आणि त्यांचं तितकंच आकर्षक नाट्यीकरण याबद्दल पं. जितेन्द्र अभिषेकी व सई परांजपे यांना धन्यवाद द्यायला हवेत. तसंच–तेवढंच अभिनंदन करायला हवं ते आय. एन. टी. च्या तंत्रज्ञांचं अप्रतिम देखणं नेपथ्य आणि नाटक अनेक अर्थांनी 'उजळविणारी' प्रकाशयोजना या निर्दोष कमाईबद्दल !

श्रीकांत मोघे (नाना गवळी) आणि रेखा (नानाची बायको) या जाणत्या अभिनेत्यांच्या साथीला आय. एन्. टी. चा जुना-नवा असा बराच मोठा नटसंच आत्मविश्वासानं आणि ताकदीनं उभं राहिल्याचं नाटकाच्या भक्कम टीमवर्कमधनं प्रत्ययाला येतं. 'घाशीराम' नंतर इतका मोठा कोरस इतक्या तयारीनं उभा राहिल्याचं हे उदाहरण दुर्मिळच म्हणावं लागेल. दारूच्या गुत्त्यामधले प्रसंग, राधीचं लग्न, नानाचं स्वप्न अशी काही दृश्य या कोरसच्या उत्तम, अचूक हालचालीमुळं आणि प्रमाण–लयबद्ध उपयोगामुळं अतिशय उठावदार झाले आहेत. त्यातला फार मोठा वाटा ('सिंहाचा' असं म्हणवत नाही.) सई परांजपे यांचाच. नानाच्या प्रौढ बायकोच्या भूमिकेत अनुभवी अभिनेत्री रेखा यांनी चांगल्या looks बरोबर तन्मय अभिनयाचीही जोड दिली आहे. अडाणी, खेडवळ, पण जरब आणि प्रेम-माया दोन्हीही ओठी-पोटी हुकूमतीनं वागवणारी कर्ती स्त्री घरधनीण म्हणून त्या शोभल्या आणि सामर्थ्यानं वावरल्या. नानाची मध्यवर्ती भूमिका लाजवाब सजविणारे श्रीकांत मोघे यांच्या अभिनयजीवनातला एक फार मोठा टप्पा या भूमिकेमधनं गाठलाय्. देवभोळा पण बेरकी नाना देवाला उद्देशून जी मिस्किल स्वगतं म्हणतो, त्यावेळच्या त्यांच्या अदाकारीतच त्यांच्या यशाची पावती मिळण्यासारखी आहे. खरं तर ही स्वगतं फारशी सफाईदार लिहिली गेलेली नाहीत, कित्येकदा ती कृत्रिम वाटतात. श्रीकांत मोघे आपल्या अभिनयाच्या सामर्थ्यावरच हा भाग सजीव बनवतात, हे विशेष. नानाचं वेळोवेळी बिथरणं आणि थंड होऊन तडजोड करणं यातली आंदोलनं त्यांनी बारकाईनं दाखवली.

शेवटी व्यंकटेश माडगूळकरांच्या 'प्रॉब्लेम' निवडण्याच्या आणि उभारण्याच्या सामर्थ्यालाही सलाम केला पाहिजे. 'तू वेडा कुंभार' काय, किंवा 'बिकट वाट वहिवाट' काय, समस्येच्या दोन्ही बाजू ते इतक्या न्यायी समत्वबुद्धीनं आणि कलात्मक सहानुभूतीच्या सामर्थ्यानं रंगवितात, की प्रेक्षकांना कोणतीही एक बाजू निवडणं तर कठीण व्हावंच, पण त्यांचा कल कळणंही कठीण व्हावं. आणखी एका गोष्टीचा उल्लेख करायलाच हवा. वहिवाटीसाठी वापरलेलं बासरीवादकाचं अतिलोभस, नाजुक, सुरेल प्रतीक. नाटक आपल्या मातीत इतक्या खोलवर मुळं रुजवून इतक्या उंचीवर जात असेल, तर त्याचं बीज देशी आहे, की विदेशी याचं आपणा रसिकांना काय होय ? □

## हिंदी चित्रपट

**सक्तीची लष्करभरती अशी असते बरं !**

# ज़िद

सचिन–सारिका ही हिट् पेअर ठरण्याआधी चालू केलेला आणि ती हिट् ठरल्यानंतर रिलीज् झालेला हा ज़िद. नूतनची प्रौढ पण प्रदीर्घ भूमिका हे या चित्रपटाचं एक महत्त्वाचं आकर्षण– प्रेमनाथ नामक disqualification लाही बॅलन्स करणारं. धर्मेंद्रचा गेस्ट रोल आणि रवींद्र जैनचं गीत–संगीत. असं हे सगळं प्रकरण सक्तीच्या लष्करभरतीचा वस्तुपाठ दाखवण्यात संपेल असं एरवी चुकूनही वाटलं नसतं. दुर्दैवानं, ही ज़िद संपल्यानंतर, 'सक्तीची लष्करभरती अशी असते बरं !' यापलीकडे विशेष काही प्रतिक्रिया प्रेक्षकांतून येत नाही.

भानगड अशी झाली आहे की, मेजर महेन्द्र प्रताप (धर्मेंद्र) हे गेस्ट ॲपियरन्सच्या करारानुसार चित्रपटाच्या पहिल्या रिळातच भारत–चीन युद्धाचं निमित्त करून वीरमरण वगैरे उरकून घेतात. आता त्यांच्या मागे

त्याच्या चिरंजिवांना बाप्पाजींच्या पावलावर पाऊल टाकायला लावण्याची जिद्द श्रीमती प्रताप (नूतन) धरून बसतात आणि त्यांचे उनाड चिरंजीव (सचिन) मात्र पितृवियोगामुळे युद्धाची आणि सैन्याची नफरत करीतच वाढतात. त्यांची प्रेयसी सारिकादेवींचे तीर्थरूप प्रेमनाथ हे चक्क जनरल. तेव्हा जावई सैन्यात जायला तयार नाहीसं पाहिल्यावर ते त्यांना जावई करून घ्यायचंच नाकारतात. इकडे जिद्दी मातोश्री घर सोडायला निघतात. शेवटी बंदूक उचलून गोळी मारायला धावतात. लेक्चर तर अखंड चालू. शेवटी (बहुधा हा ब्रेनवॉशिंगचा मनस्ताप असह्य होऊनच की काय) सचिनसाहेब आपली जिद्द सोडतात. आणि आईची जिद्द झिंदाबाद करून मोकळे होतात. जिद्दीचा हा 'मातृ–फेम' आविष्कार पाहून मी थक्क झालो. हे म्हणजे फारच आहे. हा चक्क मानसिक अत्याचार झाला. हुतात्मा मेजरच्या मुलानं आणखी मोठा लष्करी अधिकारी असावं, ही आईची अपेक्षा एकवेळ रास्त म्हणता येईल, पण त्यासाठी एवढी सक्ती ? ऐन हिटलरी अंमलातसुद्धा इतका जुलूम दुर्मिळच म्हटला पाहिजे. असो. ही वेगळ्या जातीची जिद्द म्हटली पाहिजे.

नूतनची करारी भूमिका हे चित्रपटाचं एकमेव बलस्थान म्हटलं पाहिजे. सचिन-सारिका टीनएजर रोमँटिक पेअर म्हणून बाईट दिसले तरी सचिनचं वय आणि त्याच्या अभिनयाचं वय याची काही तरी गफलत झाली आहे नक्की. गीत-संगीत रवीन्द्र जैनचं असूनही तद्दन रद्दड आणि कामचलाऊ आहे. छायाचित्रण बरं, पण ध्वनिमुद्रण खराब. प्रेमनाथनं मूकाभिनय करायला सुरुवात केली तर उपकार होतील. चित्रपटातली शाळा आणि सचिन-सारिकादी मंडळींचे तिथले उपद्व्याप हा प्रकार एक टोपी उडवणारा आणि तिच्याखालच्या डोक्याला भारतीय शिक्षणपद्धतीविषयी अकारण तकलीफ देणारा आहे.

—शिरीष सहस्रबुद्धे

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**१८।१२।७६ ते २४।१२।७६**

## मेष : सुखकारक पर्व

दहावा शुक्र, तसेच धनू राशीत भाग्यस्थानी रवी–मंगळ आणि राशीत गुरू असे उत्तम ग्रहमान तुम्हाला लाभले आहे. रवी–मंगळाचा गुरूबरोबरचा नवपंचमयोग म्हणजे तर एक दैवाचे लेणे आहे. त्यामुळे यावेळी तुम्ही यशाच्या अत्युच्च शिखरावर विराजमान झालात तर कुणाला आश्चर्य वाटू नये. आगामी घडणाऱ्या सुखकारक घटनांचे सर्व पडसाद यावेळी तुमच्या जीवनात उठू लागणार आहेत. अनेक दिवसांची स्वप्ने साकार होणार आहेत. महत्त्वाकांक्षा उंचावणार आहे. कर्तृत्वाला नवा फुलोरा येणार आहे. नोकरीतील अत्युच्च मान मिळण्याचे भाग्य दृष्टिपथात येणार आहे. धंद्यात नवे क्रांतिकारक पाऊल पडेल. शुभ दिनांक २१–२४.

**महिलांना :** नोकरीत तुम्ही अनेक उच्च पदाच्या मानकरी ठरणार आहात.

**विद्यार्थ्यांना :** अपुरे राहिलेले शिक्षण पुरे होण्याची प्रक्रिया यावेळी घडून येईल.

## वृषभ : कलाकारांना शुभकारक

वृषभ राशीच्या व्यक्ती या प्रामुख्याने गायक, वादक, चित्रकार वगैरे कलाक्षेत्रात अधिक चमकतात. भाग्यस्थानी असलेला शुक्र हा यावेळी या कलावृत्तीला खूपच प्रोत्साहक व उपकारक ठरणार आहे. वृत्तपत्रे, मासिके व आकाशवाणी यांसारख्या माध्यमाद्वारे कीर्ती व प्रसिद्धी मिळण्याची यावेळी सुवर्णसंधी अनेकांना मिळणार आहे. नवीन कलावंतांना लोकप्रियता मिळवून देणारे योग आहेत. धंद्याची परिस्थिती सुधारणार आहे. प्रकाशनव्यवसायाला नवे तेज प्राप्त होईल. नोकरीत अधिकार वाढतील. बेकारांना नोकरीत संधी मिळेल. सौंदर्यप्रसाधने, कापड व तयार कपडे यांचा व्यापार चार पैसे मिळवून देईल. शुभ दिनांक २२–२३.

**महिलांना :** आर्थिक स्वास्थ्य पुरेसे मिळेल. नोकरीत वरचष्मा राहील.

**विद्यार्थ्यांना :** नव्या विषयाचा अभ्यास हाती घ्यावा.

## मिथुन : व्यक्तिमत्त्व उंचावेल

राशीसमोर रवी–मंगळाचा तळ पडला असून, गुरू अकरावा झाला आहे. काही बाबतीत हे रवी–गुरू आपणास खूपच उपकारक होणार आहेत. लेखनाचा व्यवसाय उत्तम चालणार असून बौद्धिक क्षेत्रात चमकणार आहात. वकिलीचा व्यवसाय भरभराटणार असून बुद्धीचे तेज डोळ्यात भरणार आहे. हिशोबाची कामे करणारे, इन्कमटॅक्स क्षेत्रात काम करणारे, विक्रीकराच्या क्षेत्रात काम करणारे व मोठमोठ्या क्षेत्रांत उलाढाल करणारे लोक यावेळी भाग्यवान ठरणार आहेत. शेअर्समध्ये अचानक आनंददायक घटना घडतील. चालू नोकरीत गोड स्थित्यंतर घडेल. सांसारिक जीवनात थोडेफार मतभेद होतील, पण ते मिटतील. शुभ दिनांक २४–२५.

**महिलांना :** प्रकाशनाच्या प्रकाशात तुम्ही चमकणार आहात.

**विद्यार्थ्यांना :** वाङ्मयात रस राहील. सभा-संमेलने गाजतील.

## कर्क : नव्या योजना आखा

सातवा शुक्र सांसारिक जीवनात प्रसन्नता व आनंद आणणार आहे. विशेष करून नवविवाहित दांपत्यांना हा आठवडा फारच सुखकारक जाणार आहे. ज्यांची लग्ने लांबणीवर पडत होती किंवा जमत नव्हती, त्यांची लग्ने यावेळी साफल्याच्या मार्गावर येतील. धंद्याच्या बाबतीत प्रगतीचे नवे टप्पे गाठू शकाल. नव्या योजना कार्यान्वित होतील. दानधर्म–मंगलकार्य हातून घडेल. नोकरीत स्थित्यंतरे घडून येण्याची चिन्हे दिसू लागतील. अन्याय व उपेक्षा दूर होऊन वरिष्ठांना तुमच्या गुणांची खात्री पटेल. पत्रकार व लेखक यांच्या हातून चांगले लिखाण होईल. परदेशी प्रवासाचा योगदेखील यावेळी आहे. राजकारणात उच्च पद प्राप्त

होईल. बेकारांना आनंद देणारी घटना घडेल. शुभ दिनांक २२–२३.

**महिलांना :** कलाक्षेत्रात बस्तान बसेल.

**विद्यार्थ्यांना :** धनिक महिलेची मदत मिळेल.

## सिंह : आशादायक वातावरण

राशीस्वामी रवी तर तुमच्यावर अतिशय खूष आहेच, पण मंगळ व गुरू हेही तुमच्या प्रगतीला हातभार लावणार आहेत. गुरू-चंद्राचा त्रिकोणयोग अनेक बाबतीत प्रगतीचे नवे टप्पे गाठायला मदत करणार आहे. उद्योगधंद्याची गती वाढणार असून स्पर्धेच्या एखाद्या नवीन क्षेत्रात तुमचे बस्तान बसवायला मदत करणार आहे. जुने संबंध पुन्हा उजळणार असून, कर्तृत्वाची नवी दिशा दृष्टिपथात येणार आहे. तुमच्यापैकी जे कुणी राजकारण व सार्वजनिक कार्यात वावरत असतील ते आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यात यशस्वी होणार आहेत. विरोधक नमतील व सहकार्याचा हात पुढे करतील. नोकरीची एकूण परिस्थिती समाधानकारक राहील. वरिष्ठ व मालक यांच्या मनातील गैरसमज दूर होऊन त्यांच्या कृपेचे नवे पर्व सुरू होईल. शुभ दिनांक २१, २३.

**महिलांना :** नोकरीत शुभकारक घटना घडतील.

**विद्यार्थ्यांना :** मन उत्साही राहून हुशारीचा प्रत्यय येईल.

## कन्या : काळजी निवारण होईल

गेले काही दिवस गुरूची तुमच्यावर पुष्कळच कृपा होती. आता गुरू आठवा झाला आहे. तो तसा वाईट नसला तरी फारसा उपकारक आहे असेही नाही. मानसिक असमाधान, उदासीनता, त्रासिकपणा यांचा प्रादुर्भाव वागण्यात-बोलण्यात होणार आहे. पण त्यामुळे नुकसान मात्र होण्याची भीती नको. नोकरीत सतत वाटणारी काल्पनिक भीती प्रत्यक्षात कधीच उतरणार नाही. वरिष्ठांची मर्जी राहील. इतकेच नव्हे तर काही चांगले घडू शकेल. दुय्यम धंद्याबद्दल मनात निर्माण झालेली उदासीनता संपून काही करण्याची मनाची तयारी होईल. घरगुती अडचणींची दखल घेऊ नका. त्याचा तुम्हाला कोणताच त्रास होणार नाही. पत्नीचे सहकार्य उत्तमपैकी मिळेल. लेखनाबद्दल दिलेली आश्वासने पुरी करता येतील. सार्वजनिक जीवनात मान मिळेल. प्रतिष्ठा वाढेल. शुभ दिनांक १९, २१.

**महिलांना :** पतिराजांकडून अपेक्षा पुऱ्या होतील. मनोरथ पुरे होतील.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासातील अडचणी कमी होतील.

## तूळ : स्वप्ने साकारतील

मेष राशीत गुरू वक्री असला तरी तो सातवा आहे. त्याचे स्थानमाहात्म्य कमी होणार नाही. हर्शल-गुरूचा प्रतियोग यावेळी राशीतून होत आहे. तो लाभकारक होईल. प्रामुख्याने सांसारिक जीवनात आजवर मनात बाळगलेली स्वप्ने साकार होतील. यावेळी अनेकांना पुत्रजन्माचा आनंद मिळू शकेल. ज्यांची मुले मोठी असतील त्यांना मुलांच्या कर्तृत्वाचा आनंद उपभोगता येईल. विवाहेच्छूंचे विवाह यावेळी अनपेक्षितरीत्या ठरून पार पडण्याचे योग आहेत. त्याचप्रमाणे जोडीदार अनुरूप मिळतील. हा आठवडा नोकरीत अनेक दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे. तुमच्या योजना प्रत्यक्षात साकार होणार आहेत. वरिष्ठांवर प्रभाव राहील. शुभ दिनांक २३, २४.

**महिलांना :** सांसारिक सुखात नावीन्य येईल. प्रसन्न वातावरण राहील.

**विद्यार्थ्यांना :** सुप्त प्रेम अनुकूल वळण घेईल.

## वृश्चिक : उद्योगात प्रगती

राशिस्वामी मंगळ व रवी यावेळी तुमच्यापासून दूर जात आहेत. त्यांनी तुम्हाला बरेच दिवस साथ दिली. यावेळी तो थोडे तुमच्याकडे दुर्लक्ष करणार आहे. तरी पण पैसा कमी पडणार नाही. तुमचे कोणतेच काम पैसा नाही म्हणून अडणार नाही. धनिक मित्राचे सहकार्य उत्तमपैकी लाभेल. शेतीचा धंदा किफायतशीर होईल. शेतीत गुंतवलेला पैसा उपकारक ठरला याचा प्रत्यय येईल. धंदा व्यवस्थित चालेल. धंद्यात अडचणी नाहीत. प्रामुख्याने इंजिनीयरिंग उद्योग, पोलाद, वर्कशॉप, खतव्यापार व्यवस्थित चालेल. नोकरीत कामाचे चीज होईल वरिष्ठांच्या कलाने वागा. बेकारांची स्थिती थोडीफार सुधारेल. अनपेक्षित अर्थप्राप्ती होईलच असे मनात धरू नका. शुभ दिनांक २१, २२.

**महिलांना :** लॉटरीत भाग घ्या. लेखनास प्रसिद्धी मिळू शकेल.

**विद्यार्थ्यांना :** चित्रपट-नाट्य कलावंतांबरोबर ओळख होईल.

## धनू : अडचणींवर मात

आठव्या शनीची तुम्ही आता मुळीच काळजी करू नका. रवी राशीत आहेच. मंगळाने व्ययस्थानी बसून चालवलेली छळणूक दि. २२ पासून कमी होऊन त्याचे सहकार्याचे युग सुरू होणार आहे. गुरू तर पाचवा आहेच. या वेळी सारे ग्रहमान कसे उपकारक झाले आहेत. त्यामुळे कोणत्याही अडचणींवर मात करण्यात तुम्ही यशस्वी ठरणार आहात. मग ती अडचण नोकरीतील असो, की धंद्यातील असो. आर्थिक स्थिती नवे वळण घेईल. भरपूर शिल्लक पडली नाही तरी गरजा भागविण्यास पैसा कमी पडणार नाही. पैशासाठी कोणतीच अडचण भासणार नाही. उलट लोकांचे चार पैसे देणे असाल तर ते देण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होणार आहे. शुभ दिनांक १९–२१.

**महिलांना :** पतिराजांच्या तापट स्वभावाचा प्रत्यय येणार असला तरी काळजी नको.

**विद्यार्थ्यांना :** कोणत्याही परीक्षेत चांगलेच यश मिळेल.

## मकर : अडचणींची चाहूल

रवी-मंगळ हे दोन्ही ग्रह बारावे आहेत. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तुम्ही जर राजकारणात असाल तर तुमची अनेक बाबतीत गोंधळल्यासारखी परिस्थिती होऊ शकेल. ज्यांना तुम्ही दुखवले असेल व जे तुमच्यापासून दूर गेले असतील, त्यांचीच

मदत घेण्याची पाळी तुमच्यावर येईल. धंद्यात धाडस न करणे फायद्याचे ठरणार आहे. शेअर्सच्या बाबतीत अधिक दक्ष राहणे आवश्यक आहे. व्यापारी लोकांनी बाजाराच्या एकूण परिस्थितीवर लक्ष ठेवूनच उलाढाली कराव्यात हे उत्तम. वाकडा मार्ग तर अजीबात धरू नये. नोकरीत वरिष्ठांच्या मर्जीत फरक पडल्याची चाहूल लागणार आहे. पूर्वीइतके त्यांचे सहकार्य मिळणे कठीण होणार आहे. सर्वांशी सहकार्याने वागणे हिताचे ठरणार आहे. शुभ दिनांक १८–२०.

**महिलांना :** शारीरिक परिस्थिती सुधारेल. शंकाकुशंका दूर होतील.

**विद्यार्थ्यांना :** वाहन हाकताना वेग कमी ठेवा.

**कुंभ : आर्थिक उत्कर्ष**

कुंभ राशीच्या व्यक्तींचे प्रतिकूल दिवस आता संपले आहेत. अकरावे रवी-मंगळ कर्जातून मुक्त करून शिलकीचे अंदाजपत्रक तयार करायला मदत करणार आहेत. गुरू तिसरा कर्तृत्वाला नवे क्षेत्र उपलब्ध करून देणार आहे. तुमचे कोणतेही व्यवसायाचे क्षेत्र असो, त्यात प्रगतीचे नवे पर्व सुरू होणार आहे. स्वतंत्र कारखानदार म्हणून सुरुवात होईल. भागीदारी करू नका. विशेषत: लोखंड, पोलाद अशा उद्योगांशी संबंधित अशा कोणत्याही व्यवसायाचा उत्कर्ष साधू शकाल. नोकरीची बाजू बळकट होईल. प्रमोशनचे सहज जमून जाईल. अधिकारपदाचा लाभ होईल. फायद्याची व मिळकतीची क्षेत्रे खुली होतील. व्यापार सुधारेल. अडचणी दूर होतील. तब्येत उत्तम राहील. शुभ दिनांक २२–२३.

**महिलांना :** संसारात कोणतीही अडचण राहणार नाही. पैसा मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** प्रवास होईल. तो फायदेशीर होईल.


**मीन : बौद्धिक लाभ**

राशिस्वामी गुरू दुसरा आहे. तो वक्री असला तरी काळजी नको. गुरूचा शनीशी त्रिकोणयोग आहे, तो प्रामुख्याने आर्थिक व प्रतिष्ठेच्या दृष्टीने लाभदायक होईल. तुमचा कोणताही धंदा असू द्या, त्याची आर्थिक बाजू बळकट होणार आहे. कर्जविषयक कामे होतील. धनिक व्यक्तींचा चांगला आधार मिळेल. अनेक दिवस उराशी बाळगलेली स्वप्ने साकार होतील. महत्त्वाचा पत्रव्यवहार करा. ज्यांची परदेशी यात्रा करण्याची इच्छा आहे, त्यांनी प्रयत्न करावा. राजकारण व मोठ्या अधिकारी व्यक्ती तुमच्या परिचयाच्या होतील. स्थावराचा, शेतीचा प्रश्न सुटेल. मुलांच्या कौतुकाची संधी मिळेल. रेस, लॉटरीपासून पैसा मिळेल. नोकरीत इच्छा-आकांक्षा सफळ होतील. स्वप्ने साकार होतील. मन आनंदी राहील. शुभ दिनांक २१–२३.

**महिलांना :** वाङ्मयाच्या अभ्यासाचा प्रयत्न करा. यश मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** शिक्षणासाठी पैशांची मदत मिळेल. □


प्रसिद्ध झाले !



लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी
१९४८-४९

लेखक : पु. ल. इनामदार

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०